# दलित साहित्यातील 'स्त्री' जीवन

डॉ. भास्कर शेळके



# दलित साहित्यातील स्त्री-जीवन

डॉ. भास्कर शेळके

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

# Dalit Sahityatil Sree-Jeevan

# दलित साहित्यातील स्त्री-जीवन

## डॉ. भास्कर शेळके

© प्रकाशकाधीन


| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | सौ तारादेवी भास्कर शेळके<br>१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,<br>जि.पुणे, ४१० ५०२ |
| मुखपृष्ठ | : | विनोद पारे, पुणे |
| प्रकाशन क्रमांक | : | १२ |
| प्रथमावृत्ती | : | १२ डिसेंबर २०१५ |
| अक्षरजुळणी | : | सौ. ज्योती विलास शिंदे |
| मुद्रक | : | श्रीराज प्रटर्स<br>इल्लिना अपार्टमेंट, शॉप नं. १२<br>शनिवार पेठ, पुणे - ३०. |
| मूल्य | : | १००/- |
| **ISBN No.** | **:** | **978-93-84309-03-9** |

# अर्पणपत्रिका

अमृत महोत्सवी वर्षानिमित्त -----

आदरणीय मा. ना. शरदचंद्रजी पवार सो.

माजी केंद्रीय कृषी मंत्री, भारत सरकार

आणि

सौ. प्रतिभाताई पवार

ह्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय

जीवनकार्यास समर्पित...

## मनोगत...

'दलित साहित्यातील स्त्री-जीवन' हे संशोधनपर पुस्तक आज पूर्णत्वास येत आहे. ह्या संशोधनपर पुस्तकातून दलित स्त्रीचेच नव्हे तर समग्र भारतीय स्त्रीचे साहित्य आणि समाज व्यवस्थेत काय स्थान आहे, हे समजण्यास मदत होणार आहे. भारतीय समाजव्यवस्थेत आजही स्त्री दुय्यम-स्थानीच आहे. वास्तविक स्त्री ही जगाची जननी आहे. तिच्यामुळेच निर्मितीचे कार्च सुखकर झाले आहे. तिचा सन्मान झाला पाहिजे. तिला समाजव्यवस्थेत मानाचे स्थान प्राप्त झाले पाहिजे. देव-धर्म-देश यापेक्षा स्त्री सर्वश्रेष्ठ आहे. हेच सूत्र प्रस्तुत पुस्तकातून अधोरेखित केले आहे. ह्या पुस्तकाचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनात निश्चितच उपयोग होईल, असा माझा मानसआहे.

माझा पिंड फुले-शाहू-आंबेडकरी विचारसरणीचा असल्यामुळे माझ्या असंख्य हितचिंतक मित्रांना वाटत होते की, मी 'दलित साहित्यातील स्त्री-जीवन' ह्या विषयावर संशोधनपर लेखन करावे, त्यातूनच मला बळ प्राप्त झाले आणि हा लेखन प्रपंच पूर्णत्वास आला.

माझ्या लेखन संशोधनास सतत प्रोत्साहन देणारे मा. अध्यक्ष ॲड. संजय काळे, ह्यांचे सर्व विश्वस्त मंडळ ह्यांची प्रेरणा आहेच, त्यांच्या ऋणात राहणे मी पसंत करतो. संशोधन लेखनासाठी संशोधन साहित्य उपलब्ध करून देणारे महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. थोरात व त्यांचे सर्व सहकारी ह्यांचेही मी आभार मानतो. संशोधन लेखनाचे कार्य लवकरात-लवकर पूर्णत्वास यावे म्हणून प्रेमळपणे तगादा लावणारा माझा विद्यार्थी मित्र प्रा. डॉ. शशिकांत साळवे ह्याचे ही सहकार्य आहेच.

माझे कुटुंबीय आई-वडील (दुर्गाबाई, त्रिंबकराव) भाऊ-भावजयी प्रा. सयराम आणि मीना, पत्नी सौ. तारादेवी आणि चि. डॉ. अविनाश, चि.

डॉ. तृप्ती, चि.सुनित ह्यांनी माझ्या लेखन प्रपंचास हातभार लावला. त्यांचे प्रेमळ सहकार्य विसरता येत नाही. विनोद पारे ह्यांनी सुबक मुखपृष्ठ तयार केले आहे तर सौ.ज्योती शिंदे ह्यांनी टंकलेखनाचे कार्य केले आणि राज प्रिंटर्स पुणे ह्यांनी मुद्रणाचे कार्य केले. ह्या शिवाय अनेक ज्ञात-अज्ञातांनी माझ्या संशोधनलेखन विचारास पाठिंबा दिला आहे, ह्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. ह्या ग्रंथाचे वाचक, रसिक, संशोधक, अभ्यासक स्वागतच करतील अशी मनोकामना व्यक्त करतो. धन्यवाद!!!

डॉ. भास्करराव शेळके,
प्राचार्य श्री. शिव छत्रपती
महाविद्यालय, जुन्नर पुणे

# दलित साहित्यातील स्त्री ...

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले. उदा. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, देशी साहित्य इ. ह्या सर्व साहित्य प्रवाहांमध्ये दलित साहित्यप्रवाहांमध्ये दलित साहित्य प्रवाह सकस आणि पुरोगामी ठरला. ह्या साहित्यप्रवाहाने सर्वसामान्य माणसांचे जीवनचित्रण पहिल्यांदा साहित्यात घडविले. दलित साहित्य प्रवाहामुळे पीडित व शोषित समाजाला आपले विचार मांडण्यासाठी विचारपीठ उपलब्ध झाले. दलित साहित्याचे प्रेरणास्थान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि मानवतावाद ह्या मूल्यांना प्रमाणभूत मानून नवसमाज निर्मितीची कास धरली. समाजपरिवर्तनासाठी आणि समाजातील दुःख नाहीसे करण्यासाठी अहोरात्र संघर्ष केला. त्याचाच परिणाम म्हणजे दलित साहित्य प्रवाहाची निर्मिती होय.

मानवाच्या जीवनातील अंधार ज्ञानरूपी प्रकाशाने दूर करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. समाजविकासाबरोबरच नैतिक मूल्ये जोपासण्याचे कार्य त्यांनी पार पाडले. ह्या सर्व सामाजिक बदलांचा परिपाक म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि आत्मचरित्र ह्या वाङ्मयप्रकारात विपूल लेखन झालेले दिसते. ह्या साहित्यप्रकारात सामान्य माणसाचे जीवनचित्रण आले. पण स्त्री मात्र उपेक्षित राहिली. ही स्त्री कोणाची तरी माता आहे. कोणारी तरी बहीण आहे. कोणाची तरी बायको आहे. परंतु तिला स्वतःचे अस्तित्व दिसत नाही. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही. एक उपभोग्य वस्तू म्हणून समाज तिचा स्वीकार करतो. स्त्री तर विश्वाची जननी समजली जाते, हे विधान राजकीयदृष्ट्या तिचे शोषण करणारे आहे. कारण टी.एस. इंलिएटच्या म्हणण्यानुसार कोणत्याही निर्मितीनंतर निर्मिकाचे अस्तित्व नष्ट होते. येथे सुद्धा स्त्रीला नावापुरतेच संबोधले जाते. थोडक्यात पुरुषप्रधान संस्कृतीची ती बळी ठरली जाते. दलित साहित्यात देखील कमी अधिक प्रमाणात तिच्या वाट्याला हेच दुःख आलेले आहे. तिच्याकडे बाई माणूस म्हणून

नाही तर माणूस म्हणून पाहिले पाहिजे. दलित साहित्यामध्ये दलित स्त्री रंगवली पण ती अनेकदा पराभूत झालेलीच दाखवलेली आहे. रूढी, परंपरा यात ती पिचली आहे. तिच्या मूक वेदनांना वाट करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांत अगोदर आपली लेखणी चालविली. तद्नंतर अनेक दलित साहित्यिक आपले विचार ध्वनित करू लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच दलित साहित्यिकांना मानवतावाद शिकविला. त्यांच्यामध्ये मानवतावादाची बीजे रुजविली. एवढेच नव्हेतर आपले संपूर्ण आयुष्य सर्वसामान्य माणसासाठी झिजविले, समतेचाच पुरस्कार केला. समाजात स्त्री-पुरुष समानता रुजविण्याचा प्रयत्न केला. स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्यास शिकविले. कोणत्याही प्रकारे जात, धर्म, लिंग, वंश ह्यावर आधारित विषमता त्यांनी नाकारून समतेचा पुरस्कार केला, समाजव्यवस्थेमध्ये मानाचे स्थान स्त्रीला निर्माण करून दिले. स्त्रीचा विकास हा समाजविकासाचा पाया आहे. हे विचारसूत्र मांडले. स्त्री-पुरुष समता नांदावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत हिंदूकोडबिल मांडले. परंतु काही कर्मठ विचारांच्या माणसांमुळे ते त्या काळात मंजूर होऊ शकले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या काळात ज्या ज्या समाजपरिवर्तनाच्या चळवळी राबविल्या. त्यामध्ये स्त्री वर्गाला देखील सहभागी करून घेतले. स्त्रीने देखील पुरुषाच्या बरोबरीने समाज परिवर्तनाच्या चळवळीत सहभागी होऊन नैतिक दृष्टीने सबल झाले पाहिजे, असे डॉ. बाबासाहेबांना मनापासून वाटत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. आपल्या विचारांनी तिला अंतर्मुख करून विचार करायला भाग पाडले. तिच्यात आत्मविश्वास वाढीस लावला. एवढेच नव्हेतर तिला महत्त्वाकांक्षी बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या ज्या सामाजिक चळवळी निर्माण केल्या त्यातही स्त्री अग्रभागी राहिली अगदी १९२७ चा महाडचा सत्याग्रह, १९३० चा काळाराम

मंदिर सत्याग्रह या सत्याग्रहात तर ह्या सहभागी स्त्रियांना तुरुंगवास भोगावा लागला. पण त्या डगमगल्या नाहीत. त्या सतत पुढेच जात राहिल्या. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांमुळे त्यांना आत्मभान आले. त्या आत्मशोध घेऊ लागल्या, म्हणूनच असे म्हणावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित स्त्रीला आत्मसन्मान दिला. आत्मबळ दिले. तिच्यातील सामर्थ्य जागे केले. तिच्यातील लढाऊ बाण्याचे दर्शन घडविले. ती विद्रोहाची, हक्काची भाषा बोलू लागली.

परिणामी दलित साहित्यिकांच्या लेखनातही ती अवतरली. पण ती थोडीशी कचखाऊ रूढी-परंपराग्रस्त, पराभूत, मनप्रवृत्तीची अशी आहे. ती दुय्यमस्थानी अशीच दाखविली आहे. दलित साहित्यात विशेषत: आत्मकथनात ती रूढी-परंपरा यातच ती भरडलेली दिसते. तिच्या मनाचा विचारच होताना दिसत नाही. उदा. दलित आत्मकथनामध्ये स्त्री प्रतिमा दुय्यमत्त्वाची दिसते. दलित स्त्रीचं शोषण इतर वर्गातील तर लोक करतातच शिवाय स्वत: दलित लोकही आपल्या स्त्रीचे शोषण करतात. एवढे मात्र नक्की प्रस्थापित स्त्रीच्या तुलनेत, सवर्ण स्त्रीच्या तुलनेत दलित स्त्री माणुसकीच्या हक्कांसाठी चालू असलेल्या संघर्षामध्ये आघाडीवर आहे. उदा. बलुतं मधील दलित स्त्री दारिद्र्यात पिचली आहे. परंतु मध्यमवर्गीय स्त्रीपेक्षा ही स्त्री अधिक धीट, मोकळी, कर्तबगार आहे. पण काही अंशी मध्यमवर्गीयांच्या संस्काराचे अनुकरणही करण्याची प्रवृत्तीही तिच्यात दिसते. बलुतंमध्ये दगडुची आई आणि आजी विधवेचे जीवन वाट्याला आल्यानंतरही पुनर्विवाह करीत नाहीत. हिंदू मूल्य जपण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. जातीयता नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहाची गरज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादाची आहे. तसा विचार दया पवार मांडताना दिसत नाहीत. लक्ष्मण मानेंच्या उपरा मध्ये देखील स्त्रीच्या मनाचा विचार होताना दिसत नाही. तिला अक्षरश: जनावरांप्रमाणे समजले जाते. तिची खरेदी विक्री होते पैसे घेऊन तिला गहाणही ठेवले जाते. सुंदर दिसणे स्त्रीला शाप

कसा आहे. ह्याचेही प्रत्यंतर उपरातील पारूमामीच्या व्यक्तिरेखेतून येते. स्त्रीची विटंबनाच येथे देखील पाहायला मिळते.

दलित आत्मकथनातील स्त्री जीवनावर एक नजर टाकली असता असे निदर्शनास येते की, दलित स्त्री दारिद्रयात पिचली आहे. तिचा घरात समाजजीवनात मानसिक शारीरिक कोंडमारा झाला आहे. ती अगतिकपणे जीवन जगताना दिसते. ती फक्त काबाड कष्ट करताना दिसते आणि पुरुष मात्र तिच्या जीवावर जगतात आणि परत दारू पिऊन्न तिलाच मारहाण करताना दिसतात. तिचा माणूस म्हणून विचार करताना दिसत नाही. जी जमनामावशी दया पवारांसाठी देहविक्रय करते. तिच्याकडे दया पवार मोठे झाल्यानंतर सोयीस्कर दुर्लक्ष करतात.

सर्वच स्तरावर दलित स्त्रीचे शोषण होताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जो विधायक आणि सम्यक परिवर्तनाचा बदल हवा होता तो येथे जाणवत नाही. स्त्री शोषणच येथे पहायला मिळते कमी अधिक प्रमाणात तराळ-अंतराळ, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, आठवणीचे पक्षी ह्या आत्मकथनातील स्त्रियांच्या वाट्यालाही असेच दु:ख आले आहे.

भारतीय राज्यटघनेने समाजाला स्वातंत्र्य-समता-बंधुत्त्व ही तत्त्वमयी दिली. परंतु एकाधिकारशाही, जुलूम, जबरदस्ती, दडपशाही ही मानवी प्रवृत्ती मात्र नष्ट झाली नाही. भारतीय राज्यघटनेने स्त्रीला मूलभूत हक्क दिले. समतेचे तत्त्व बहाल केले. पण ती समता मात्र तिला अनुभवायला मिळाली नाही. ती पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची बळी ठरली आहे. तिला सतत संघर्ष करावा लागला आहे. तिचे माणूसपण नाकारलेले दिसते.

मात्र बाबुराव बागुलांच्या साहित्यातील स्त्री विद्रोही भूमिका घेताना दिसते. उदा. 'सूड'ह्या दीर्घकथेतील नायिका जानकी स्वत:चे स्त्रीत्त्वच नाकारते. स्त्रीत्त्व झटकून टाकते. तिला बाईपण आवडत नाही. पुरुष व्हावे

असे तिला वाटते. ज्या पुरुषी व्यवस्थेने तिच्या देहाचा चोळामोळा केला आहे. त्या पुरुष व्यवस्थेलाच ती धडा शिकवते. ह्या कथेत बाबूराव बागूल स्त्रीचे माणूसपण अधोरेखित करतात. तिच्याकडे माणूस म्हणून बघण्याचा संदेश देतात. देव-धर्म-देश यापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे हे जानकीच्या व्यक्तिरेखेमधून स्पष्ट करतात.

स्त्री लेखिकांनी देखील स्त्रीचे दु:ख आपल्या लेखणीद्वारे चित्रित केले आहे. उदा. ज्योती लांजेवार यांनी आपल्या कवितेतून स्त्रीच्या व्यथा-वेदना-दु:ख मांडले आहे. येथील पुरुषप्रधान संस्कृती तर स्त्री दु:खाला कारणीभूत आहेच परंतु ईश्वराने देखील स्त्रीकडे कानाडोळा केला आहे. ह्यासंदर्भात त्या म्हणतात-

हे कृष्णा तुझ्या राज्यात
आया बहिणीवर अत्याचार
आणि तू डोळे मिटावेत असे फार
अरे अंगभर वस्त्र पुरवू नकोस
पण ते वस्त्र ओढणारे हात तरी मुळापासून छाटकू टाक
नाहीतर तुला दिलेला किताब परत कर

अशी सौम्यपण विद्रोहाची भूमिका ज्योती लांजेवार घेताना दिसतात. काही सन्माननीय अपवाद वगळता दलित साहित्यिकांनी देखील स्त्रीला दुय्यमस्थानीच ठेवले आहे. ती सतत अन्यायग्रस्त दाखविली आहे. तिचे माणूसपण नाकारले आहे. दलित स्त्री लेखिकांनी पुरुषी नजरेतूनच स्त्रीविषयक लेखन केले आहे. दलित साहित्यात अवतरलेली स्त्री रूढी-परंपराग्रस्तच आहे. ती व्यवस्थेविरुद्ध बंड करून उठत नाही. थोडीशी ती कचखाऊच वाटते. तिच्यावर हजारो वर्ष अन्याय अत्याचार झालेला आहे. तिचे आयुष्य दु:खानेच ओतप्रोत भरलेआहे. दलित लेखक-लेखिकांनी तिचे वर्णन केले. परंतु तिच्यात परिवर्तन व्हावे ह्या अंगाने लेखन केले नाही. परंतु प्रस्थापित साहित्यिकापेक्षा दलित साहित्यिक स्त्री सुधारणेबाबत उजवे

ठरतात. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. सारांश, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली, स्वातंत्र्य, समता-बंधुभाव ह्या त्रयींचा मुक्तपणे स्वीकार करणारी, विषमता नाकारणारी, स्त्री दलित साहित्यातून आविष्कृत होणे महत्त्वाचे वाटते. देव-धर्म-देश ह्यापेक्षा मानव सर्वश्रेष्ठ आहे, स्त्री श्रेष्ठ आहे. स्त्रीमुळेच पृथ्वीतलावर मानवाचे असित्व अबाधित आहे. ती जगाची निर्माती आहे. जननी आहे. हा विचार दलित साहित्यिकांनी समाजात रुजविणे अभिप्रेत आहे.

डॉ. शशिकांत साळवे
बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगव

अनुक्रमणिका


| अ.नं. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | दलित साहित्यातील स्त्री.. (प्रस्तावना) | अ६ |
| १. | भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्री-जीवन | १ |
| २. | दलित कथेतील स्त्री | २३ |
| ३. | दलित कवितेतून ध्वनित झालेले स्त्री-जीवन | ३८ |
| ४. | दलित कादंबरीतून आविष्कृत झालेले स्त्री-जीवन | ५६ |
| ५. | दलित नाटकातून अवतरलेली स्त्री | ८० |
| ६. | दलित आत्मकथनातील स्त्रीचे स्थान | १०३ |
| ७. | संदर्भग्रंथसूची | १२० |

# १. भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्रीजीवन

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे. ती कोणाची तरी माता आहे, कोणाची तरी बहीण आहे, कोणाची तरी बायको आहे, परंतु तिलास्वत:चे अस्तित्व दिसत नाही. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही. एक उपभोग्य वस्तू म्हणून समाज तिचा स्वीकार करतो. स्त्री जर विश्वाची जननी समजली जाते, असे म्हणून समाजव्यवस्थेत तिचे शोषण केले जाते. कारण टी.एस. इलिएटच्या म्हणण्यानुसार कोणत्याही निर्मितीनंतर निर्मिकाचे अस्तित्व नष्ट होते, म्हणजेच स्त्रीला फक्त नावापुरतेच निर्मिक संबोधले जाते.

बौद्ध काळात आणि वैदिक काळात स्त्री पुरुष समानता अस्तित्वात होती. परंतु सांस्कृतिक संक्रमण आणि विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्री ह्या ना त्या कारणाने बंदिस्त जीवन जगणारी स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नसलेली उपभोग्य वस्तू बनलेली दिसते. अगदी प्राचीन काळापासून ते २१ व्या शतकापर्यंत स्त्रीजीवन कसे बदलत गेले, आणि ती पुरुषप्रधान संस्कृतीचा बळी कशी ठरली, याचे सविस्तर विवेचन खालीलप्रमाणे केले आहे.

## १.१ भारतीय समाजव्यवस्था आणि स्त्रीजीवन :

मानवी प्रगतीच्या इतिहासात समाज आणि संस्कृती निर्माण होण्याच्या आधीपासून म्हणजे आदिम काळापासून स्त्री आणि पुरुष यांचे जवळचे संबंध राहिले आहेत. सुरुवातील अस्थिर जीवन जगणाऱ्या स्त्री पुरुषांचे भावसंबंधही तितकेच जिव्हाळ्याचे आणि स्नेहपूर्ण होते. प्राथमिक

अवस्थेत तर तिने समाजाचे नेतृत्व केले आहे. परंतु नैसर्गिकदृष्ट्या स्त्रीला काही मर्यादा पडल्या. त्यामुळे तिला पुरुषाधीन व्हावे लागले. अनेक शतके मानवापुढे एकच समस्या होती.१ ती म्हणजे निसर्गाच्या तडाख्यातून व इतर वन्य प्राण्यांपासून आपल्या जीवाचे संरक्षण करावयाचे. पुरुषाबरोबर स्त्री सुद्धा ह्या समस्येला तोंड देत होती. त्याचबरोबर मातृत्वाची जबाबदारीही तिला पार पाडावी लागते. प्रतिकूल परिस्थितीत जीवन कलहाला तोंड देता देता वरचेवर येणाऱ्या गरोदरपणा व प्रसुतिकाल येणे म्हणजेच जीवित रक्षणार्थ तिला पुरुषांवर विसंबून रहावे लागते. आपले व आपल्या कुटुंबाचे संरक्षण करणे त्याकरीता जरूर तेव्हा लढणे ही पुरुषांची कामे, ह्या पुरुषांच्या कामात जमेल तितकी मदत करून प्राप्त परिस्थितीत स्वत: व स्वत:ची अपत्ये ह्यांना तगवून धरणे हे स्त्रीच्या वाट्याला आले. अशा तऱ्हेने मूलभूत श्रमविभाजन स्त्री पुरुषांमध्ये जे झाले, ते अगदी शतकांपर्यंत कायम होते. जीवनाच्या धकाधकीला पुरुषाने तोंड द्यायचे व स्त्रीने जीवन संवर्धित करायचे, असे कार्य क्षेत्राचे विभाजन झाल्यावर स्त्री ही बरीचशी पुरुषावलंबित झाली.[१]

शेतीचा शोध लागल्यामुळे मानवाच्या जीवनात स्थिरता आली. आर्यांनी अनार्यांवर विजय मिळवल्यानंतर आर्यांच्या आगमनानंतर संस्कृतीचा विकास सुरू झाला. आर्य संस्कृतीत स्त्रीला उत्तम दर्जाची वागणूक मिळे. तिला स्वातंत्र्य होते. पुरुषाबरोबर समान अधिकार मिळालेले असून समाजात उच्च स्थानही होते. वेदकालीन समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते, कारण त्यांना पुरुषांप्रमाणेच स्वयंसिद्ध, बौद्धिक, आध्यात्मिक व सामाजिक जीवन होते. अशा जीवनाला आधारभूत भक्कम पाया म्हणून उपयोगी पडणारे शिक्षण स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मिळत होते. मुलांप्रमाणे मुलीचेही उपनयन करण्यात येई, कारण तो संस्कार म्हणजे शिक्षणार्थ गुरुगृही जाण्याचा आरंभ, असे समजले जात होते. स्त्री विद्यार्थिनीचे दोन गट असत. एक सदयोध्या म्हणजे ज्यांनी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अनुरूप पती निवडून गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याचा संकल्प

केला आहे, व दुसऱ्या ब्रह्मवादिनी म्हणजे आजन्म ब्रह्मचर्य पाळून अध्ययन अध्यापनाला वाहून घेणाऱ्या स्त्रिया.[२]

वेदकालीन समाजजीवनात स्त्रीचा पुरुषाच्या बरोबरीने दर्जा होता. याकाळात अनेकांची आक्रमणे झाली आणि त्यामुळे अशांतता निर्माण होऊन स्त्रीची सुरक्षितता धोक्यात आली. मुलीची जबाबदारी वडिलांवर आली. त्यामुळे तिच्यावर वडिलांचा हक्क ठरला. त्यांच्या इच्छेप्रमाणे तिला रहावे लागत होते. तिच्यावर अनेक बंधने लादली गेली. तिचे स्वातंत्र्य तिच्यापासून हिरावून घेतले. अशांततेच्या काळात शारीरिक शक्तीने तुल्यबळ नसणाऱ्या स्त्रियांचे रक्षण करण्याची जबाबदारी पुरुषांवर पडली. स्वाभाविकपणेच अविवाहित मुलींचे रक्षण पित्याला करावे लागले, आणि रक्षक म्हणून रक्षितांवर त्यांचा अधिकार मान्य झाला.[३]

स्त्री आपल्या संरक्षणाची जबाबदारी घेणाऱ्याच्या आज्ञेतच राहण्यात धन्यता मानू लागली, त्याचा परिणाम तिला पुरुषाच्या वर्चस्वात रहावे लागले. मध्ययुगीन काळात स्त्रियांचे स्थान डळमळीत व्हायला सुरुवात झाली. तिचे परावलंबित्व वाढले. संस्कृतमधील पुढील ओळी लक्षात घेता येतील.

पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने, पुत्रो रक्षति वार्धक्ये न स्त्री स्वातंत्र्यर्यहति.

'स्त्री' स्वातंत्र्यावर मर्यादा येऊन त्यांच्या सामाजिक दर्जात घसरण सुरू झाली. स्त्रियांच्या सामाजिक दर्जाला स्मृतिकाळापासून जी घसरण सुरू झाली, ती १९व्या शतकापर्यंत चालूच राहिली. २१ व्या शतकात थोड्याफार प्रमाणात स्त्रीला मोकळ्या हवेत वावरता येत आहे. वंशशुद्धीसाठी विवाह, धर्म संस्कार ठरविला. स्त्रियांना नैसर्गिकदृष्ट्या येणारी मासिक पाळी, गरोदरपणा, बाळंतपण, मुलाचे संगोपन अशावेळी स्त्रीला पुरुषांची गरज भासत गेली, आणि तिच्यावर परावलंबित्वाची वेळ आली. कुटुंब पुरुषप्रधान

बनून तिच्यावर अनेक बंधने लादली गेली. मनुस्मृतिसारख्या ग्रंथाने स्त्रीच्या पारतंत्र्याचा आलेखच मांडून ठेवला. स्त्री नियमांनी बांधून ठेवली. तिच्याकडून वेदांचे अध्ययन करण्याचा हक्क हिरावून घेतला. तिच्यावर धार्मिक बंधने घातली. तिला हेतुत: गुलाम बनविली. तिच्यावर स्त्रीविषयक दृष्टिकोन संकुचित केला. तिने पुरुषांच्या आधाराशिवाय राहू नये. तसे राहण्यास ती पात्र नाही, असे ठरवून टाकले. धार्मिक व वैवाहिक रूढीमुळे स्त्री ही पराधीन बनली, व काही स्मृतिकारांनी घटस्फोटाला विरोध केला. पुरुषांचे वर्चस्व त्यामुळे वाढत गेले, व स्त्री ही अधिकाधिक दुर्बल झाली. पुनर्विवाहाची परवानगी विधुराला होती. मात्र विधवेला नाही. विधवापण कोणत्याही वयात येवो. त्याबाबत घालून दिलेली सर्व बंधने पाळावी लागत. केशवपन सक्तीचे झाले. विधवेने चांगले कपडे दागदागिने वापरण्यावर बंदी आली. संसारातील कोणत्याही लोभांना व आनंदाला बळी पडू नये. अशाच स्वरूपाचे आयुष्य स्त्रियांनी घालवावे हेच समाजाला मान्य झाले. पतीच्या घरी गुलामासारखे राबावे लागत होते. आजही परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. समानतेचे विचार चर्चेपर्यंतच मर्यादित राहीले. स्वातंत्र्य शब्द मर्यादांनी बांधला आहे.[५]

ह्या काळातील बंधने फारच कडक होती. स्त्रियांना जे दु:खी जीवन जगावे लागले. त्या विरोधात कार्य करणे किंवा चळवळी उभ्या करणे, धर्मद्रोह मानून त्यासंबंधीचा दंडक मानला गेला. म्हणून स्त्रीमुक्तीचे प्रयत्न मध्ययुगीन काळातही होऊ शकले नाहीत. अनियंत्रित लैंगिक संबंध बंद करून विवाह संस्था हा संस्कार रूढ झाला. नैतिकतेच्या नावावर स्त्रीवर अनेक बंधने येऊन तिच्या व्यक्तिमत्त्व विकासाची वाट बंद केली. उपनयन विधी बंद करून तिचा शिक्षणाचा अधिकार काढून घेतला. शिक्षणाने स्त्रीमध्ये का? उत्पन्न होतो,तिला आत्मभान येते, ती विचार करून मत प्रदर्शन करू शकते आणि स्वत:वर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करू शकते. त्यामुळे तिला शिक्षणापासून दूर करण्यात आले. 'चूल आणि मूल' एवढेच तिचे कार्याचे क्षेत्र मर्यादित केले. त्यामुळे तिला दुय्यम दर्जा मिळून

स्त्री पुरुष विषमतेची दरी वाढण्यास मदत झाली. स्त्रीच्या पुनर्विवाहावर बंदी आणून पुरुषांनी मात्र बहुपत्नीत्वाची चाल सुरू केली. ह्या सर्व कारणामुळे स्त्रीला मुलीचा जन्म नको असे वाटायला लागले. त्यापेक्षा मुलगाच व्हावा असे वाटू लागले. नैसर्गिकदृष्ट्या स्त्री आणि पुरुष ह्यांच्या शारीरिक ठेवणीत फरक असल्यामुळे स्त्रीला, दुर्बल आणि उपभोग्य वस्तू म्हणून मानले गेले. स्त्रीला संपत्तीत वारसा हक्क तर ठेवला नाहीच अणि तिने स्वत: केलेल्या कमाईवर देखील पतीचाच हक्क होता व आजही चित्र तसेच आहे. विधवा स्त्रीला पुनर्विवाहावर बंदी आणून सतीची चाल अस्तित्वात आली. विधवेचे केशवपण करून तिला कुरूप बनवून तिचे सर्व हक्क काढून घेतले. तिला अगतिक जीवन जगावे लागले. तिच्या ज्या नैसर्गिक भावभावना होत्या त्यांचा कोंडमारा केला. सती जाणे ह्या पाठीमागे धर्माचा प्रभाव असल्यामुळे ते पुण्याचे काम समजले जात होते.

तेराव्या शतकातील मुस्लिमांच्या आक्रमणामुळे सतीची चाल अधिक दृढ होत गेली. मध्ययुगात जी आक्रमणे होऊ लागली, त्यामुळे हिंदूंनी आपली धर्मबंधने आधिक कडक करून ते पाळण्यातच धन्यता मानली. प्राचीन काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत स्त्रियांच्या उन्नतीचे मार्ग सर्व बाजूंनी बंद केले. स्त्रियांचे शिक्षण बंद पाडणे व त्यांना समाजात फारसा मान न राहणे, याला कारण म्हणजे आर्यांचे बाह्यांशी विविहसंबंध आले. हे एक आणि दुसरे कारण परकियांचे आक्रमणाचे दुष्परिणाम हेच भयानक व स्त्रियांच्या उन्नतीला मागे खेचणारे ठरले.[६]

पुरुषसत्ता टिकवून ठेवण्यासाठी धर्मशास्त्रकारांनी वेगवेगळे कायदे करून स्त्रीला उपेक्षित ठेवून तिचा विकास खुंटला. तिच्यावरील बंधने लोकांमध्ये रुजवण्याची पुरेपूर काळजी घेतली. पतीचेच वर्चस्व कायम ठेवून स्त्री दासी बनविली गेली. पतीची आज्ञा पाळणे व शारीरिक गरज भागवणे, एवढेच स्त्रीचे अस्तित्व मानले गेले. अनेक सामाजिक धारणा आणि संकल्पनांनी ती गुलामगिरीत खितपत पडली. ह्या संदर्भात गीता साने

म्हणतात, "धन्याने दिलेल्या आज्ञा दासाला निमूटपणे पाळाव्या लागत असल्याने, विवेक बुद्धीचा दासाला फारसा फायदा नव्हता. त्याने एखाद्या प्रश्नावर विवेक वापरून काही निर्णय घेतला व तो रूढ मार्गाविरुद्ध असला तर त्या निर्णयाप्रमाणे वागण्याचे धैर्य त्याला सहसा होत नाही. दास असणाऱ्या स्त्रियाही त्याला अपवाद नाहीत. परंपरेच्या उंबरठा त्या सहसा ओलांडत नाहीत."[७]

स्त्रियांवर एवढी बंधने आणि परंपरांचा प्रभाव होता की त्या स्वत:च परंपरा नाकारायला तयार होत नाहीत. स्त्रीची अंधश्रद्धा आणि अज्ञान यामुळे स्त्री ही धर्मावर आणि धार्मिक कल्पनांवर विश्वास ठेवते. कर्मविपाक पुनर्जन्माच्या सिद्धांताचा उपयोग आता स्त्री वर्गावरही जेत्यांनी केला गतजन्मीच्या पापामुळे स्त्री जन्म येतो किंवा वैधव्य येते, ह्या जन्मी धर्मविरहित कर्म करीत राहा, म्हणजे पुढील जन्मी तुला उत्तम गती प्राप्त होईल. इत्यादी बुद्धी भेदाचे हे कार्य अत्यंत यशस्वी झाले.[८]

स्त्रिया सुद्धा ह्या पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात आणि धर्माने घालून दिलेली बंधने पाळतात. त्यामुळे तिला अत्यंत हलाखीचे, सोशीतपणाचे, दु:खाचे जीवन जगावे लागते. चित्रण करताना शं.गो. तुळपुळे म्हणतात, "लीळाचरित्रादी महानुभाव ग्रंथातून स्त्रीजीवनाचे जे चित्रण दिसते ते यातनामय असेच आहे. काबाड कष्ट करणे, दळण कांडण करणे ह्यात तिचे आयुष्य व्यतीत होत असे. सारखा जाच, उरावर सवत येण्याची भीती, यामुळे माहेर एवढेच काय ते हक्काचे सुखाचे ठिकाण हा भाव स्त्रियांच्या मनात होता. एकीकडे भारतीय स्त्रीला देवता मानतात व दुसरीकडे तिचा छळ केला जातो अनेक अनिष्ठ रूढींनी तिचे जीवन ग्रस्त बनलेले होते."[९]

अकबर बादशाहाने उदारपणाने धार्मिक रूढी मान्य न करता सतीची चाल बंद करण्याचा प्रयत्न केला होता, मुलींचे विवाहाचे वय १४ वर्ष केले होते, वयस्कर स्त्रियांची पडदापद्धत बंद केली. हुंड्यास प्रतिबंध

करून एकपत्नीत्व ठरवले. राजकीय पातळीवर स्त्रीविषयक सुधारणा करण्याचे हे पहिले प्रयत्न म्हणता येतील. परंतु समाजाने त्याचा स्वीकार केला नाही. सनातनी विचारांचा पगडा असल्याने भारतीय मानसिकता स्त्रीविषयी बदलणे शक्य झाले नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री विषय विचार अतिशय उदार होता, स्त्रीचा सन्मान करण्याच्या अनेक कथा सांगता येतील. मराठेशाहीत काही परंपरा सैल झाल्या पण धर्मशास्त्राने घालून दिलेल्या प्रथा बंद झाल्या होत्या असे नाही. परंतु आदराची भावना निर्माण झाली होती. तिला हक्क प्रदान करण्यात आले नसले तरी त्यांना लिहिणे, वाचने ह्याबाबतीत स्वातंत्र्य मिळाले होते. पण ते उच्च वर्गापुरते होते. सर्वसामान्य स्त्री ही सामाजिक बंधनात अडकलेली होती. रूढींच्या बंधनातून जरी मुक्तता मिळाली असली, तरी कौटुंबिक जीवनात सुधारणा होण्यास सुरुवात झाली. स्त्रिया ह्या अनेक वर्षांपासून दु:खाच्या खायीत खितपत होत्या. परंतु पुरुष त्याबद्दल काहीच करत नाही. उलट स्वत:च्या कर्तबगारीवर गर्व करतात. ताराबाई पुरुष जातीला म्हणतात, "तुम्ही धैर्यवान, महाप्रतापी, व्युत्पन्न आहात ते मला मान्य आहे. वीज, तारा, अग्नीसारखी महाभूते देखील तुम्ही ताब्यात आणली. मोठमोठे शोध लावून यंत्राची निर्मिती केली, असे तुम्ही महापराक्रमी असताना स्त्रियांना दु:खाच्या खोल दरीतून वर काढण्याचा पराक्रम तुम्ही का करीत नाही?"[१०]

भारतीय समाजात स्त्रियांबद्दल दोन टोकांच्या भूमिका घेतल्या जातात, एकतर स्त्रीला देवता मानतात आणि दुसरा दृष्टिकोन स्त्री ही माणसाला भुलवणारी आणि कामापासून परावृत्त करून पाप करून घेणारी आहे. ह्या संदर्भात रमेश रघुवंशी यांनी आपले मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, "स्त्रीची एक प्रतिमा त्यांच्या मनात मातृस्वरूपातील परमपूज्य आदरणीय तिच्या पायावर लोटांगण घालावे अशी आहे. तर दुसरी आई बहिणी शिवार इतर सर्व स्त्रिया पुरुषाला भुलवणाऱ्या त्यांच्या शक्ती शोषूण

घेणाऱ्या त्याला बलहीन करणाऱ्या, दुष्ट, नीच, चंचल, अतिशय विषयलंपट अशी आहे. अगदी प्राचीनातील प्राचीन ग्रंथ, वेद, उपनिषदापासून, मनुस्मृतीपर्यंतचे ग्रंथ तुम्ही वाचले तर स्त्री बद्दलची ही परस्पर विरोधी दोन टोके अगदी भडकपणे रंगवलेली तुम्हाला दिसून येतील."[११]

हिंदूंची स्त्री बद्दलची ही दोन्ही टोकेच स्त्री समस्यांचे मूळ आहे, असे म्हणता येईल. एकीकडे बंधने घालून पतिव्रत्याचे धडे तिला दिले गेले. लैंगिक संकेत मांडणाऱ्या स्त्रीविषयक तिरस्काराची भावना निर्माण केली गेली. तिच्याविषयी हिंदू माणसांनी अनेक प्रकारच्या कल्पना व धारणा समाजमनात रूढ केल्या. ह्यांचे चित्रण डॉ. आश्विनी धोंडगे ह्यांनी केले आहे ते असे, "स्त्री ही देवी असो, रंभा असो वा चेटकीन तिच्या भोवती एक गुढ वलय आहे. स्त्रियांच्या वर्तनाचं तार्किक स्पष्टीकरण देता येत नाही. स्त्री ही लहरी आहे. स्त्रीचे अंतकरण कोण जाणू शकेल. साऱ्या जगाबद्दल विधान करता येईल, पण स्त्री स्वभावाबद्दल मात्र काही बोलता येणे कठीण, स्त्रीचे जग वेगळे आहे. स्त्री ही एक कोडे आहे." अशी विधाने साहित्यिकांपासून ते मानसशास्त्रज्ञापर्यंत आणि बुद्धिवाद्यांपासून ते तत्त्वज्ञान्यापर्यंत अनेकांनी केली आहेत.[१२]

स्त्रीला माणूस म्हणून वागविले जात नसून तिला एकीकडे देवी मानून तिची पूजा करतात, तर दुसरीकडे तिच्याकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहतात. तिला दुय्यम दर्जा देऊन तिची अवहेलना करून तिचा अपमान करून स्त्री केवळ शरीर सुखाचे साधन मानणे, ह्या समाजानी पुरुषांच्या मनात खोल स्थान निर्माण केले. त्यामुळे पुरुषांच्या मनातून ही समज निघून स्त्रीबद्दल उदार आणि योग्य भावना निर्माण होणे कठीण झाले आहे. प्राचीन काळात स्त्री पुरुष संबंधाना मान्यता होती. स्त्री पुरुषांना पूर्वी लैंगिक संबंधात मुक्त संचार करता येत होता. नंतर ह्या संदर्भात नीतिसंकेत निर्माण होऊन त्यासंबंधी कडक नियम करण्यात आले. त्यात पुरुषाला मोकळीक देऊन त्याने एकापेक्षा अधिक स्त्रियांसोबत लग्न केले तर तो पुरुषार्थ समजला

जाई. याउलट स्त्रियांवर कडक बंधने टाकली त्यांचे पाऊल वाकडे पडू नये म्हणून त्यांच्यावर बंधनांची चौकट निर्माण केली. स्त्रीचे पुरुषावर सर्वस्वी अवलंबून राहणे ह्याला कारणीभूत ठरले, असे वाटते. परंतु इंग्रजांच्या आगमनानंतर भारतात त्यांनी आपली सत्ता स्थापन करून नवीन मूल्ये भारतीय समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्त्रियांचे कर्तृत्व समाजासमोर येऊ लागले व तिच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलायला सुरुवात झाली.

## १.२ आधुनिक स्त्री-जीवन:

समाजाच्या सर्व अंगांना धार्मिक विचारांनी घेरले होते. आध्यात्मिक दृष्टिकोनातून भौतिक जीवनाकडे पाहिजे जात होते. शास्त्रप्रामाण्याचा लोकांच्या मनावर पगडा असल्याने धर्मग्रंथांच्या शिकवणुकीच्या पलीकडे लोकांची दृष्टी जात नव्हती. धर्मपालन आणि धर्माचरण हे लोकांचे कर्तव्य बनलेले होते. संत मंडळींमुळे समाजात धार्मिक क्रांती आणि मराठा राज्यकर्त्यांमुळे राजकीय क्रांती झाली. परंतु समाजक्रांती झालेली नव्हती, त्यामुळे स्त्रियांचे जीवनमान त्यांचा स्तर उंचावला नव्हता. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या मृत्यूनंतर ह्या पेशवाईचा ऱ्हास झाला, आणि इंग्रजांची सत्ता स्थापन झाली. म्हणून त्यामुळे समाजजीवनात बदल झाला. सुरुवातीला जरी स्त्री जीवनात बदल झाले नसले तरी, हळूहळू स्त्री जीवनमानात सुधारणा होऊ लागली.

भारतीयांच्या धार्मिक भावना दुखावल्यानंतर ते चिडून उठतील म्हणून त्यापासून इंग्रज सत्ता दूरच राहिली. त्यामुळे सुरुवातीला समाजसुधारणा झाली नाही. केवळ न्याय सुधारणा होत्या, त्या राजकीय

हेतूने प्रेरित होत्या. इंग्रजांच्या नव्या मूल्यांची हळूहळू येथे रुजवणूक होऊन येथील लोकांचा धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक दृष्टिकोन हळूहळू बदलायला सुरुवात झाली. राजकीय क्रांती बरोबरच एक प्रचंड मोठी मानसिक क्रांती व्हायला सुरुवात झाली होती. इंग्रजी सत्ता येथे भक्कम झाल्यानंतर समाजजीवनात अनेक बदल घडून येऊ लागले. राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक भौतिक सुधारणा होऊ लागल्या.

ब्रिटिशांनी राजकीय सुधारणा तर केल्याच त्यासोबतच सामाजिक, भौतिक सुधारणांना महत्त्व दिले होते. दळणवळणाची साधने निर्माण केली. उद्योग व्यापार, बँका सुरू केल्या होत्या. यांत्रिकीकरण आणि कारखाने सुरू केले. त्यामुळे नव्या मानवी मूल्यांची प्रतिष्ठा निर्माण होण्यास मदत झाली होती. ब्रिटिशांच्या नव संस्कारांच्या क्रिया प्रतिक्रियांचा प्रारंभ झाल्याने भारतीय समाज मनावर पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव पडू लागला होता. त्यांच्या आधुनिक जीवन मूल्यांची जाणीव झाली होती. त्यामुळे परिवर्तन घडवून येण्यास गती आली. हिंदूंच्या मानसिकतेत बदल झाल्यामुळे नवीन जीवनविषयक दृष्टिकोन तयार झाला. कुटुंबातून होणारे परंपरागत सनातनी संस्कार त्यांना नको वाटू लागले. रूढिग्रस्त कुटुंबातून बाहेर पडून तत्कालीन समाजातील मुक्त वातावरणात मिसळून स्वत:चे हित साधण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली. त्यांच्या ठिकाणचे प्रतिगामित्व जाऊन पुरोगामी विचारांचा स्वीकार करून त्यांनी जीवनाचे सार्थक करायचे ठरवले. यशप्राप्तीसाठी परमेश्वरावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वकर्तृत्वावर लोकांनी विश्वास ठेवला आणि ते संयुक्त कुटुंबातून वेगळे झाले. ह्या विभक्त कुटुंब पद्धतीबरोबर समाजातील सर्वच स्तरावर उलथापालथ होऊ लागली.

इंग्रजांनी राज्यकारभारासाठी सामजिक सुधारणांना अग्रक्रम दिला होता. भारतीयांना पाश्चात्त्य विद्येचे ज्ञान देण्यासाठी त्यांनी शैक्षणिक धोरणांची आखणी करून अमंलबजावणी केली. भौतिक शिक्षण विज्ञाननिष्ठ आणि विवेकवादी शिक्षण भारतीयांना देण्यास प्रारंभ केला. इ.स. १८०४

एशिॲटिक सोसायटीची स्थापना होऊन भारतीय विद्येचे ज्ञान ग्रंथालय, ग्रंथप्रकाशन व वाचनालये सुरू केली.

इ. स. १८१५ साली बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाल्याने त्यांच्यामार्फत इंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्था सुरू झाल्या. इ.स. १८१३ ते १८१८ शिक्षण विकासाला चालना दिली. इ.स. १८१७ साली हिंदू कॉलेज नावाची पाश्चात्त्य शिक्षण देणारी संस्था सुरू झाल्याने इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला. १८२० साली एल्फीस्टनच्या प्रेरणेने एतदेशियांसाठी नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊन देशी भाषेतून शिक्षण सुरू झाले. इ.स. १८२३ पासून शिक्षणविषयक कायदा करण्यात आला. इ.स. १८३० साली मुलामुलींच्या स्वतंत्र शाळा सुरू झाल्या. इ.स. १८३३ पासून इंग्रजी माध्यमातून ज्ञानविज्ञानाचे शिक्षण देण्यात आले. त्यामुळे उच्चशिक्षण मिळू लागले. १८३४ ला उच्च शिक्षणासाठी जनरल असेंब्लीज इन्स्टिटयूशन नावाची संस्था स्थापन करण्यात आली. इ.स. १८४६-४८ ला वैद्यकीय, अभियांत्रिकी व कायद्याचे शिक्षण देण्यासाठी संस्था स्थापन केल्या गेल्या.

इ.स. १८५४ नंतर शिक्षण विभाग विद्यापीठाची स्थापना केली. शिक्षकांच्या प्रशिक्षण संस्था, सहकारी शिक्षण संस्थांसह आणि प्राथमिक, माध्यमिक शाळांना अनुदान अशी शैक्षणिक धोरणे कार्यान्वित झाली. इ.स. १८५७ ला मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. इ.स. १९१७ मध्ये मुंबई महिला विद्यापीठाची स्थापना झाली. इ.स. १९३७ पर्यंत उच्च माध्यमिक उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढून त्या जवळ जवळ सर्वच क्षेत्रात पदार्पण करू लागल्या. म्हणजे ब्रिटिशांच्या ह्याशिक्षण क्षेत्रातील उत्तम कार्यामुळे आधुनिक विचारवंतांची पहिली पिढी शिक्षण घेऊन तयार झाली, आणि ह्यापिढीने जनजागृती करून धार्मिक, सामाजिक सुधारणा करण्यास सुरुवात केली. ह्या सर्व गोष्टींचे श्रेय हे इंग्रजांना जाते. ह्या संदर्भात डॉ. कशाळीकर म्हणतात, "भारतात ब्रिटिशांचे राज्य स्थापन झाले ही घटना भारतीय अस्मितेच्या दृष्टीनेकितीही दुर्दैवी असली आणि भारतामध्ये

राज्यस्थापनेमागे ब्रिटिशांचा हेतू कितीही स्वार्थी असला तरी भारताच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीने ही एक इष्टापत्तीच होती."[१३]

भारतामध्ये स्तरविभाजन हे जातीच्या आधारे असून येथे मांग, महार ह्यांना अस्पृश्य मानून त्यांच्यावर अत्याचार होत्तं. परंतु ब्रिटिशांच्या काळात थोडी सुधारणा झाल्याचे दिसते. ह्या संदर्भात मुक्ता साळवे यांनी आपल्या "कोणता धर्म तो?"ह्या निबंधात एक वाक्य लिहिले आहे ते महत्त्वाचे वाटते. इंग्रजांबद्दल त्या म्हणतात, "आता नि:पक्षपाती दयाळू इंग्रज सरकारचे राज्य आल्यापासून एक चमत्कारिक गोष्ट झाली आहे."[१४]

समाज सुधारकांनी आधुनिकीकरणासाठी प्रयत्न केले. समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा मोडीत काढून स्त्री पुरुषांमधील विषमतेची दरी कमी करण्याचा प्रयत्न केला. ह्या संदर्भात प्रतिभा रानडे यांनी "स्त्री प्रश्नांची चर्चा"ह्या ग्रंथात असे म्हटले आहे, "विचारवंतांना आढळून आले की, आपली समाजव्यवस्था कुजलेली आहे. त्यातील जीवनोत्साह संपलेला आहे, त्याची कारणे शोधू लागल्यावर अशा परिस्थितीला जबाबदार असलेली प्रमुख गोष्ट म्हणजे आपल्या स्त्रियांची निकृष्ट परिस्थिती, विशेषत: उच्चवर्णीय ब्राह्मण स्त्रियांची अत्यंत खालावलेली परिस्थिती ह्याबद्दल विचारवंतांची खात्री पटली. ह्या परिस्थितीला जबाबदार 'स्त्री' समस्यांची जाहीरपणे चर्चा होऊ लागली. बालविवाह पद्धती, वैधव्य, शिक्षणाचा अभाव, स्त्रीकडे पाहण्याची प्रवृत्ती यामुळे स्त्रीला संपूर्णपणे अभावग्रस्त नकारात्मक जीवन जगावे लागते. हा विचार त्या विचार मंथनातून पुढे आला. त्यातूनच सामाजिक सुधारणांची चळवळ सुरू झाली."[१५]

इंग्रजांच्या लोकशाही तत्त्वाचा आदर करून त्यांच्या वर्तनाला सुधारकांनी ईश्वरी प्रसाद मानले. इंग्रजांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता ह्या आधुनिक विचारांचा स्वीकार करून लोकजागृती करण्यास सुरुवात केली.

स्त्री हा समाजातील महत्त्वाचा घटक असून तिला पुरुषांप्रमाणेच समान दर्जा व हक्क मिळावे म्हणून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले. ह्या संदर्भात सौ. हेमा जवंजाळ म्हणतात, भारतीय समाजसुधारकांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी त्यासाठी अनेक प्रकारचे कष्ट उपसले. प्रसंगी समाजाकडून होणारी अवहेलनाही सहन केली. समाजसुधारकांच्या ह्या प्रयत्नांना इंग्रज सरकारची साथ ही काही प्रमाणात मिळाली."[१६]

स्त्रियांच्या सामर्थ्याला समाजासमोर आणण्यासाठी व समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न चळवळी सुरू झाल्या. ह्या संदर्भात डॉ. गीता साने म्हणतात, "उदारमतवादी सुधारक वैचारिक चळवळीने 'स्त्री' विषयक जुनी विचारसरणी व तिच्या वहीवाटी यांच्यावर हत्यार धरले सती, नवजात कन्येची हत्या, विधवाविवाह बंदी, केशवपन, जे जे नव्या सामाजिक न्यायाच्या व समतेच्या निकषांवर हिणकस ठरले ते ते बदलण्याचा या चळवळीने प्रयत्न केला. त्याच प्रयत्नातून एकोणिसाव्या शतकात समाजसुधारकांची एक अखंड परंपरा निर्माण झाली. राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद, म. फुले, आगरकर, महर्षी कर्वे, इत्यादी नावे इतिहासात अजरामर झाली. तथापि ह्या प्रयत्नाच्या बुडाशी दूरदृष्टीने केलेले नियोजन नव्हते, तर समोर असणारी तत्कालिक अडचण निवडण्याची धडपड होती."[१७]

समाजाच्या एकूणच देशाच्या विकासात स्त्रीचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे समाजसुधारकांनी ओळखले होते. स्त्रीशिवाय आणि स्त्री शिक्षणाशिवाय समाजाचा विकास करता येत नाही. हे विचारवंतांना मान्य होते. म्हणूनच जोतिराव फुले ह्यांनी इ.स. १८४८ साली मुलींची पहिली शाळा काढली. स्वत:च्या पत्नीला शिकवून शिक्षिका म्हणून तयार केले. त्यामुळे स्त्री जीवनातील अंधकार दूर होऊ शकला, त्या विकासाच्या दिशेने वाटचाल करू लागल्या. नंतर मुलींची शिक्षणाची संख्या वाढत जाऊन पुढे

सरकारने मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन इ.स. १८५७ पासून मुलींचे खास वर्ग चालविले. इ.स. १८६४ पासून मुलींच्या शिक्षणावर विशेष लक्ष देऊन अधिक खर्च करण्यात आला. इ.स. १८७० साली पुण्यात ट्रेनिंग कॉलेजही काढण्यात आले. त्यामुळे मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका तयार होऊ लागल्या. वेगवेगळ्या प्रकारचे अभ्यासक्रम आणि व्यवसायाचे शिक्षण मिळू लागले. स्त्रियांसाठी वैद्यकीय शिक्षणाची सोय झाल्याने इ.स. १८८६ मध्ये आनंदीबाई पहिल्या डॉक्टर झाल्या. एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या धोरणाची अंमलबजावणी होऊनही सुरुवातीला स्त्री शिक्षण मागे राहिले, कारण परकीय संस्कृतीच्या भीतीने पालक मुलींना शाळेत पाठवत नव्हते. मुलींच्या बाबतीत कुटुंब आणि समाज ह्यांचा दृष्टिकोन उदार झाला नव्हता. मुलगी आणि मुलगा असा भेद केला जात होता. समाजातील रूढी प्रथांमुळे "स्त्री" शिक्षणाचे प्रमाणे कमीच राहील, तरी सुद्धा स्त्री शिक्षणाचे द्वारे खुली झाली, हे सुद्धा महत्त्वाचे वाटते. ह्या सर्वांमागे इंग्रजांचेच सहकार्य मानावे लागेल. स्त्री शिक्षणाच्या संदर्भात गो.ग. आगरकर म्हणतात, स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचे शिक्षण द्यावे किंवा नाही, ह्या प्रश्नांची एव्हांना चर्चा करीत बसणे म्हणजे काही अंशी वेडेपणाच आहे. विद्या ही एक प्रकारचे धन आहे व इतर धनिकांप्रमाणे विद्यारूप धन ज्यास प्राप्त झाले आहे. त्यापैकी कित्येकांना ते दुसऱ्यास देऊ नये असे वाटते. सुधारलेल्या राष्ट्रांना एवढे तरी वाटू लागले आहे, की झाडून साऱ्या स्त्रियांना व पुरुषांनी व मुलांना आणि मुलींना प्राथमिक शिक्षण मिळालेले असावे, अगर मिळावे. आमच्या येथे अजून असे वाटू लागावयाचे आहे."[१८]

स्त्रियांच्या शिक्षणाशिवाय राष्ट्राची प्रगती अशक्य आहे. हे समाजसुधारकांनी ओळखले होते. म्हणून स्त्री शिक्षणाला विरोध असूनही त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले आणि पुढे अनेक शाळा निघून मुली शिक्षण घेऊ लागल्या. तरीही सुरुवातीला मुलींच्या शिक्षणाबाबत समाज फारसा उत्साही नव्हता. ह्याबाबतीत कमलाबाई टिळक म्हणतात,

"राज्यकर्त्यांना सल्ला देणाऱ्या पंडितांनी सांगितले असावे की आमच्या धर्मात स्त्रियांना वेदाधिकार नाही. ज्ञानाचा शिक्षणाचा अधिकार नाही. आमच्या स्त्रियांना समाजातील दर्जा अर्भक किंवा सेवक ह्या पायरीत आहे. इंग्रज बिचारा चूप बसला. इ.स. १८३५ च्या शिक्षणविषयक फतव्यात 'स्त्री' शिक्षणाचा उल्लेख कटाक्षाने गाळण्यात आला."[१९]

तरी सुद्धा इंग्रज सरकारने तरुण पिढीच्या आग्रहावरून १८५४ पासून "स्त्री" शिक्षणविषयक धोरणांची कलमे तयार करून मुलींसाठी खासगी तसेच सरकारी शाळा काढल्या, मुलींची शिक्षण घेण्याची संख्या वाढून त्यांच्यात जागृती घडून आली. स्त्रियांबद्दल जी कडक बंधने होती, ती हळूहळू मोडीत निघाली. त्यांना कायद्याने संरक्षण मिळू लागले. सावित्रीबाई फुले यांनी सुद्धा स्त्री शिक्षणासाठी वेगळे स्वतंत्र कार्य केले आहे. अज्ञानाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी शिक्षणाची दारे खुली करून दिली. शिक्षणाच्या संदर्भात सावित्रीबाईंचे विचार महत्त्वाचे ठरतात. स्त्रियांच्या दु:स्थितीला त्यांचे अज्ञानच जबाबदार आहे. हा त्यांचा स्वानुभवातून मांडलेला सिद्धांत होता. भगिनींनो साक्षर व्हा आणि निर्भय व्हा हा संदेश त्यांनी दिला.[२०]

ब्रिटिश सरकारच्या मदतीने विविध वाईट चालीरीती कायद्याने बंद करून स्त्रीविषयक समाजप्रबोधनाला वेग आला. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि संरक्षणाचे विविध कायदे निघाल्याने स्त्रियांच्या जीवनात परिवर्तन घडून आले. स्त्रियांचा विकास होऊ लागला. भारतीय राजकीय स्थित्यंतर उशिरा झाल्यामुळे गेल्या शतकातील वैचारिक प्रगतीचा लाभ सहानुभूतीदार पुरुषांच्या पाठिंब्यामुळे भारतीय स्त्रीला कायद्याने मिळाला.

१९ व्या शतकात समाजाला नवे भान येऊन स्त्रियांना स्वहक्काची आणि स्वातंत्र्याची जाणीव होऊ लागली. अनेक प्रकारचे प्रयत्न आणि सामाजिक चळवळी यामुळेच स्त्रियांना सामाजिक, राजकीय व आर्थिक

स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्त्री ही कर्तृत्ववान असून तिने आत्मविश्वासाने आर्थिक व सामाजिक क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवून दिले. ह्या संदर्भात स्वाती कर्वे म्हणतात, "स्त्रियांचा राष्ट्रीय चळवळीत सहभाग, शिक्षणाचा विस्तार, दुसरे महायुद्ध, चित्रपटांचा आरंभ, चित्रपट व रंगभूमी क्षेत्रात स्त्रियांचा प्रवेश, समाजवादी विचारांचा सुशिक्षितांवरील प्रभाव स्त्रियांना नोकरीसाठी बाहेर पडण्यास सुरुवात झाली."[२१]

सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये झालेली वाढ आणि शहरांना महानगराचा चेहरा प्राप्त होण्यास झालेली सुरुवात इत्यादी घटनांनी १९३० ते १९५० ही वीस वर्षे व्यापलेली आहेत. स्त्री शिक्षणाची जाणीव हे दुसरे टोक आहे. प्रारंभी शिक्षण हे महत्त्वाचे केंद्र होते. शिक्षणाच्या जाणिवेने संपूर्ण स्त्रीजीवनाचे नव्या जुन्या समाजाचे संस्कृतीचे पुनर्मूल्यांकन होत होते. यामध्ये स्त्रियांचे जीवन सुधारल्याशिवाय ह्या देशाची प्रगती होणार नाही. ह्या विचारांचा हिरहिरीने पुरस्कार केला जात होता. स्त्रियांची योग्यता पटवून देणे स्त्रियांच्या विषयी नव्या दृष्टीने विचार करणे, यासाठी समाजाचे वैचारिक प्रबोधन सातत्याने केले जात होते.[२२]

१९व्या शतकात वैचारिक मंथन घडून आल्याने ते स्त्रियांच्या पथ्यावर पडले होते. स्त्री जीवनातील प्रश्न सुटण्यासाठी समाजजागृती करणे आवश्यक होते. एकीकडे समाजाचे प्रबोधन होत होते तर दुसरीकडे भौतिक व सामाजिक घटना, घडामोडी घडून येत होत्या. अशा संक्रमण काळात स्त्रीला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे महत्त्वाचे मानले गेले होते. त्यात बऱ्याच अंशी यशही आले. स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य मान्य केले जाणे, म्हणजे पुरुषी संघटनाबरोबर स्त्री संघटना व स्त्रियांची चळवळ ह्याची ती फलश्रुती होती. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीविषयक भूमिका अधिक व्यापक बनली.

इ.स. १९७५ नंतर स्त्रीदशक जाहीर झाल्यामुळे स्त्रीवादी विचारांची लाट सर्व जगभर पसरली आणि भारतातही 'स्त्री' मुक्तिवाद उदयाला आला. भारतीय स्त्री धीटपणे संघटित होऊ लागली. तसेच सर्वच क्षेत्रात आपल्या भूमिका व कर्तव्याचा ठसा उमटविला. लोकशाही समाजरचनेमुळे अधिकाधिक संख्येने स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात सहभागी झाल्या. नोकरी आणि व्यवसायाच्या क्षेत्रात त्यांनी मुसंडी मारली. शिपाई पदापासून ते उच्च पदस्थ अधिकारी आणि संशोधन क्षेत्रे, मेडिकल, इंजिनिअरिंगमध्ये ही त्यांनी प्रवेश केला. ह्या गोष्टी घडून आल्या आणि ग्रामीण स्त्रिया उपेक्षित राहिल्या. कारण त्यांच्यापर्यंत स्त्रीमुक्ती संघटना पोहचल्या नसल्याने त्यांच्यात जागृती घडून येऊ शकली नाही.

परंतु इ.स. १९८० नंतर ग्रामीण भागापर्यंत विकासाच्या योजना जाऊ लागल्या, तसतसे परिवर्तन होऊ लागले. शिक्षणाचा खेडोपाडी प्रसार झाल्याने 'स्त्री' शिक्षणाचे प्रमाणही वाढले. त्यामुळे लोकशाहीने दिलेले हक्क व अधिकारांची जाणीव जागृती स्त्रियांमध्ये झाली. कायद्याने मिळालेल्या संरक्षणामुळे तिच्या ठिकाणी शहाणपण आले. खेड्यातून शहरात जाऊन उद्योग नोकरी करण्याचे तिच्यात धाडस आले. तिच्यावरील जुनाट विचारांची बंधने सैल झाले ती देखील माणूस म्हणून आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखवू लागली. अशा स्त्रियांची संख्या कमी असेल परंतु, शेतकरी, मजूर 'स्त्री' देखील बऱ्याच प्रमाणात आधुनिक जीवनमूल्यांशी परिचित झालेली आहे. आधुनिक विचारांच्या प्रभावामुळे स्त्री स्वतंत्र झाली असली तरी तिला आजही अनेक बंधने पाळावीच लागतात. स्त्रीजीवनात झालेला बदल हा वरवरचा वाटतो. ह्या संदर्भात गीता साने म्हणतात, "भारतातील बहुसंख्य स्त्रिया ना मिळवित्या तसेच मोठ्या प्रमाणावर मिळवत्या स्त्रियाही आतपर्यंत केलेल्या विचारावरून स्वतंत्र नसून घराच्या वेठीच्या मजूर आहेत, हे स्पष्ट होते. मूठभर स्त्रिया खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाल्या तरी त्यांचे सामाजिक स्वातंत्र्य समाज मान्य करीत नाही. समाजाच्या परंपरांची

लक्ष्मणरेषा थोडी दूर सरकते एवढेच ही लक्ष्मणरेषा स्त्रिया जाणून ओलांडो वा अजाणता त्या मिळवत्या असोत वा न मिळवत्या समाज त्यांना कडक शासन करतो आणि त्या माणसातून उठतात."[२३]

मुलीवर कडक बंधने लावली जातात, त्यांना मुलांपेक्षा दुय्यम दर्जा कुटुंबात तसेच समाजात दिला जातो. मुलींचे शिक्षण केवळ चांगले विवाहस्थळ मिळावे म्हणून दिले जाते. ती फक्त एक उत्तम गृहिणी, माता आणि चांगली पत्नी बनावी एवढीच अपेक्षा असते. स्त्री आजही परावलंबी आहे. आत्मनिर्भर बनू शकली नाही. तिच्या समस्या समुळ नष्ट झाल्या नसून तिचे स्वातंत्र्य हे वरवरचे वाटते. तिला आजही पुरुषांच्या अहंकाराचा सामना करावा लागतो. सनातनी विचारांना डोक्यात ठेवून ते स्त्रीकडे पाहतात. त्यामुळे त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा उदार राहत नाही. तिच्याकडे सतत संशयाच्या दृष्टीने पाहतो. जवळपास दिडशे वर्षापासून स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समान हक्क मिळावेत म्हणून प्रयत्न होऊनही ती आजही पारतंत्र्यातच जीवन जगतांना दिसते. मग ती स्त्री नोकरी करणारी असो वा उद्योग व्यवसायातील वरीष्ठ पदावरील स्त्री असो तिला स्त्री म्हणून एक विशिष्ट पद्धतीनेच जीवन जगावे लागते. स्त्रीने तसेच जीवन जगले पाहिजे, असा समाजाचा दृष्टिकोन आहे. स्त्री स्वातंत्र्याच्या ज्या चळवळी स्त्रीमुक्ती दिन, जागतिक महिला दिन असे कितीही उपक्रम राबविले तरीही स्त्री ही पारतंत्र्यातच वावरताना दिसते. काही मोजक्या स्त्रियांना स्वातंत्र्य असले तरी सुद्धा एकूणच स्त्री स्वातंत्र्याचा विचार केला, तर आजपर्यंतच्या स्त्री स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांना पूर्णपणे यश आलेले दिसत नाही.

स्त्रीजीवनावर भारतीय संस्कृतीचा जबरदस्त प्रभाव असल्यामुळे स्त्रिया स्वत:च पुरुषाचा आधार सोडायला तयार नाहीत. स्त्रिया स्वत: कुठे एकट्या फिरत नाहीत. कुठेच जात नाहीत. स्वत:चा निर्णय सुद्धा तिला स्वत:च्या विश्वासावर घेता येत नाही. म्हणून ती आजही परावलंबी राहिली आहे. निर्भयता स्वत: विचार करण्याची शक्ती तिच्याजवळ आढळत नाही.

स्त्रीपणा जपण्यातच धन्यता मानते, आणि काही पुरुषार्थ गाजविण्याचा प्रयत्न केला, तर तिला समाजाचा विरोध पत्करावा लागतो.

मराठी साहित्यातही ती ह्याच पद्धतीने चित्रित झाली आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेची ती बळी ठरलेली आहे. दलित साहित्यातही ती कमी अधिक प्रमाणात पुरुषप्रधान संस्कृतीची बळी ठरली आहे. ती समाजव्यवस्थेत सतत अन्याय अत्याचार सहन करते आहे. शिवाय रूढी, परंपरा ह्यात ती पिचली आहे. भरडली गेलीआहे. गौतम बुद्धांनी आणि बाबासाहेब आंबेडकरांनी परंपरेच्या गर्तेत अडकलेल्या दलित समाजाला वर काढले, परंतु पुरुषी दृष्टिकोनातूनच दलित समाजाने स्त्रीला वागणूक दिली. मराठी साहित्यात स्त्रीकडे शूद्र, अतिशूद्र म्हणून पाहिले, तेच चित्रण दलित साहित्यिकांनी केले.

उपरोक्त विवेचनाधारे असे म्हणता येईल की, काळाच्या ओघात काही बदल झाले असले तरी, मानसिकतेत बदल झाला का? या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक मिळते. दुय्यमत्त्व कायमच आहे. शहरी व ग्रामीण भागात काही प्रमाणात परिवर्तनास सुरुवात झाली. शहरी शिकलेली स्त्री ही स्त्रीमुक्तीच्या चळवळीमुळे संघटित होताना दिसते, तर ग्रामीण स्त्री अल्पबचत गटांमुळे आणि राजकीय पदसंभामुळे म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषदा, बँका, सहकारी संस्था मधील महिलाआरक्षणामुळे पुढे येताना दिसतात, परंतु पद मिळून देखील पतीराज कायम असलेले दिसते. आज देखील धोंडाभेटीसाठी/हुंड्यासाठी जाळून मारण्याच्या आपप्रवृत्ती समाजात आहेतच. पुरुष क्रिकेट संघाची आणि संघटनेची लक्तरे वेशीवर टांगली जात असताना त्यांचा सन्मान होतो. उलट महिला क्रिकेट संघ पूर्ण दुर्लक्षित आहे, कॅप्टनचे नाव देखील माहीत नाही. शासनाचे कायदे गुंडाळून ठेवले जातात, ह्याला कारण मानसिकतेत आणि तेही स्त्री-पुरुष दोघांच्याही मानसिकतेत जो बदल व्हायला हवा परिवर्तन व्हायला हवे, ते होत नाही. शिवाय परिवर्तनाबरोबर स्वच्छंदीवृत्ती, चंगळवाद

स्त्री-पुरुषांमध्ये वाढीला लागला आणि नव्या पिढीवरील संस्कारांचा प्रश्न निर्माण झाला. शिकलेल्या दलितवर्गाने चांगले कार्य केले पण आपल्या कुटुंबीयांकडे डोळेझाक केली. त्यांचे प्रश्न वाढतच आहेत. चार्तुवर्ण्य व्यवस्थेने स्त्रीला चातुवर्ण्यांच्या अतिशूद्र पाचव्या वर्गात टाकले आणि ते आजही बदलले आहे, असे दिसत नाही. भोगवादी वृत्ती वाढतानाच दिसते. मग दलित स्त्री जीवनात प्रकाश कसा येईल.

हजारो वर्ष स्त्रीवर अन्याय अत्याचार झाला. गौतम बुद्धांनंतर पुन्हा बाबासाहेबांनी स्त्रीच्या हक्कासाठी संघर्ष केला. परंतु आजही आधुनिकतेच्या काळातही ती पूर्णत: मुक्त झाली नाही.

संदर्भटीपा :


१. घाटे चंद्रकला (संपा.), श्री. ना. बनहट्टी- 'भारतीय स्त्री : स्त्री शिक्षणातील संक्रमण', स्त्री शिक्षण संस्था पुणे, प्र.आ., १९६७, पृ. ११३
२. टिळक कमलाबाई, 'स्त्री जीवनाची नवी क्षितिजे', श्री गानू जगन्नाथ प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६५, पृ. ०३
३. पालेकर रामचंद्र, 'भारतीय स्त्री महाभारतकालीन स्त्रिया', संपा. श्री.ना. बनहट्टी चिटणीस के.रा. पारगावकर, स्त्रीशिक्षण संस्था पुणे, प्र.आ. १९६७, पृ. ०८.
४. भुसारी (डॉ.) निलकंठ (संपा.), 'महिला समस्यांचा आत्मशोध', अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, प्र.आ. ३ जाने. २०१३, पृ. ४१
५. काळदाते (डॉ.) सुधा, 'भारतीय समाजरचना', ज.रा. बर्दापुरकर, भारत मुद्रक आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्र.आ. १९६७, पृ. १३४

६. कानिटकर बाळकृष्णा, 'भारतीय स्त्री : पुराणकाळातील स्त्रिया',-संपा. श्री.ना. बनहट्टी चिटणीस के.रा. पारगावकर, स्त्रीशिक्षण संस्था पुणे, प्र.आ., १९६७, पृ. ४९
७. साने (डॉ.) गीता, 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ., १९८६, द्वि. आ., १९९७, पृ. १०५
८. साने (डॉ.) गीता, 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ., १९८६, द्वि. आ., १९९७, पृ. ०८.
९. तुळपुळे श.गो., दिक्षित म.श्री. (संपा.), 'मराठी वाङ्मयाचा खंड - १', साहित्य परिषद, पुणे, प्र.आ., १९८४, पृ. ३०
१०. शिंदे ताराबाई, 'महाराष्ट्राचे शिल्पकार ताराबाई शिंदे', (इंद्रजित भालेराव), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वि. आ., डिसेंबर २००८, पृ. ३१
११. रघुवंशी रमेश, 'स्त्री पुरूष-तुलना प्रस्तावना', (संपा. गजेंद्र रघुवंशी), रघुवंशी प्रकाशन, पुणे, पृ. ०२
१२. धोंड्गे (डॉ.) अश्विनी, 'स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि प्रयोजन', राज प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९३, पृ. ३८
१३. कशाळीकर (डॉ.), 'महाराष्ट्रातील समाजसुधारक', अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्र.आ., १९७८, पृ. ०२
१४. साळवे मुक्ता, 'कोणता धर्म तो?, साहित्य जागर', (संपा.) प्रा. पृथ्वीराज तौर, प्रा. सर्जेराव रणखांब, प्रतिभास प्रकाशन, परभणी, द्वि. आ., २०१०, पृ. २२,२३
१५. रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणिसावे शतक', पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्र.आ., १९८२, पृ. ३६७
१६. जवंजाळ (सौ.) हेमा, 'स्त्री शिक्षण - प्रगतीकडे एक पाऊल', (संपा. डॉ. निलकंठ भुसारी) अथर्व पब्लिकेशन्स्, जळगाव, प्र.आ. २०१३, पृ. २७९

१७. साने (डॉ.) गीता, 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ., १९८६, द्वि. आ., १९९७, पृ. १८

१८. आगरकर गो.ग., 'स्त्री पुरुषांना एकच शिक्षण द्यावे व तेही एकत्र द्यावे-स्त्री मुक्तीच्या दिशेने', (संपा.) चौघुले वि.श., सुवर्ण प्रकाशन पुणे, प्र.आ. १ जुलै, १९९१, पृ. २५

१९. टिळक कमलाबाई, 'स्त्री जीवनाची नवी क्षितीजे', जगन्नाथ प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९६५, पृ. २५

२०. सावित्रीबाई फुले, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया', (संपा.) खडसे सुनिता, खडसे संतोष, शुभम प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. ५३

२१. किर्लोस्कर शांताबाई, 'बायकोचा जन्म', स्त्री सखी प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७५,पृ. १०

२२. कर्वे स्वाती,'स्त्री साहित्याचा मागोवा खंड १', नियतकालिके साहित्यप्रेमी, भगिनी मंडळ पुणे. २००२, पृ. २४

२३. साने (डॉ.) गीता, 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशनगृह, मुंबई, प्र.आ., १९८६, द्वि. आ., पृ. १६१

# १. दलित कथेतील स्त्री

**प्रस्तावना :**

दलितकथेतील स्त्री आणि तिच्याकडे पाहण्याचा समाजाच्या एकूण दृष्टिकोनासंदर्भात ह्या प्रकरणात एकूणच भारतीय स्त्री जीवनात दलित स्त्रीचे नेमके स्थान काय आहे, हे समजूनघेणे अनिवार्य ठरते. भारतीय समाजजीवनाच्या क्षितिजावर अगदी रानटी अवस्थेपासून तर आजच्या आधुनिक काळापर्यंत स्त्रीचे समाजातील स्थान दुय्यम स्वरूपाचेच राहिले आहे असे दिसून येते. स्त्री आणि पुरुष हा भेद निसर्गत: निर्माण झाल्यामुळे पुरुष वर्गाचा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन हा भिन्न स्वरूपाचा आहे. प्राथमिक अवस्थेत आणि पुराणकाळात स्त्रीचे पुरुषाबरोबर असलेले स्थान समाधानकारक असेच होते. परंतु सांस्कृतिक संक्रमण आणि विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर 'स्त्री'ह्या ना त्या कारणाने बंदिस्त जीवन जगणारी स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नसलेली एक उपभोग्य वस्तू बनलेली दिसते. प्राचीन काळात आदराचे स्थान असलेली स्त्री आधुनिक काळात मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेची बळी ठरली. ह्या पार्श्वभूमीवर दलित कथेतील स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन नेमका कसा आहे,ह्याचा अभ्यास दलित कथाकार बाबुराव बागूल, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे आणि इतर काही निवडक कथाकारांच्या कथेतून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

## ➢ अण्णाभाऊ साठे :

दलित कथेचे शिल्पकार म्हणून अण्णाभाऊ साठे ह्यांचा गौरवाने उल्लेख करावा लागतो. ज्या जातीचे अस्तित्वच नाकारले होते, त्या मांग जातीत अण्णाभाऊ साठे ह्यांचा जन्म झाला. उपेक्षित जातीत जन्मलेल्या अण्णाभाऊंनी ह्या उपेक्षित जातीतील जीवनानुभव प्रत्यक्ष अनुभवले होते. अस्पृश्यतेचे चटके बालवयापासूनच शाळेतही अनुभवायला मिळाल्यामुळे त्यांचे शिक्षण झाले नाही. एहीर म्हणून प्रकाशात आलेले अण्णाभाऊ

आपल्याला आलेल्या अनुभवाच्या शिदोरीच्या जोरावर कथा कादंबऱ्या लिहून मराठी साहित्यविश्वात आगळेवेगळे स्थान निर्माण केले. अण्णाभाउ साठे हे नाव उच्चारताच त्यांच्या फकिरा कादंबरीचे नाव घ्यावे लागते. येथे त्यांच्या कथा वाङ्मयाचा परामर्श घेणे आवश्यक असल्याने त्यांच्या कथेतील स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे. 'खुळवाडी' (१९५७) हा त्यांचा पहिला कथासंग्रह होय. त्यानंतर त्यांनी 'बरबाद्या', 'कंजारी' आणि 'लाडी' असे अनेक कथासंग्रह लिहिले त्यांनी आपल्या कथांमधून मुंबईच्या बकाल वस्तीत जगणाऱ्या व जगण्याची जबरदस्त इच्छा असलेल्या गुन्हेगार जमातीतल्या माणसाचे त्यांच्या जीवनाचे अनुभव कथेत चित्रित केले आहे. अण्णाभाऊंच्या कथेतील माणसे जीवन संघर्ष करणारी प्रस्थापित समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या आर्थिक, सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज उठवणारी आहेत आणि म्हणूनच अण्णाभाऊ साठेंच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा ह्या शूर धाडसी आणि साहसी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारप्रबोधनातून आव्हानातून दलित स्त्रीची निर्माण झालेली अस्मिता व जागृती ह्याबरोबरच झालेल्या अन्यायाविरुद्ध संघर्ष ह्यांचे चित्रण अण्णाभाऊ साठेंच्या कथेत दिसते.

अण्णाभाऊ साठे ह्यांच्या 'डोळे' कथेची नायिका गीता नवऱ्यापेक्षा मी शंभर पटीने देखणी म्हणून तापत्या तव्यावर भाकरी जळावी तसा नवरा जळतो व मला जाळतो म्हणून बिचारी गीता दु:खी होते आणि एक दिवस दु:खाचा उगम आपल्या सुंदर डोळ्यात आहे असे म्हणून स्वत:चे डोळे फोडून घेते. ह्या कृतीतून गीताच्या धीट व तेजस्वीपणा दिसून येतो.

'दुर्गा' ही कथा एका वडाराच्या सुंदर मुलीच्या जीवनावर रचली आहे. परशा गुंड तिच्यावर आशक होतो व तिला त्रास देतो. नाथा नावाचा कामगार परशाचा खून करतो. ह्या कथेत स्त्रीची अब्रू संरक्षण करण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालणारा तरुण ही पाहायला मिळतो.

## ➢ शंकरराव खरात :

दलित कथेचे शिल्पकार म्हणून शंकरराव खरातांना सबोधाले जाते. दलित्त कथेशिवाय त्यांनी कादंबरी, आत्मचरित्र, समीक्षा आणि वैचारिक लेखन केले आहे. शंकरराव खरात हे मुख्यत: 'तराळ-अंतराळ' ह्या आत्मचरित्रामुळे मराठी साहित्यविश्वाला परिचित झाले. परंतु दलित कथा म्हटले की, शंकरराव खरातांना डावलून पुढे जाता येत नाही. शंकरराव खरातांचे संपूर्ण साहित्य हे वास्तवातून जन्माला आले आहे. त्यांनी प्रत्यक्षात जे जीवन भोगले, अनुभवले त्याचे जीवनचित्रण त्यांच्या साहित्य लेखनात आले आहे. ह्या संदर्भात स्वत: शंकरराव खरात म्हणतात, माझे प्रसिद्ध झालेले ललित वाङ्मय, कथा, कादंबऱ्या व लेख हे माझ्याच जीवन अनुभूतीतून साकारले आहे. अनुभूतीचे ढग भरून ह्याचे आणि त्यातूनच पाणी बरसायचे... साहजिकच गावच्या बलुतेदारांनी माझ्या बारा बलुतेदार ह्या कथा संग्रहात आकार घेतला. सांगावा, दौंडी, इत्यादी माझ्या कथासंग्रहात मी प्रत्यक्ष जीवनात भोगलेल्या, प्रत्यक्ष पाहिलेल्या घटनांनीच कथेने कादंबरीचे रूप घेतले.[१]

शंकरराव खरातांनी एकूण १० कथासंग्रह लिहिले ते पुढीलप्रमाणे 'बारा बलुतेदार' (१९५९), 'तडीपार' (१९६१), 'सांगावा' (१९६२), 'टिटवीचा फेरा' (१९६३), 'सुटका' (१९६९), 'दौंडी' (१९९५), 'आडगावचं पाणी' (१९७०), 'गावशिव' (१९७०), 'मुलाखत' (१९७८), 'माझे नाव' (१९८७) प्रस्तुत कथासंग्रहामधून त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेने बहुजन समाजव्यवस्थेवर केलेल्या अन्याय अत्याचाराचे सौम्य पण नेमक्या आणि संयम भाषेत चित्रण केले आहे. त्यांच्या काही निवडक कथांच्या आधारे दलित्त कथेतील 'स्त्री' जीवनाचा वेध घ्यावयाचा आहे. शंकरराव खरातांच्या कथेत येणाऱ्या स्त्रिया ह्या विविध स्तरातील आहेत. त्यांच्यावर होणारा सामाजिक व सांस्कृतिक अन्याय तसाच पुरुषांकडून होणारा अत्याचारही

निर्भीडपणे कथेतून मांडला आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उन्हातान्हात काबाडकष्ट उपसणारी स्त्री कथेतून चित्रित केलेली आहे. शंकरराव खरातांच्या कथेतील स्त्री-व्यक्तिरेखा ह्या आर्थिक व सामाजिक जीवनात संघर्ष देणाऱ्या आणि नवा जुना विचार घेऊन जगणाऱ्या आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेतील स्त्रियांचे एक विश्व तयार झाले आहे. स्वतःच्या संसारात आनंद फुलविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या आणि पारंपरिक व्यवसायाविरुद्ध व्यथा-विद्रोह प्रगट करणाऱ्या स्त्रिया. ह्या स्त्रिया वेगवेगळ्या जातीत जन्माला आल्या असल्या तरी ह्या स्त्रियांचे एक पारंपरिक दुःख आहे. ते दुःख खरातांनी व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून मांडलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अज्ञान, दारिद्र्य आणि अंधश्रद्धेची शिकार बनलेल्या आणि सवर्ण-शासकीय अधिकाऱ्यांच्या अन्यायाखाली भरडल्या जाणाऱ्या आणि सर्व व्यवस्थेतून वाट्याला येणारे दुःख निमूटपणे सोसणाऱ्या स्त्रिया आहेत. तर काही परंपरेच्या संघर्ष करणाऱ्या स्वाभिमानी दलित स्त्रियाही आहेत.[२]

शंकरराव खरातांनी आपल्या कथेतून काबाडकष्ट करून नवऱ्याला हातभार लावणारी दलित स्त्री उभी केली आहे. ही दलित स्त्री संसार सुखकारक होण्यासाठी आणि आपल्या मुलांना जगविण्यासाठी जीवाचे रान करते. शिवाय वाट्याला आलेले दुःख निमूटपणे सहन करते. 'बारा बलुतेदार' मधील 'रामा महार' ही कथा ह्या दृष्टिकोनातून विचार करायला लावणारी आहे. रामा महाराची पत्नी साऊबाई रामाला प्रत्येक कामात मदत करणारी आहे. नियमितपणे ती रोजगारासाठी मळ्या-वस्तीवर जात असते. कामावरून येतानाच ती जळणासाठी लाकूड फाटा आणते. घरातील मीठ-मीरची ती कशीबशी भागवते. कामाच्या ओढीने आणि संसाराच्या काळजीने ती वाळून-वठून जाते. परंतु त्याचा विचार न करता आपल्या संसारासाठी नवऱ्याबरोबर राबराब राबते.

'सांगावा' ह्या कथेतील रामा महाराची पत्नीही दुःखी जीवन जगताना आपल्या संसाराचीही काळजी घेते. रामा महार हा सांगावा

सांगायला जातो. घरात पोरं उपाशी असतात, धान्याचा कणही घरात नसतो. उपाशी पोटी सांगावा सांगून येतो. परंतु आल्यानंतर त्यांच्या पोटाचा विचार न करता त्याला परत लाकडं फोडण्याचे काम सांगितले जाते. तेव्हा मात्र तिला ह्या प्रस्थापित व्यवस्थेचा राग येतो. तिच्या बोलण्यातून रामा महाराच्या घरच्या दारिद्र्याची तसेच गावकीच्या कामाबद्दलचा तिच्या मनातील राग व्यक्त होतो. ती कामावरून मोकळ्या हातानेच परत आलेल्या नवऱ्याला पाहून त्याच्यावर रागावते, वैतागते आणि घरच्या दारिद्र्यामुळे दोघांत संघर्ष निर्माण होतो. संघर्षाचा परिपाक म्हणून रागाने ती नवऱ्याला म्हणते, बोलू न्हाय तर का तुमच्या म्होरं डोसकं फोडून घेऊ? कालच्यानं ती गावकी जाळायला गेलाय अन् एवढा दिवस वर करून आलाय. काय हाय का लेकराबाळांच्या पोटाची काळजी, असे म्हणून प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध राग व्यक्त करताना दिसते.[३]

दलित स्त्रीला घरात तर संघर्ष करावा लागतो. परंतु प्रस्थापित व्यवस्थाही तिच्यावर अन्याय अत्याचार करते, हे देखील शंकरराव खरातांची कथा नेमकेपणाने स्पष्ट करते. दलित स्त्री पिढ्यानपिढ्यांची एक भोगवस्तूच बनत आली आहे. पोलीस व सवर्णांच्या अत्याचाराला, वासनेला बळी पडलेल्या स्त्रियांचे हुंदकेही काही कथांतून व्यक्त होताना दिसतात. 'टिटवीचा फेरा' ह्या कथासंग्रहातील 'काळ' ही कथा ह्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. ह्या कथेत देशावर काळ पडला आहे, म्हणून शहरात जगायला आलेल्या धुरपाच्या नवऱ्याला पोलीस पकडून नेत असताना धुरपा हवालदाराने पाय धरून त्याच्यापुढे आपला पदर पसरून विनवून बोलते, सरकार उगीउगी माज्या दाल्ल्यावर का म्हण ह्यो आळ? तेनी तुमचा काय गुन्हा केलाय असं बोलताच हवालदार दंडुका उगारून म्हणतो, कोण रं हाय ही सिंदळ, धरा की तिच्या झिपऱ्या, असं म्हणून धुरपाच्या पेकटात लाथ मारतो. अशी ही पोलिसी अत्याचाराला बळी पडलेली धुरपा तर उद्दट आणि रानदांडग्या शासकाच्या वासनेला बळी पडलेली आबाची बहीण जया ही बारा बलुतेदार मधील आबा रामोशी ह्या कथेत भेटते.[४]

एकूणच शंकरराव खरातांच्या कथेतील स्त्री-चित्रणाचा विचार करता असे निदर्शनास येते की, स्त्री-मनातील भाव भावनांचे आंदोलन प्रभावीपणे टिपले आहे. स्त्रियांवर होणारा सामाजिक, सांस्कृतिक अन्याय जसा रेखाटला आहे. तसाच पुरुषांकडून होणारा अतयाचारही निर्भीडपणे मांडला आहे. तर काही कथांतील स्त्रिया परंपरेच्या व्यवसायाला नकार देताना दिसतात. गावकीच्या कामाबद्दल आपला राग व्यक्त करतात. गुलामीचं जीवन नको म्हणून नवऱ्याबरोबर संघर्ष करतात.

## ➢ बाबुराव बागूल :

मराठी साहित्यविश्वात विद्रोही साहित्यिक म्हणून बाबुराव बागूल सर्वपरिचित आहेत. स्वत: बाबुराव बागूलांनी आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीशी संघर्ष केला आहे. दलित महार म्हणून प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे आणि भोगलेला देखील आहे. बाबुराव बागुलांचे कथालेखन अभ्यासले असता ते आगळेवेगळे अनुभव विश्व उभे करते. बागुलांची कथा वेदांचे व दु:खाचे जीवन चित्रण करते. मुळातच समता, न्याय आणि मानवतेसाठी टाहो फोडणारी संघर्षशील अशी कथा त्यांनी लिहिली आहे. बाबुराव बागुलांनी कथा, कविता, कादंबरी ह्या सर्वच साहित्यप्रकारात लेखन केले आहे. येथे त्यांच्या कथासंग्रहाचा अभ्यास करणे अभिप्रेत आहे. त्यांनी 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९९३) आणि 'मरण स्वस्त होत आहे' हे दोनही कथासंग्रह म्हणजे एक आगळ्यावेगळ्या विदारक अनुभव सृष्टीची देणं होय. एवढेच नव्हे तर बाबुराव बागूल ह्यांच्या कथा विश्वामुळेच माणसांचे उघडेनागडे जीवन आणि सर्व सामान्य माणसांच्या व्यथा वेदना मराठी साहित्याला आणि समाजाला माहिती झाल्या.[५]

वरील दोन्ही कथासंग्रहात बाबुराव बागुलांनी रेखाटलेले 'स्त्री' दर्शन वाचक व रसिक वर्गाला दीर्घकाळ स्मरणात राहील, अशा स्वरूपाचे आहे. बागुलांची 'स्त्री' दर्शन चित्रणाची शक्ती अफाट व प्रचंड आहे. पुरुष

पात्राप्रमाणेच त्यांनी रंगवलेली स्त्री चिरकाल स्मरणारत राहील अशीच आहे. त्यांच्या कथेतील स्त्रिया जिवंत वाटतात. त्या सोशीक आहेत. त्यांच्यावर परंपरेने अन्याय व अत्याचार केले आहे. हा अन्यायच व अत्याचार केवळ परंपरेनेच केला नाही, तर प्रस्थापित समाज व पुरुष वर्गाकडून त्या नागवल्या गेल्या आहेत म्हणून त्या सतत तडफडत आहेत. तळमळत आहेत. सोशीक, पीडित, उपेक्षित, निराधार तळमळणाऱ्या स्त्रियांच्या मनाचा वेध त्यांची कथा घेते, वाचकाला विचार करायला प्रवृत्त करते. अगदी स्त्रीचे जीवन व तिचे प्रश्न बाबुराव बागूल तळमळीने रेखाटतात. त्यांचे अस्सल जीवन दर्शन घडवतात. कोणत्याही कल्पनेचा साज त्यांच्या कथेत दिसत नाही. अर्धपोटी, अर्धवस्त्रानिशी जगणाऱ्या ह्या स्त्रिया वेळप्रसंगी जगण्यासाठी आणि पोटासाठी देहविक्रय करतात, परंतु आपल्या मातृत्वापासून त्या कधी दूर जात नाहीत.

## ➢ जेव्हा मी जात चोरली होती :

'जेव्हा मी जात चोरली होती' हा कथासंग्रह १९६३ साली प्रकाशित झाला.[६] प्रस्तुत कथासंग्रहातून प्रकाशित झालेल्या कथांमधून विषम समाजव्यवस्थेमुळे निर्माण झालेली दरी आणि सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला आलेले दु:ख, ह्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी बागुलांची कथा अवतीर्ण झालेली दिसते. ह्या कथांमधून स्त्रीजीवनाचे चित्रण कसे झाले आहे, त्याचाच येथे विचार केलेला आहे.

'काळोखाचे कैदी', 'पेसूक', 'वाटेवरची' आणि 'स्पर्धा' ह्या कथांमधून 'स्त्री' जीवनाच्या व्यथा वेदना बाबुराव बागुलांनी चित्रित केल्या आहेत. 'काळोखाचे कैदी' कथेतील नायिका बानूला तिच्या वडिलांनी खंडोबाला मुरळी म्हणून सोडले आहे. ती सुंदर, देखणी असून तिला नवऱ्याविना एक मुलगा आहे. देवदासीला लग्न करता येत नाही, म्हणून तिचे वडील चिंताग्रस्त आहेत.

रामराव देशमुख नामक व्यक्ती बानू रूपवान असल्यामुळे बानूच्या वडिलांना पैसे देऊन बानूला रखेल म्हणून ठेवले जाते. परंतु बानू देशमुखांच्या वाड्यात आल्यामुळे त्याची पत्नी मरते आणि वाड्यातील मंडळी वाडा सोडून निघून जातात. कालांतराने रामरावाचाही मृत्यू होतो. रामरावचा मुलगा देवराम हा बानूचा सूड घेण्यासाठी वाड्यात घुसतो. पण बानूचा सूड घेण्याऐवजी त्याला बानूविषयी अभिलाषा निर्माण होते. पण तिला देवराम मुलासमान वाटतो. ती त्या गोष्टीला नकार देते. देवराम तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. पण बानूच्या प्रतिकारामुळे त्याला ते शक्य होत नाही. बानू जेव्हा देवरामच्या हातातून निसटते आणि पळू लागते. तेव्हा गावातील लोक तिची नग्नधिंड काढण्याचा प्रयत्न करतात. बानू मुरळी असूनही देशमुखीण बनते,[७] म्हणून गावातील लोक तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करतात. परंतु बानूचा मुलगा दौलत ह्या भयंकर लोकांचा खून करतो. स्वत: बानूला देखील ह्या गर्दीविषयी तिरस्कार निर्माण होऊन तिही हातात गुप्ती घेण्याचा प्रयत्न करते. भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत एका दलित स्त्रीने किंवा मुरळीने एखाद्या सवर्ण कुटुंबाची घरमालकीण होणे चालत नाही. परंतु तिचा भोग घेणे मात्र सवर्णांना चालते. हा अजब न्याय हिंदू संस्कृतीत पहायला मिळतो. आपल्या बापाच्या बायकोची (रखेल) अब्रू लुटावी असे देवरामला वाटते. ही गोष्टच निंदनीय आहे. बानू नातं ओळखते, नातं जपते. परंतु इथली पुरुषप्रधान व्यवस्था तिच्या शरीराकडे वाईट नजरेने पाहतात. ही गोष्टच चीड निर्माण करणारी आहे. स्त्रीच्या जीवनातील अगतिकता बाबुराव बागूल दाखवतात. बानू मुरळी होते. ह्यात तिचा कोणताच दोष नाही. इथल्या पुरुषप्रधान व्यवस्थेनेच स्वत:ची सोय व्हावी म्हणून तिला मुरळी केली आहे. पण शंभरांची भोग वस्तू होऊन वेश्येचे जीवन नशिबी स्वीकारण्यापेक्षा एकाचीच भोगवस्तू होऊन राहणे, तिला महत्त्वाचे वाटते, म्हणून ती रामरावांची रखेल म्हणून राहते. ह्यात तिचा कोणताही दोष नाही तर परिस्थितीनेच तिला हतबल केले आहे, हे बानूच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते. काळ बदलला पण

स्त्री जीवनाची वाताहत आजही थांबली नाही. आजही स्त्री जीवनात काळोखच आहे. आजही मुरळीच्या जीवनात काळोखच पसरला आहे हेच, बानूच्या व्यक्तिरेखेतून बागूल स्पष्ट करतात.

'पेसूक' कथेतील नायिका सावित्री आहे. सावित्रीचे लग्न जयदेव ह्या जमीनदार व्यक्तीशी होते. जयदेवने अपत्य प्राप्तीसाठी चार पाच विवाह केलेले आहेत. तरीही त्याला पुत्र प्राप्त होत नाही. मूल होण्यासाठी नातेवाईक पुरुषांबरोबर संबंध ठेवते, यातून तिला मूल होते. ह्या गोष्टीचा सर्व गावात बोभाटा होतो, म्हणून जयदेव सावित्रीचा छळ करतो. तिचे केस, नाक, स्तन कापतो, तिची नग्न धिंड काढली जाते. ह्या सर्व गोष्टीचा सावित्रीच्या मनावर विपरीत परिणाम होतो, ती रानावनात नागवी फिरते. एवढेच नव्हे तर रागाच्या भरात जाऊन जो पुरुष बायकोचा छळ करतो आहे. त्या पुरुषाचे ती नाक कापते. संपूर्ण गावावर तिची दहशत निर्माण होते. तिचा नवराही तिला घाबरू लागतो. एके दिवशी तो मरण पावतो, सावित्रीही त्याच्या पाठोपाठ सती जाते. ही कथा काका लहान मुलांना सांगत आहे. ही एक रहस्य कथा आहे. ह्या कथेतून सावित्रीच्या संदर्भात अनेक प्रश्न निर्माण होतात. परंतु एवढे मात्र निश्चित सावित्रीची विटंबना झाल्यामुळे ती पुरुष व्यवस्थेचा बदला घेण्याचा प्रयत्न करते. परंतु शेवटी नवऱ्या पाठोपाठ सती जाते. भारतीय व्यवस्थेत स्त्रीने असेच पुरुषाच्या पाठीमागे फरपटत जायचे का? असा प्रश्न निर्माण होतो. पुरुष वर्गाने केलेला अत्याचार व त्या अत्याचाराला सावित्रीने आपल्या परीने दिलेले उत्तर ह्या कथेतून बाबुराव बागूल रंगवतात.

### ➢ वाटेवरची :

ह्या कथेमधून बाबुराव बागुलांनी वेश्येच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. गिरजा नावाची वेश्या आपल्या लहान मुलाला गावी ठेऊन शहरात येऊन वेश्या व्यवसाय करते. एके दिवशी तिला गावाकडून तार येते.

हॉटेल मालक तिला तार वाचून दाखवतो. तिचा मुलगा मरण पावलेला असतो. परंतु कासम तिला खरी माहिती न सांगता मुलगा आजारी असल्याचे सांगतो. गावी जाण्यासाठी गिरजाकडे पैसे नसतात. पैशासाठी दु:ख विसरून ती गिऱ्हाईक खूष करते, पण गिऱ्हाईकाकडून तिला पैसे भेटत नाहीत. एकूणच 'वाटेवरची' ह्या कथेतील गिरजा परिस्थितीची बळी ठरते. अगतिकता आणि जीवन संघर्ष फक्त जगण्याकरता स्त्रीला सहन करावे लागते, आजही समाजात अशा अनेक गिरजा आहेत.

## ➢ स्पर्धा :

ही कथा सासू यमूना आणि सून चंद्रा ह्यांच्या केळी विकण्याच्या धंद्यावर आधारित आहे. सून आणि सासू दोघीही बरोबरीने केळीचा धंदा करतात. परंतु चंद्रा तरुण असल्यामुळे चंद्राकडे गिऱ्हाईक आकर्षित होते आणि सासू यमुनाचा धंदा बसतो. अशाच परिस्थितीत चंद्राच्या नवऱ्याला क्षय झालेला असहे. तिला पैशाची गरजही असते, म्हणून ती गिऱ्हाईकांशी सलगीने वागते. त्यामुळे तिचा धंदा तेजीत चालतो. हे यमुना म्हातारीच्या लक्षात आल्यानंतर ती स्वत:च्या धंद्यावर एक सुंदर देखणी मुलगी आणून बसवते आणि म्हातारीचा धंदा तेजीत चालतो.

चंद्राच्या धंद्यावर येणाऱ्या अनेक गिऱ्हाईकांपैकी एक असलेला किसनराव हा चंद्राच्या मागे लागतो. स्वत:ची चंद्रा राणी व्हावे, असे त्याला वाटते. चंद्राला किसनरावची ही वृत्ती आवडत नाही. चंद्राचा धंदा जेव्हा बसतो तेव्हा मात्र तिचा राग अनावर झाला आहे. ती यमुना म्हातारीला म्हणते मला आता ह्या पोरीसारखं वेसवा व्हावं लागेल. यमुनाला ह्या गोष्टी पटत नाही म्हणून ती स्वत:चा धंदा बंद करते. चंद्रा ही उच्च कुळातील असल्याकारणाने खालच्या जातीतील किसनराव बरोबर जायला तयार होत नाही. आपला पती क्षयाने पछाडलेला आहे तरीही हिंदू स्त्रीप्रमाणे पती हा

परमेश्वर ही तिची भावना दिसते. परिस्थितीच व्यक्तीला वाईट बनवते ह्या अनुभव वरील कथेतून येतो.

वरील सर्वच कथांमधील स्त्रिया ह्या परिस्थितीच्या बळी ठरलेल्या आहेत. तरी देखील त्या आपले शील सांभाळण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर स्वत:च्या जातीबद्दल, कुळाबद्दल त्यांना अभिमान वाटतो. ह्या नायिका समतेच्या वाटेवर आलेल्या आहेत, असे दिसत नाही. मुळातच इथल्या व्यवस्थेने त्यांच्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहिल्यामुळे त्याच्या जीवनात परिवर्तन अशक्य आहे.

### ➢ मरण स्वस्त होत आहे :

'मरण स्वस्त होत आहे' हा बाबुराव बागूल यांचा कथासंग्रह १९६९ साली प्रकाशित झाला आहे. ह्या कथासंग्रहात एकूण अकरा कथा समाविष्ट आहे. ह्या कथांमधून दलित विश्वाचा आंतरभेद सामाजिक जीवन वास्तवाच्या पातळीवर घेतलेला आहे. प्रस्तुत कथांमधून बाबुराव बागुलांनी स्त्री जीवनाचा वेध घेतानाच जगण्यासाठी स्त्रीची चाललेली धडपड व्यक्त केलेली आहे.

'आई'ह्या कथेमध्ये लेकराच्या पोटासाठी देह विक्रय करणाऱ्या आईला असे वाटते की, पोटच्या पोराने आपल्याला सिंदळ ठरवू नये. म्हणून ती जीवचा आटापिटा करताना दिसते. ह्या कथेमधून मुलांमधील वात्सल्य प्रेमाचे भावपदर विस्कटतात. कारण मुकादमाच्या मिठीत आईला पाहून पांडू अस्वस्थ होतो. आईचे हे लक्षण मुलाला आवडत नाही. पोटच्या गोळ्याने आपल्याला सिंदळ ठरवू नये, म्हणून आईचे मन अस्वस्थ होते, परंतु वासनेचा बळी ठरलेली ही आई हतबल ठरताना दिसते. वाचकाचे हृदय पिळवटून टाकणारी ही कथा आहे. ती म्हणते, 'बघ लेकरा तू मला सिंदळ ठरवून गेला. तुझ्या बापापेक्षा अधिक दु:ख देऊन गेलास, दु:खासाठीच मला

देवाने धाडले आहे काय? तू, तुझ्या बापाने आणि वस्तीवस्तीतील बायका-पुरुषांनी मला छळले मी तुझ्यासाठी, तुझ्या बापासाठी फार सोसले. तो मेला तेव्हा महंमद मेस्त्री मला बीबी करून घेण्यासाठी आपली मोटार माझ्या नावी करीत होता. वालजी सेठ घडीला वीस वीस रुपये ठकू मामीच्या हाती पाठतीत होता. हा दगड्या सारा सर्व्हिस फंड माझ्या नावी करायला तयार होता. पण मी तुझ्या प्रतिपाळासाठी जीव जाळला. पण तू... तुला कळू लागल्यापासून माझ्याशी अबोला धरू लागला. दूर होऊ लागला. माझी होणारी निंदा खरी मानू लागला. गेल्या दिवाळीला दगड्यानी माझ्या अब्रुवर घाला घालण्याचा प्रयत्न केला. तू मला आई मानतोस तर मी हा घरोबा केला नसता. तुझा आधार मला होता. पण तू मला सोडून गेलास' हे आईचे उद्गार अस्वस्थ करून सोडतात. एकूणच जगण्याच्या सगळ्याच पातळीवर सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक ह्या सर्वच पातळ्यांवर ह्या आईची शोकांतिका होताना दिसते.

'भूक' ह्या कथेतील असेच एक वेगळे विश्व अवतरताना दिसते. आई आपल्या मुलाच्या पोटासाठी काय काय करते? ह्याचे चित्रण ह्या कथेत येताना दिसते. संत तुकारामांच्याच भाषेत सांगायचे झाले तर,

वितीएवढे पोट। केवढा तयाचा बोभाटा।।<br>
जळो तिची विटंबना। भूक जना नाचवी।।

मानवी जीवनाचे सनातन सत्य ह्या अभंगात सांगितले आहे. त्याची प्रचिती करून देणारी भूक ही कथा आहे. भूक माणसाला लाचार बनवते. भूक माणसाला गुलाम बनवते. आणि भूकच माणसाला मरणाच्या दारात उभी करते. अशा भूकेचे दाहक दर्शन बागूल घडवतात. ह्या कथेतील भागू आजारी आहे. तिच्या देहात त्राण राहिले नाही. तरीदेखील ती आपल्या मुलांना खाऊ घालण्यासाठी धडपडत असते. भूकेसाठी हात पसरणारा दलिताचा मुलगा भिका आणि त्याच्या अंगावर कुत्र्यासारखी येणारी पाटलीण किंवा मुलाला चांगले खाऊ घालणारी ठकू आणि ठकूकडचे काही

खाऊ नये, कारण त्याने जात विटाळते. ही भावना यातील अंतर वेदना दाखवून भूकेच्या वेदनेचे सामाजिक संदर्भ येथे बागूल नोंदवितात. दलित वास्तवाचे चित्र रेखाटणारी आणि आपल्या मुलांच्या भूकेसाठी एका आईच्या मनातील सूक्ष्म भाव स्पंदने व मुलांच्या मानसिक अवस्थांचे मनोज्ञ दर्शन घडविणारी ही कथा आहे. भागूने आपल्या पोरांना सापाचे कालवण तर खाऊ घातले नाही ना? असे रहस्य ह्यात रेखाटले आहे. ह्या संशयाने ती बेभान होते व आंधळेपणाने स्वत:चा अंत ओढावून घेते. पण तिच्या ह्या जीवन संघर्षाला वात्सल्याची किनार लाभल्याने एक परिमाण लाभते. दुसरे दारिद्र्याचे आणि दलितत्वाचे लाभते. भूक ही सर्वच पातळीवर समान आहे. आई भूकेसाठी काय काय करते, हेच कथेतून स्पष्ट होते. आई केवळ मायेचेच छत्र देत नाही, तर मुलांच्या पोटापाण्याचा, जगण्याचाही प्रश्न सोडवते. हे ह्या कथेतून लक्षात येते.

'लुटालुट' कथेत वंचाळा ह्या देहविक्रय करणाऱ्या स्त्रीचे अगतिक जीवघेणे जीवन चित्रण लेखक करतात. भयंकर जीवन ह्या स्त्रिया जगतात. जीवन जगण्याकरता त्यांना वेश्या व्हावे लागते. समाज त्यांना जगू देत नाही. वंचाळाच्या आत्तेनेच तिला वेश्येचा धंदा करण्यास भाग पाडले आहे. वंचाळेचा बापच तिला ह्या वाममार्गाला लावतो. तर जुलूम कथेतील एलिझा तरुणी सुस्वभावी फेडरीकवर प्रेम करणारी पत्नी आहे. तिच्या प्रिय पतीवर खूनाचा आरोप होऊन पोलीस त्याला खोलीत कोंडून ठेवतात. प्रिय पतीचा विरह तिला सहन होत नाही. त्याला आरोपातून सोडविण्यासाठी ती वेडी झाली आहे. आपल्या पतीसाठी संघर्षाला सामोरी जाणारी एलिझा बागूल उभी करतात.

'कंवितेचा जन्म' ह्या कथेत देखील बागूल आईचे व्यक्तिचित्रण रेखाटतात. ही आई म्हातारी आहे. तरुणपणी नवरा मेल्यावर सर्व जीवन तिने मुलांकरीता व्यथित केलेले आहे. मुलाला जगवले आहे. स्वत: काम करून ती बेरोजगार मुलाचा संसार चालवते. मुलगा शिकलाय पण त्याला काम

नाही शिवाय सूनही कोणती मदत करत नाही. सतत दारिद्र्य उपासमार यामुळे ही आई अगतिक होते. परिस्थितीने तिला वेडे केले आहे. पण अशा परिस्थितीतही ती आपल्या मुलाचा विचार करणारी आहे.

आई, भूक, लुटालुट, सक्तमजुरी, मैदानातील माणसं, शिक्षण, कवितेचा जन्म, मवाली, जुलूम, तहान यामधील स्त्री व्यक्तिरेखांचा सामाजिक आर्थिक आणि कुटुंब व्यवस्थेत होणारा कोंडमारा आणि त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड बागूल समर्थपणे रेखाटतात.

अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात आणि बाबुराव बागूल ह्यांच्या बरोबरच दलित कथेत स्त्रीचे चित्रण अर्जुन डांगळे ह्यांनी केले आहे. 'पांढऱ्या पायाची' ह्या कथेत डांगळे यांनी गिरजा ह्या वीरपत्नीची कथा सांगितली आहे. तिचा नवरा देशासाठी कामी आलेला. नवऱ्याचं सुख काय ते महिना दोन महिना मिळालेलं. ह्या तरण्याताठ्या मुलीच्या वेदना कुणी लक्षातच घेत नाही. ती ह्या साऱ्या पसाऱ्यातून आपणहून उठून जाते. तिची सासू तिला म्हणते, माझा लेक हिनं खाल्ला, तवाच म्हणणार हुते, ही रांड पांढऱ्या पायाची हाय म्हणून, पण काय लोकांची गर्दी. देवीचं दरसन घेतात तसं त्या रांडेला बघायला. दलित स्त्रीची अंधश्रद्धाच ह्या कथेतून डोकावते.

सारांश, दलित कथेतील स्त्री सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय व्यवस्थेची बळी ठरलेली आहे. अन्याय अत्याचाराची ती बळी ठरते. दलित पुरुषाची तर ती शिकार होतेच परंतु प्रस्थापित व्यवस्थेची ही ती बळी ठरते. रूढी-परंपरा, अंधश्रद्धा यात ती गुरफटलेली दिसते. तर काही दलित स्त्रिया फुले-शाहू-आंबेडकरांच्या मार्गाने जाऊन अन्याय-अत्याचाराविरोधात उभ्या राहतात. हे त्यांचे वेगळेपण नजरेत भरणारे आहे.

संदर्भटीपा :

१. खरात शंकरराव, 'तराळ-अंतराळ', दोन शब्दमधून, १९८१
२. कुंभार प्रकाश, 'दलित साहित्य: काही विचार काही दिशा', कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, २००२ पृ. ११०-१११
३. कुंभार प्रकाश, 'दलित साहित्य: काही विचार काही दिशा', कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, २००२ पृ. १२१
४. कुंभार प्रकाश, 'दलित साहित्य: काही विचार काही दिशा', कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, २००२ पृ. ११५
५. मेश्राम योगेन्द्र, 'दलित साहित्य उद्गम आणि विकास', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८, पृ. १९२
६. बाबुराव बागूल,'जेव्हा मी जात चोरली होती', अभिनव प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ. १
७. बाबुराव बागूल, 'जेव्हा मी जात चोरली होती', अभिनव प्रकाशन, मुंबई, १९६३, पृ. ५
८. बाबुराव बागूल, 'मरण स्वस्त होत आहे', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृ. १

# ३. दलित कवितेतून ध्वनित झालेले स्त्री जीवन

**प्रस्तावना :**

पुरातन काळापासून 'स्त्री' जीवनाचा अभ्यास केला असता, असे निदर्शास येते की, 'स्त्री' जीवन नेहमीच दुय्यमस्थानातील राहिले आहे. बालविवाह, जरठकुमारी विवाह, सतीप्रथा, बालविधवा, केशवपन ह्यासारख्या अनिष्ठ रूढी परंपरांचे ओझे वाहताना स्त्री दिसते. पारंपरिक व्यवस्थेची चौकट मोडताना स्त्री दिसत नाही. ह्याचे कारण आपल्या भारत देशात असलेली पुरुषप्रधान संस्कृती होय. ह्या पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीवर सतत अन्याय अत्याचार करून तिला भोगवस्तूच बनवले. आधुनिकतेच्या काळात आणि इंग्रजांच्या आमगनाने तर भारतीय 'स्त्री' जीवनात थोडाफार बदल झाला. परंतु हे बदल म्हणजे 'स्त्री' जीवनावर केलेली मलमपट्टीच होती. साहित्यिकांनीही 'स्त्री' जीवनाच्या संदर्भात लेखन करून 'स्त्री' जीवनाचे प्रश्न चव्हाट्यावर आणले. परंतु त्यालाही मर्यादा होत्याच. अगदी प्राचीन काळापासून 'स्त्री' जीवनाचा आढावा घेतला असता, असे निदर्शनास येते की, स्त्रीला मुक्त श्वास घेण्याची कधी संधीच प्राप्त झाली नाही. उलट अनिष्ट परंपरा रूढी, चालीरीती ह्यातच ती बंदिस्त झालेली आहे. समग्र मराठी कवितेतही स्त्री-जीवन खूप चांगले झाले आहे, असे नाही. कमी अधिक फरकाने दलित साहित्यातही 'स्त्री' पुरुषाच्या हातचे बाहुलेच राहिले आहे. परंतु मराठी कवितेप्रमाणे दलित कविता 'स्त्री' देहाचे वर्णन करण्यात मशगुल होत नाही, तर काही प्रमाणात तिच्या व्यथा वेदना मांडते. हे दलित कवितेचा अभ्यास करताना लक्षात येते. काही निवडक दलित कवितांच्या आधारे दलित कवितेतून स्त्रीजीवन कसे चित्रित झाले आहे. ह्याचा येथे विचार करायचा आहे.

## १. वामनदादा कर्डक :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या कार्यापासून व वैचारिक लेखनातून प्रेरणा घेऊन वामनदादा कर्डकांनी आपले गीत लेखन केले आहे. वामनदादा कर्डकांचे 'वाटचाल'(१९७३), 'मोहळ'(१९७६), 'हे गीत वामनाचे'(१९७७) हे त्यांचे संग्रह प्रकाशित झाले असून, पाच हजारापेक्षा अधिक गीते अप्रकाशित आहेत. आपल्या लेखनीद्वारे त्यांनी दलित साहित्य, दलित चळवळ आणि आंबेडकरी विचारांना ऊर्जा प्राप्त करून दिली आहे.

सामाजिक जीवनापासून ते जागतिकीकरणापर्यंत त्यांची कविता गेलेली दिसते. त्यांनी आपल्या कवितेतून सामाजिक दु:ख मांडत असताना प्रस्थापित्त पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत आणि दलित समाजव्यवस्थेत स्त्रीचा होणारा कोंडमारा, तिच्याभोवती उभे राहिलेले प्रश्न, तिचे समाजव्यवस्थेतील स्थान आणि बदलत्या परिस्थितीत स्त्रीने घ्यावयाची काळजी, ह्याचा आलेखच त्यांच्या 'स्त्री' जाणिवेच्या कवितेतून दिसून येतो. मनुप्रणित समाजव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या, भारतीय संस्कृतीत विशेषत: हिंदू धर्मात सर्व समाजातील स्त्रिया दु:ख, अपमान व अवहेलनाचे कडवट घोट घेत जगत राहिल्या पुरुषप्रधान व पितृसत्ताक पद्धतीच्या दबावाखाली जगत असणाऱ्या स्त्रियांच्या मनाचा सतत कोंडमारा झाला, अशा कोंडलेल्या मनाला वामदादांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून मोकळी वाट करून दिली.[१] वामनदादा कार्डकांनी आपल्या गीतरचनेतून कोंडलेल्या मनाला वाट करून दिलीच, शिवाय इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीकडे हीनकस, विकृत दृष्टीने पाहिले त्याचे चित्रण त्यांनी आपल्या गीतातून केले आहे.

खेड्यापाड्यातील आणि सामान्यातील सामान्य ग्रामीण महिलांचे भावजीवन वामनदादांनी आपल्या गीतातून टिपले.

नदीच्या वाटं चुन चुन काटं
चुन चुन करती पाय
पोर चालत राही
पहाटे उढं जात्याशी झटं
लगी निघावं नदीच्या वाटं
सांगायच कुणा सागायचा गुन्हा
तशीच पाणी वाही...
कडेवर तान्हं डोईवर दुडी
थरथार करते कवळी कुडी
ओझ्यानं राही वाकून जाई
तशीच ओझे वाही...[२]

ग्रामीण स्त्रीला पहाटे उठून करावी लागणारी कष्टाची कामं उदा. जात्यावर दळण, नदीच पाणी आणनं, मोळी आणनं, अशी अनेकविध कामे करावी लागतात. हे सर्व करताना 'स्त्री' मनाचा कुठेही विचार होत नाही. सतत काबाडकष्ट करूनही नेहमीच दुय्यमत्त्वाची वागणूक स्त्रीच्या वाट्याला येते. हे वरील गीतातून स्पष्ट होते.

अहोरात्र संघर्षाचे जीवन जगणाऱ्या आणि सासरी जाणाऱ्या मुलीलाही जपून वागावे सासरी, असा सल्ला वामनदादा कर्डक आपल्या कवितेतून देतात. सासरी जाणाऱ्या मुलीला उपदेशाचे चार शब्द सांगतात. सासरी कसे वागावे, ह्याचे आईच्या शब्दातून सुंदर भावदर्शन घडवले आहे.

मुली जाशील आता दिल्या घरी
बोल आईचे ठेवून अंतरी
जरा जपून वागावे सासरी
शील असतेया काचेचं भांडं
हेच फोडाया टपतात गुंड
सांगे वामन खरे, मोहुनी अंतरे
रहा सासरी सदैव साजरी...[३]

सासरीं असताना शील संवर्धन, आपल्या कर्तव्याची जाणीव, शेजारणीशी कसे वागावे इ. उपदेशांच्या मौलिक गोष्टी नववधूला सांगतात. शील काचेचं भांडं असतं. म्हणून जपून वागावे सासरी, असा सल्ला ते देतात. 'स्त्री' जीवनाच्या विविध पैलुंवर वामनदादांनी प्रकाश टाकला आहे. त्यांच्या गीतात कष्ट करणारी दलित 'स्त्री' सासुरवाशिणीचे दु:ख माहेरची ओढ, पती-पत्नीमधील लडिवाळ भाव असे 'स्त्री' जीवनाचे विविध भाव त्यांनी रेखाटले आहेत.

इथं बिऱ्हाड उघड्यावर
तिथ लुगडी लुगड्यावर
या दुबळीचं धुडकं कडकं
घाटा कुठाय होऽऽ ...[४]

असा परखड सवाल केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे आलेल्या आत्मभानातून ती करते. आपल्या न्याय हक्काची जाणीव झालेल्या नव्या विचारांच्या, नव्या युगाच्या दबलेल्या स्त्री मनाचा हुंकार वामनदादा व्यक्त करतात. तळागाळातील परंतु जागृत स्त्रीचे प्रातिनिधिक प्रेरणादायी स्त्री चित्रण वामनदादांनी आपल्या गीतरचनेतून व्यक्त केले आहे.

स्त्रीची विविध रूप वामनदादा कर्डक आपल्या कवितेतून अभिव्यक्त करतात. कर्डकांच्या कवितेतील अतिशय गरिबीत जीवन जगणाऱ्या बहिणीच रूप वाचकांना हेलावून सोडते. ह्या कवितेतील भगिनीभाव अस्वस्थ करणारा आहे. वामनदादा म्हणतात,

बंदु रं शिपाया तू दे रं रुपाया
होळीच्या सणालारं चोळीच्या खणाला
चवळीचा चुढा मी ह्या मनगटी भरीन
चवलीच्या बाळ्या बिंदल्या बाळाला करीन ...[५]

होळीच्या सणाच्या निमित्ताने आपल्या भावाकडे रुपयाची मागणी करणारी ही बहीण त्या रुपयातून तिच्यासाठी बांगड्या आणि मुलांसाठी बाळ्या, बिंदल्या घ्यायच्या आहेत. ती तिच्या साध्यासुद्या अपेक्षाही पूर्ण करू शकत नाही. कारण तिचा भाऊही दुबळा आहे. बहीण भाऊ हे दोघेही दुबळे आहेत, अशा दुबळ्या परिस्थितीत ही बहीणआपल्या भावाला धीर देताना म्हणते,

नको रं डोळं दादा पाण्यानं भरू तू
नको त्या संसाराची काळजी करू तू
उपासी पोटी आला-पाला मी भरीन
तरी त्या संसाराचा कळस करीन---[६]

ही बहीण गरीब असली तरी आत्मविश्वासाने जगणारी आहे. आपल्या संसाराचा गाडा ओढताना दुबळ्या भावालाही आत्मविश्वास देणारी आहे. उपाशी पोटी राहून संसाराचे सोने करणारी ही बहीणमनात घर करून राहते. 'स्त्री' जीवनाच्या दु:खाचे प्रातिनिधिक रूप प्रकट करणारी ही कविता आहे.

'स्त्री' मुक्ती जर घडवून आणायची असेल तर बुद्ध, फुले, आंबेडकर ह्यांच्या पथमार्गाने जावे लागेल, तरच 'स्त्री' मुक्ती शक्य आहे. 'हे स्त्री मुक्ती' ह्या कवितेतून वामनदादा स्पष्ट करतात, ते म्हणतात,

स्त्री जातीच्या मुक्तीसाठी आले महात्मा फुले गं
आले महात्मा फुले, मुलीचे शिक्षण केले खुले गं ---[७]

अशी महात्मा फुले ह्यांची नवी ओळख ते करून देतात. स्त्री मुक्तीसाठी ज्ञान सत्तेवरील बंदी मोडण्याचे काम प्रथमत: महात्मा फुल्यांनी केले. हेच वरील कवितेतून स्पष्ट होते. थोडक्यात स्त्री वर्गाला जखमांची देणगी देणाऱ्या पुरुषीवृत्तीचे दर्शन वामनदादांनी आपल्या कवितेतून घडविले आहे.

## १. नारायण सुर्वे :

मराठी कवितेत कष्टकरी, कामगार स्त्रीचे चित्रण नारायण सुर्वेनी केले आहे. कष्टकरी स्त्रीच्या जीवनातील संघर्ष, व्यथा, वेदना, दु:ख, हलाकी, दारिद्रय, त्यात होणारा तिचा मानसिक कोंडमारा ह्यांचे चित्रण नारायण सुर्वेंची कविता करते. स्त्रीकडे एक माणूस म्हणून पाहावे, असेही ते नमूद करतात. 'तुमचंच नाव लिवा'ह्या कवितेत आईचे एक वेगळे दर्शन ते घडवितात. ही आई उदरनिर्वाहासाठी, संसार सांभाळण्यासाठी देह विक्रेय करते, शिवाय आपल्या मुलाने अशिक्षित राहू नये, म्हणून त्याला शाळेत घाल्यासाठी धडपडते. परंतु इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीत मुलाला शाळेत घालायचे असेल तर त्याच्या नावापुढे त्याच्या बापाचे नाव घालणे आवश्यक असते. मुलाला बाप आहे. पण बापाचे नाव घालण्याचही सोय नाही. तेव्हा ती माता म्हणते...

मास्तर, जिमीन उतती मातती...व्हय उफानती,
पन नांगुर, घातल्याविना आन्, बी पेरल्याविना,
रोप वर उगतं का? उगतं? बोला,
मंग बापाच्या जागी माजं नाव लिव्रून कसं चाललं?
बाप न्हाई म्हणलं तर पोराचं कस जमलं...[८]

पुरुषप्रधान संस्कृतीची बळी ठरलेली ही आई ह्या प्रस्थापित समाजव्यवस्थेलाच प्रश्न विचारते. बापाच्या जागी आईच नाव लिहिलेलं कस चालेलं? हा तिचा परखड सवाल आहे. आजही स्त्रीचे अवलंबित्व ह्या कवितेतून नारायण सुर्वे स्पष्ट करतात.

'मनिऑर्डर' ह्या कवितेतही एक वेगळ 'स्त्री' विश्व नारायण सुर्वे उभं करतात. ह्या स्त्रीचे वेगळेपण म्हणजे हिला स्वत:चे घर आहे. मुलं आहेत पण ती गाव सोडून उदरनिर्वाह करण्यासाठी स्वत:चा देहविक्रेय करते, आणि आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. देहविक्रय करून मिळणाऱ्या

पैशातून गावाकडे मनिऑर्डर करते. ती म्हणते की मी जे पैशे पाठविले आहेत त्यातून

त्येचं गंगीला याक पुस्तक घ्या, नाम्याला चरडी,
रोजचं धा पैसं द्या, म्हंजी पळल पोरगं साळंला,
दोघास्नी मुका बी लिवा---[१]

स्त्री म्हणून स्वत:च्या वाट्याला आलेली जीवघेणं दु:ख त्या दु:खी जीवनाचे पडसाद आपल्या मुलांवर पडू नये, म्हणून ती मुलांना शोळच महत्त्व पटवून देते. शिक्षणाच्या अभावीच तिच्या वाट्याला हे भयानक संघर्षमय जीवन आले आहे. हा संघर्ष आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये, ह्यांची ती काळजी घेताना दिसते. नारायण सुर्वेच्या कवितेतील आई कष्ट सोसून आपल्या मुलांवर मायेची सावली धरणारी आहे. सुर्वेच्या कवितेतील 'स्त्री' स्त्रीच्या जीवनातील नानाविध स्तर उलगडून दाखवते. ती आई आहे, पत्नी आहे, प्रेयसी आहे, अशा पद्धतीने जीवन जगतांना अनेक भूमिका पार पाडते. स्त्री शिवाय पुरुषाचे जीणे अधुरे आहे, हे ही नारायण सुर्वेची कविता सांगते. 'स्त्री' शिवाय ह्या जगाची निर्मिती केवळ अशक्य आहे. म्हणून स्त्रीकडे माणूस म्हणून पाहावयास नारायण सुर्वेची कविता सांगते, हेच त्यांच्या कवितेचे वेगळेपण आहे.

## १. रविचंद्र हडसनकर :

रविचंद्र हडसनकर हे स्त्रीला समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि मनुष्यत्वासाठी लढण्याचे आव्हान करतात, 'उठ माझ्या भगिनी' ह्या कवितेत ते म्हणतात,

उठ...उठ... माझ्या भगिनी
होऊनी रणमर्दानी
ओठी घेऊन ये
समता, स्वातंत्र्य, बंधुत्व
अन् माणुसकीसाठी
उद्याच्या क्रांतीची गाणी...[१०]

लोकशाही तत्त्वाचा आणि जीवन प्रणालीचा जरी अंगिकार केला असला, तरी समाजजीवनामध्ये आणि कोणत्याच क्षेत्रात समतेचे तत्त्व अंगिकारता आलेले नाही, हे वास्तव आहे. आपण राजकीय दृष्ट्या समता मान्य केली आहे. सामाजिक आणि आर्थिक समता अजूनही प्रस्थापित होऊ शकलेली नाही. वस्तुत: स्वातंत्र्योत्तर काळात ह्या दिशेने वाटचाल व्हायला हवी होती. पण सामाजिक विषमतेची दरी जशी रूंदावत गेली, तशी आर्थिक विषमताही वाढत गेली, हेच कवी स्पष्ट करतात. वास्तविक आंबेडकरी विचारांमध्ये स्त्री समाजाला विलक्षण प्रतिष्ठा आहे. हा विचार पुरुषांबरोबर स्त्रियांचाही सन्मान करतो. भारतीय धर्मशास्त्राने स्त्रीचे मनुष्यत्त्व नाकारले होते. पण स्त्रीही मनुष्य आहे हा आंबेडकरी विचाराचा ऊर्जा स्त्रोत आहे, हेच वरील कवितेतून ध्वनित होते.

## २. बाबुराव बागूल :

कथा, कादंबरी, वैचारिक लेखन, ह्याचबरोबर बाबुराव बागूलांनी कवितालेखनही केलेले आहे. त्यांनी आपल्या कथा, कादंबरी, आणि

कवितेतून स्त्रीचे वेगळेपण स्पष्ट करत असताना देव, धर्म, देऊळे यापेक्षा स्त्री महान आहे, असे विचारसूत्र मांडले आहे. हाच प्रत्यय ह्यांच्या कवितेतूनही येतो. स्त्रीला दुय्यमस्थानी नेण्यासाठी पुरुषप्रधान संस्कृतीने अनेक युक्त्या, प्रयुक्त्या केल्या, ह्याचा मोठा पटच बाबुराव बागूलांची कविता वाचकांसमोर मांडते. वास्तविक स्त्री ही अनेकांना प्रेरणादायी अशीच आहे. हेच बागुलांची कविता सुचवते,'वेदा आधी तू होतास', ह्या कवितासंग्रहातून ते स्त्रीचे वेगळेपण स्पष्ट करतात, बागूल म्हणतात...

तुझ्या दर्शनानेच कलावंताना
सुचतात कलाकृती आणि वास्तुशिल्पे
तुझ्या आशयपूर्ण उरोजावरून देवालयाची मस्तके
कळस साकार झाले आहे आणि..[११]

ते स्वर्गाशी सतत संवाद करतात असे मानले जाते. आदर्श 'स्त्री' दर्शनाने लेखक कलावंतांना अनेक महान कलाकृती सुचल्या, स्त्रीच्या नानाविविध रूपामुळे उदा. आई, प्रेयसी, पत्नी अनेक अजरामर कलाकृती निर्माण झाल्या. साक्षात परमेश्वरालाही मागे टाकील, अशी ही स्त्री महान आहे. परंतु धर्माच्या नावाखाली स्त्रीची विटंबना होताना दिसते. तिचे मोठेपण अनेकांना भावत नाही. म्हणून बाबुराव बागूल म्हणतात,

तुझे आईपण पाहून
तुझी सर्व पोरावली माया पाहून
पिता परमेश्वराची कल्पना
प्रेषितांना सूचली...[१२]

मातेचे, आईचे मोठेपण पाहून प्रेषितांना पिता परमेश्वराची कल्पना सूचते. हा एक वेगळाच विचार येथे डोकावताना दिसतो. स्त्रीचे महानपण ईश्वराच्या नावाशी जोडण्यात आले. परंतु तिचे अस्तित्व, तिचे थोरपण, कोणालाही हिरावून घेता आले नाही. त्यामुळेच स्त्री सदासर्वकाळ श्रेष्ठच

ठरली आहे. पुरुषप्रधान संस्थेने कितीही ठरविले, तरीही स्त्री कधीही दुय्यमस्थानी जाणार नाही. कारण निर्मिती करण्याच आणि पुरुषाला जन्म घालण्याचे अनमोल कार्य फक्त स्त्रीच करू शकते. तेव्हा हे त्रिकालाबाधित सत्य कुणीही नाकारू शकत नाही. असा सूर वरील काव्यपंक्तीतून बाबुराव बागूल व्यक्त करतात.

बाबुराव बागूल म्हणतात,

तुझी सुखदायी रूपे पाहून
निसर्गाने तुझेच अनुकरण केले
तू माझी, माझ्या मुलाचीच नाही
तर निसर्गाचही शिक्षिका झालीस!...[१३]

'स्त्री' जीवनाची विविध रूपं पाहून निसर्गानेही तिचे अनुकरण केलेले आहे. कालमानाप्रमाणे आणि ऋतुमानाप्रमाणे स्त्रीमध्ये जे बदल होतात, तेच बदल निसर्गातही होतात. निसर्गही स्त्रीकडेच पाहून आपल्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडतो. खऱ्या अर्थाने स्त्रीही निसर्गाची शिक्षिका आहे. आणि म्हणून स्त्री सदासर्वकाळ महान आहे. हे विचारसूत्र बाबुराव बागूल आपल्या कवितेतून मांडतात. परंतु अशा महान स्त्रीलाही धर्माच्या नावाखाली बदनाम केले गेले. तिला केवळ उपभोगाची वस्तू मानले आणि म्हणून ह्या पुरुषी मानसिकतेबद्दल कवी म्हणतात,

जर तेव्हा कृष्णाने कौरवपांडवांची
कत्तल केली असती तर
नागडी धिंड खेडोपाडी
दुबळ्या आई बहिणीची निघाली नसती
पण जसे कौरवांना स्त्री सौंदर्य
स्त्री शरीरातील स्वर्ग बघायचे होते
तसेच पांडवाला आणि कृष्णालाही बघायचे होते

म्हणून तो मुंडकी मारण्याऐवजी साड्यांचे दिंड
पुरवित होता.-----[१४]

कौरव, पांडव आणि कृष्ण ह्या तिघांनीही स्त्रीकडे कधी चांगल्या नजरेने पाहिले नाही. कौरव, पांडवांनी स्त्री देहाची विटंबना केली, आणि कृष्णानीही उघड्या डोळ्यांनी ती विटंबना पाहिली. ही पुरुषांची कुचकी मानसिकताच येथे पाहावयास मिळते. आजही समाजामध्ये स्त्रीची विटंबना होताना दिसते आहे. स्त्रीच्या बाजूने अनेक कायदे आहेत. पण त्यांची अंमलबजावणी होत नाही. कारण आजही समाजात कौरव आणि कृष्ण प्रवृत्ती जिवंत आहेत. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे क्रांतिकारक आज असते, तर वर्तमान जीवनात स्त्रीची विटंबना झाली नसती, असेच कवीला सुचवावे वाटते. ते म्हणतात,

दुर्दैवी द्रोपदीचे वेळी
डॉ. आंबेडकर नव्हते
कायदे नव्हते-कृष्ण होता.
आताही दुर्दैव त्या स्त्रियांचे
कौरव आहेत, कृष्ण आहेत आणि कायदेही आहेत
फक्त क्रांतिकारक कार्यकर्ते नाहीत...[१५]

एकूणच आरंभकाळी ज्या स्त्रीला मानाचे स्थान होते. त्या स्त्रीचे पुरुषप्रधान संस्कृतीत धर्माच्या नावाखाली कसे शोषण होते आहे, हेच बाबुराव बागूल आपल्या कवितेतून स्पष्ट करतात.

### १. हिरा बनसोडे :

हिरा बनसोडे ह्यांनी 'पौर्णिमा' (१९७०) आणि 'फिर्याद' (१९८४) हे दोन महत्त्वाचे कवितासंग्रह लिहिले आहेत. दलित म्हणून आणि एक स्त्री

म्हणून त्यांच्या वाट्याला आलेला अनुभव त्यांनी आपल्या काव्यातून शब्दबद्ध केला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने ह्या देशात स्त्रीला गुलाम ठरविले आहे. इथली संस्कृती तिला विषमतेचे अनुभव देते. म्हणून कवयित्री म्हणते,

मी माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे
जीने आम्हाला बंद कोठडीत कैद केले आहे.
जिथे आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान आहे
जिथला वारा आम्हाला परक्यासारखा वागवतो
जिथला पाऊस आम्हाला फक्त दुष्काळच देतो
जिथले पाणी आमच्याशी मृगजळाचा जीवघेणा खेळ खेळते...[१६]

प्रस्तुत कवितेतून प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात ठामपणे उभे राहून सातत्याने संघर्ष करणाऱ्या प्रबळ शक्तीचे रूप पाहायला भेटते. प्रस्थापित संस्कृतीविषयी हिराबाई बनसोडे ह्यांना चीड तर आहेच. शिवाय एक स्त्री म्हणून, त्यांच्या वाट्याला आलेलं दुःख त्या व्यक्त करतात. स्त्रियांचा होणारा अपमान, जातीयता, धर्मांधपणा बदलण्यासाठी ह्यात स्त्रीची होणारी घुसमट थांबवण्याचे ते आव्हान करतात, आणि म्हणतात, लोकहो तुम्ही तरी न्याय द्याल का? हा अंकात दलित समाजजीवनातील जागृत स्त्री मनाचा आहे. हा स्त्रीच्या मुक्तीच्या आत्मशोध आहे. तो अस्वस्थ करणारा आहे.

### १. ज्योती लांजेवार :

ज्योती लांजेवार ह्यांनी 'दिशा' हा काव्यसंग्रह १९८२ साली लिहिला त्यांच्या कवितेतून विविध स्तरात वावरणाऱ्या व्यक्तीच्या मनोभावना प्रगट होताना

आहे. ज्योती लांजेवार ह्यांच्याही वाट्याला अस्पृश्य आणि स्त्री असे दुहेरी दु:ख आलेले आहे. स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दु:खाची परिणामकारकता व्यक्त करताना कवयित्री म्हणते,

माझ्या डोळ्यापुढे सतत उभी असते,
कौरवांच्या राज्यसभेत बेअब्रू होणारी पांचाळी
युगानुयुगे जन्माला आलेले दु:खासन
समाजानेच वाढविले स्वत:च्या छायेखाली,
मानाखाली घालून---[१७]

स्त्रियांना उपेक्षा, मानहानी, अवहेलना, वंचना आणि अप्रतिष्ठा का भोगावी लागते, तर भारतीय समाजव्यवस्थेत सामाजिकदृष्ट्या जीर्ण आणि कुचकामी ठरलेल्या आदर्श मूल्यांमुळे स्त्रीच्या संदर्भात परिस्थिती बदलावी, म्हणून कवयित्री मनोनिश्चय करताना म्हणते,

या दृष्टांच्या हातून मावळणारा सूर्य
तू तळपत ठेव अंधारू नकोस आभाळ
हे कृष्णा...तुझ्या राज्यात
आई बहिणीवर अत्याचार
अन्...तू डोळे मिळावेस असे पार
अरे, अंगभर वस्त्र पुरवू नकोस
पण वस्त्र ओढणारे ते हात
मुळापासून छाटून तरी टाक
पुनरावृत्ती होऊ देऊ नकोस
नव्या महाभारताची
नाही तर आम्हालाही लिहाव्या लागतील
हिरव्या गवतावर लाल घोषणा
पेटावे लागेल होऊन वणवा

सार्‍या आसमंताला गवसणी घालून
तू मात्र तुझ्या...दिनदयाळाचा किताब
परत कर...अन् खुशाल होऊ दे
कुरूक्षेत्र...या भूमीचे- - -[१८]

महाभारत घडवून आणणारा आणि अर्जुनास गीता सांगणारा कृष्ण कौरवांच्या राज्यसभेत पांचालीस बेअब्रू होतांना डोळे मिटून राहिला, ह्याबद्दल कवयित्री संताप व्यक्त करते. तसेच आजही समाजात स्त्रीचे वस्त्रहरण करणारे दुशासन आहेत. ह्यांचीही कवयित्रीला चीड येते. अन्याय अत्याचार, छळ, पिळवणूक आणि अमानवी वृत्तीचे प्रदर्शन करणार्‍यांचा उच्छेद व्हावा, असे कवयित्रीला वाटते. हा उच्छेद जर झाला नाही, तर नव्याने महाभारताची पुनरावृत्ती घडू शकते, असे कवयित्री म्हणते.

## १. प्रज्ञा लोखंडे :

प्रज्ञा लोखंडे ह्यांनी 'अंतस्थ' हा काव्यसंग्रह लिहिला असून काही निवडक कवितांमधून त्यांनी रूढींचे पिंजरे स्त्रीला माणूसपणापासून वंचित कसे ठेवतात, हे स्पष्ट करताना म्हटले,

आपल्यातच किती अंतस्थ कप्पे
वावरत असतात
एकमेकांना अनोळखी असतात
अस्तित्वाच्या सनातन अजगुजाची
लय,
कधी नाकारली नव्हतीच,
पण निराश्रित होऊ नये
जगण्याचा लोभस संवाद
यासाठीच हा समंजस आकांत

शोषित स्त्री जेव्हा मनातला व डोक्यातला काळोख घेऊन उजेडाच्या मार्गावर चालू लागते, आणि आत्मभान निर्माण करण्यासाठी

शब्दांचे रान तुडवू लागते, तेव्हा तिला अनुभवांची आरास नको असते, वेदनेची सजावट नको असते, आत्मशोधाची मशाल हेच तिचे शस्त्र आणि अंधाराला चूड लावणे, हेच तिचे ब्रीद ठरते. अशावेळी शब्दबंबाळ विद्रोहापेक्षा भावनेच्या उमाळ्याचे मूळ ती शोधू पाहते.---[१९]

अंतस्थमधील कवितेच्या संदर्भात असे विचार ज्योती लांजेवार व्यक्त करतात, स्त्रीमनाची घालमेल प्रकट करताना प्रज्ञा लोखंडे म्हणतात,

एकविसाव्या शतकाच्या सांस्कृतिक चिखलात
आत वाढत चाललाय दिशाहीन कोलाहल
चहूबाजूंनी चिणला जातोय तुझा बुलंद आवेश
तरीही तू निमुटपणे चालतेस
त्यांनी आखून दिलेल्या रस्त्यावरून
तरीही तू बोलत नाहीस दबलेल्या हुंकाराबद्दल-

--[२०]

विसाव्या शतकात स्त्री शक्ती जेवढी गतिमान झाली होती. तशी ती येऊ घातलेल्या शतकातही गतिमान राहण्याची गरज आहे. स्त्री शक्तीला बांध घालणाऱ्या अनेक अभद्र शक्ती विसाव्या शतकाच्या शेवटच्या प्रवाहात प्रबळ झालेल्या आहेत.

स्त्रीत्वाचा मूक आक्रोश सजवण्यात
धन्य झालेली आपली महान संस्कृती
जोहारापासून सतीपर्यंतचा हा प्रवास
इक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही
रूपकुंवर...!

पूर्वापार आणि आजही स्त्रीवर अन्याय आणि अत्याचारच ह्या मनूवादी संस्कृतीने केला आहे, हेच वरील कवितेतून स्पष्ट होते.

## १. प्रतिभा राजानंद :

प्रतिभा राजानंद ह्यांचा 'मला हवी असणारी पहाट' हा एक महत्त्वाचा 'स्त्री' जाणिवांचा कविता संग्रह आहे. 'स्त्री-पुरुष' समानता आणि समतेचे समान जीवन अशी आदर्श समाजव्यवस्था कवयित्री निर्माण करण्यास निघाली आहे. आजपर्यंत प्रस्थापित व्यवस्थेने स्त्रीला अंधारमय जीणे जगण्यास भाग पाडले आहे. तिच्या वाट्याला गुलामिच आलेली आहे. ह्या संदर्भात कवयित्री म्हणते,

> संपू पाहते मी या चक्रव्यूहाला छेदण्या अन् भेदण्यातच
> माझ्या स्त्रीत्वानं ओढलेल्या अन् वेढलेल्या
> कुणाकलणाच टाळण्या-फेटाळण्यातच खर्च करावं सामर्थ्य
> ही असुरक्षितता नकोच रे...
> माझ्या विचारशक्तीला सीलबंध करू पाहणाऱ्या
> ह्या महान संस्कृतीची शपथ
> पार पोलिओग्रस्त बनवतंय माझं स्त्रीत्व मला.

प्रस्तुत कवितेत स्त्रीत्वाचा अकांत कवयित्री ध्वनित करते. स्त्रीत्वाच्या मुक्तीची विचारधारा कवयित्री व्यक्त करते.

सारांश, समग्र दलित कवितेतून स्त्रीजीवनाचे अनेकविध पदर कवी आणि कवयित्रीने उलगडून दाखविले आहेत. स्त्रीचे शोषण करणाऱ्या समाजरचनेचे नेमके स्वरूप काय आहे? हे दलित कवितेत पाहायला भेटते. धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक ह्या सर्व पातळ्यांवर स्त्री शोषण होताना दिसते. भारतीय समाजजीवनात अनेक स्त्रीवादी चळवळी उदयाला आल्या. त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा, 'स्त्री' हक्काचा उच्चार केला. परंतु आजही

स्त्रीला मुक्त श्वास घेता येत नाही. म. फुले, बाबासाहेब आंबेडकर यांनी 'स्त्री पुरुष' समानतेचा विचार मांडला पण ती समानता आजही स्त्रीपर्यंत पोहचली नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोडबिल मांडून समग्र स्त्री जातीच्या विकासाची मागणी केली पण मनुवादी संस्कृतीला ते रूचले नाही. तर स्त्रीला स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय पाहिजे असेल तर त्यांना बाबासाहेब आंबेडकरांच्या पथमार्गाने जावे लागेल. म्हणून 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' ह्या ब्रीद वाक्याला गवसणी घातल्याशिवाय समाजात बदल होणार नाही. बुद्धांनी दिलेले अंतदीप भव हे ब्रीद सर्व स्त्री समाजाला प्रेरक ठरेल आणि स्त्री स्वयंमसिद्ध होऊन नव्या युगाची हाक देईल आणि ही हाकच खरी स्त्री मुक्तीची, मानवमुक्तीची हाक असेल, असे म्हणावे लागेल.

## संदर्भ टीपा :


१. गीतेकर परशुराम, वामनदादा कर्डक यांची गीतरचना, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९७६, पृ. ७६ २
२. कर्डक वामन, 'मोहळ', आनंत प्रकाशन, औरंगाबाद, २००८, पृ. ५४
३. कर्डक वामन, 'मोहळ', आनंत प्रकाशन, औरंगाबाद, २००८, पृ. ३९
४. कर्डक वामन, 'मोहळ', आनंत प्रकाशन, औरंगाबाद, २००८, पृ. ५२
५. कर्डक वामन, 'मोहळ', आनंत प्रकाशन, औरंगाबाद, २००८, पृ. ४०
६. कर्डक वामन, 'मोहळ', आनंत प्रकाशन, औरंगाबाद, २००८, पृ. ४०
७. कर्डक वामन, 'मोहळ', आनंत प्रकाशन, औरंगाबाद, २००८, पृ. १२७

८. सुर्वे नारायण, 'सनद', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८२, पृ. ८८-८९

९. सुर्वे नारायण, 'सनद', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८२, पृ. ७७

१०. हडसनकर रविचंद्र, 'अरे मानसा मानसा', निर्मल प्रकाशन, नांदेड, २००२, पृ. ४५

११. बागूल बाबुराव, 'वेदाआधी तू होतास', दिशा प्रकाशन, नाशिक, २००४, पृ. २४

१२. बागूल बाबुराव, 'वेदाआधी तू होतास', दिशा प्रकाशन, नाशिक, २००४, पृ. २५

१३. बागूल बाबुराव,'वेदाआधी तू होतास', दिशा प्रकाशन, नाशिक, २००४, पृ. ४३

१४. बागूल बाबुराव, 'वेदाआधी तू होतास', दिशा प्रकाशन, नाशिक, २००४, पृ. ३१

१५. बागूल बाबुराव, 'वेदाआधी तू होतास', दिशा प्रकाशन, नाशिक, २००४, पृ. ३१

१६. बनसोडे हिरा, 'फिर्याद', समाजप्रबोधन संस्था, पुणे, १९३४, पृ. ३१.

१७. लांजेवार ज्योती, 'दिशा', निखिल प्रकाशन, नागपूर, १९८२

१८. लांजेवार ज्योती, 'दिशा', निखिल प्रकाशन, नागपूर, १९८२

१९. लांजेवार ज्योती, 'दलित कवयित्रीची कविता', सुगावा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विशेषांक १९९३, पृ. ९०

२०. लोखंडे प्रज्ञा, 'अंतस्थ', पृ. १९४

## ४. दलित कादंबरीतून आविष्कृत झालेले स्त्रीजीवन

आंग्लकाळापासून मराठी साहित्यात कथात्मक साहित्यप्रकारात कादंबरीचा समावेश होतो. निरनिराळ्या विषयावर आणि समस्यांवर कादंबरी लेखन केले जाते. दलित साहित्यात तसे पाहिले तर कादंबरी लेखन खूप कमी झाले आहे. परंतु जे कादंबरी लेखन झाले आहे, त्यातून समाज

वास्तवाचे सजग भान आणून दिले आहे. मराठी कादंबरीने कधी न अनुभवलेले गावकुसाबाहेरचा समाज ह्या कादंबरीने साहित्य विश्वाच्या केंद्रस्थानी आणला, आणि त्यातून सर्वसामान्य उपेक्षित अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाच्या मुक्या भावनांना शब्दरूप दिले. मुळातच दलित कादंबरीतील जाणीव सामाजिक आहे. मराठी साहित्यविश्वाला नवीन वाटणारे जीवन दलित कादंबरी रेखाटते. ह्या कादंबरीतील व्यक्तिरेखा अनुभवाच्या नाना संवेदना घेऊन प्रकट झाल्या आहेत. भारतीय समाज व्यवस्थेतील प्रस्थापित वर्गाने लादलेल्या अस्पृश्यता व दारिद्र्य ह्यांच्या गडद अंधारात जगणाऱ्या त्या व्यक्तिरेखा आहेत. समाजव्यवस्थेशी शोषणाशी त्या टक्कर घ्यावयास निघालेल्या आहेत. पारंपरिक व्यवस्थेविरोधात विद्रोह पुकारून न्याय हस्तगत करण्यासाठी त्या प्रकटल्या आहे. येथे दलित स्त्री जीवनाचा विचार केला आहे. त्याद्वारे स्त्री व्यक्तिरेखा कशा आविष्कृत झाल्या आहेत. त्याचा अभ्यास केला आहे. ह्यामध्ये प्रामुख्याने अण्णाभाऊ साठे, भीमसेन देठे, बाबुराव बागूल, सुशीला संकपाळ, उत्तम तुपे, अशोक व्हटकर, शशिकांत तासगावकरह्या निवडक कादंबरीकारांच्या कादंबरीमध्ये चित्रित झालेल्या 'स्त्री' जीवनाचा वेध घेतला आहे. वरील सर्वच लेखकांच्या लेखनामध्ये समाज परिवर्तनाची बीजे पेरलेली दिसतात.

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये दलित स्त्रीचे तिच्या समाजातील लोकांकडून शोषण होते. हिंदू समाज व्यवस्थेतही स्त्रीवर धर्माच्या नावाखाली अन्याय केला आहे. परंतु ती शिक्षित झाल्यामुळे तिने समाज

व्यवस्थेविरोधी विद्रोह पुकारला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री पिचून गेली आहे. ती कधी परिस्थितीला शरण जाते, तर कधी परंपरेला छेद देते. तर कधी स्त्री जन्म नाकारते. प्रस्थापित परंपरा आणि संस्कृती ह्यांना देखील वेळप्रसंगी लाथाळते. कुटुंबाचा उद्धार करणारी ती सामर्थ्यशाली स्त्री आहे. वेश्या व्यवसायासारख्या भयानक जाळ्यातून सुटका करून घेऊन परिवर्तन घडवून आणणारी कणखर स्त्री दलित कादंबरीमध्ये पाहायला भेटते. ह्या दलित स्त्रीची विविधांगी रूपे कादंबऱ्यांमध्ये स्पष्ट केली आहेत.

➢ **चंदन :**

अण्णाभाऊ साठे ह्यांची 'चंदन' ही कांदबरी १९७२ साली प्रसिद्ध झाली.[१] मुंबई महानगरात पोटासाठी गेलेल्या दलित कुटुंबाची जीवघेणी कहाणी 'चंदन' कादंबरीतून अण्णाभाऊ साठेंनी चित्रित केली आहे. 'चंदन' कांदबरी म्हणजे एका असाहाय्य गरीब विधवा तरुणीच्या जीवन संघर्षाची कहाणी आहे. तरी देखील ह्या दु:खातून ती स्वत:ला सावरते व स्वत:चे रक्षण करते.

सातारा जिल्ह्यातील एका खेडेगावात गरीब शेतकऱ्याच्या घरी जन्माला आलेली चंदन अनाथ पोरकी म्हणून मामांच्या मुलांबरोबर वाढून मोठी होते. ती अतिशय रूपवान असते, म्हणून काही गडबड घोटाळा होण्यापेक्षा मुलीचे लग्न वयात येण्यापूर्वीच करावे, म्हणून वयाच्या बाराव्या वर्षी तिचे मामा तिचे लग्न लावून देतात, आणि वयाच्या चौदाव्या वर्षीच तिला पुत्र प्राप्ती होते. लहानपणापासूनच चंदन गरिबीत वाढलेली असते. मजुरी करून कष्ट उपसणाऱ्या जगूला ती साथ देते. पुढे चांगले जीवन जगण्यासाठी ते मुंबई नगरात येतात. मुंबईत मात्र त्यांच्या प्राथमिक गरजा भागत नाहीत. काम मिळत नाही. भटकंती करत करत ते घाटकोपरला येतात. तेथे डोंगर फोडण्याच्या कामावर जगूला २ रुपये रोजाचे काम मिळते. तिथेच ते राहतात. तिथे चंदना आणि जगूचा संसार चालतो. शेजारच्या झोपडीत राहणारा पांडुबाबा नावाचा नीतिमान म्हातारा चंदनला आपली मुलगी मानतो. सुखाचे चार दिवस वाट्याला आल्यानंतर आपल्याला एक मुलगी असावी, असे चंदनला वाटते. परंतु खाणीत स्फोट होतो त्यात जगूचा पत्त्या लागत नाही आणि मुंबईसारख्या भव्य नगरीत चंदन निराधार बनते. पती निधनाचे दु:ख आणि एकटेपण आणि पोटाचा प्रश्न चंदनला सतावत असतात. पर्यायी चंदन रस्त्यावर मजुरी करते. ती दयाराम आणि कंपनीत माती भरण्याच्या कामासाठी जाते. एक निराधार कामगार स्त्री म्हणून तिचे जीवन सुरू होते. पहिल्याच दिवशी तिला

कामाच्या ठिकाणी वाईट अनुभव येतात. अनेक नराधमांच्या वाईट नजरा तिच्यावर खिळतात. गोपाळ, रंग्या, टायगर ह्या नराधमांकडून तिच्यावर अत्याचार होतात. रंग्या, टायगर तिला पळवून नेण्याचा प्रयत्न करतात. पण त्यातूनही ती सुदैवाने वाचते. दयारामच्या कंपनीतील गण्या वडार तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी चंदन ॲसिडचा डबा घेऊन दयारामच्या अंगावर ॲसिड फेकते. ह्या कृत्यामुळे चंदनला २ वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा होते. चंदनला तुरुंगात धाडले जाते. जयवंत भोसले नावाचे वकील तुरुंगातून चंदनची निर्दोष सुटका करतात. त्यावेळेस दयाराम आणि गोपाळा हे तिचे शत्रू मृत्यू पावलेले असतात. चंदन तुरुंगातून बाहेर येते. पण तिचे प्रश्ने काही मिटत नाही. तिचे जीवन अंधारमयच राहते. तिला जगण्याचा मार्ग शोधता येत नाही. सौंदर्य व तारुण्य हे तिचे शत्रू ठरतात. सौंदर्य हे स्त्रीला शाप कसे ठरते आणि त्या सौंदर्यामुळेच स्त्री देहाची कशी विटंबना होते, हेच इथे आपणास पाहावयास मिळते.

## ➢ चित्रा

अण्णाभाऊ साठे ह्यांची 'चित्रा' ही कांदबरी १९५२ साली प्रसिद्ध झाली.[२] 'चित्रा' ही कादंबरी नायिका प्रधान आहे. चित्राची आई विधवा झाल्यानंतर चित्रा आणि तिची बहीण सोना ह्यांना मामाकडूनच वेश्याव्यवसाय करायला प्रवृत्त केले जाते. त्यातून चित्रा सुटका करून घेते. चित्रा आईच्या गर्भात असतानाच तिचे वडील मृत्यू पावतात. विधवा सकुबाई मुलींना घेऊन माहेरी येते. भाऊ लबाड असल्याकारणाने ती वेगळी चूल मांडते आणि मोलमजुरी करून संसाराचा गाडा ओढते. सोना व चित्रा मोठ्या होतात. तशा गावातील उनाड तरुणांच्या नजरा त्यांच्यावर खिळतात. शेवटी लाजेखातर कृष्णामामा गावातील चार जाणत्या माणसांच्या सांगण्यावरून सोनाचे लग्न ठरवतो पण सोनाचे ज्या व्यक्तीबरोबर लग्न झालेले असते, तो रोगी असतो. तो स्वत:च इतकी सुंदर बायको मला नको, असे स्पष्टपणे सांगतो.[३]

दरम्यान दात बसवण्यासाठी मुंबईला गेलेला कृष्णा गावी परत येतो, आणि आपण सोनासाठी मुंबईला एक मुलगा बघितला आहे, असे सांगून तो तिला मुंबईला घेऊन जातो. ४०० रुपयांना तिला वेश्येला विकले जाते. मामाच्या भाडखाऊ प्रवृत्तीमुळे वेश्यासारख्या व्यवसायात ती अडकली जाते. कालांतराने मामा चित्राचेही लग्न ठरवतो. परंतु चित्राच्या नवऱ्याच्या कानात गोम शिरून तो मरण पावतो. पुढे चित्रा एकाकी होते. सुखाला वंचित झालेली चित्रा आपल्या आईच्या घरी कसेबसे दिवस काढत असते. तिच्या सौंदर्यावर टपून बसलेली काही माणसे तिला त्रास देत असतात. पुढे मामा तिलाही मुंबईला नेतो. परंतु कृष्णाचे कारस्थान भाबड्या सकुबाईच्या लक्षात येत नाही. सोनासारखे चित्राचेही भले होणार, म्हणून सखुबाई चित्रालाही मुंबईला पाठवते. कराड स्टेशनमध्ये मामाच्या दुष्टपणाची ओळख चित्राला पटते. शेवटी ती कशीबशी सोनाकडे येते. सोनाकडे आल्यानंतर तिला मामाचे खरे रंग कळतात.

आपण ज्या मार्गाने जात आहोत, त्याच मार्गाने चित्राही आली. ह्याचे तिला अतीव दु:ख होते. मामाचा भयंकर राग येतो. ज्याच्यावर आपण भरोसा ठेवला तो आपल्या अब्रूचा रक्षणकर्ता आपल्याच कर्दनकाळ निघाला. त्याने आपल्याला ह्या नरकात आणून लोटले. आपली सर्व जगण्याची स्वप्ने चक्काचूर केली. मात्र चित्राच्या बाबत असे घडू नये, असे सोनाला वाटत होते. आपले लग्न झाले नाही पण चित्राचे जरूर लग्न करून द्यावे, असे तिला वाटते. चित्राच्या तरी शीलाचे रक्षण करावे असे तिला वाटते आणि पूर्ण विचारांनी सोना चित्राची ओळख कांतिलालशी घडवून आणते. पन्नाशी गाठवलेला कांतिलाल देखणा, श्रीमंत सुखवस्तू आहे. परंतु नपुसक आहे. केवळ स्वत:चे नपुसकत्व लपवण्यासाठी त्याला चित्राबरोबर लग्न करायचे असते. चित्राला हवा तो माणूस आपण नोकर म्हणून ठेवू त्याच्याकडून तिला हवे ते सुख मिळवून घ्यावे हा विचारच चित्राला पटत नाही. त्यातच आई वारल्याची तार तिला येते. सोनाकडे राहून आपले काही भले होणार नाही, असे चित्राला वाटते. म्हणून ह्या नरकातून पळून जाण्याचे ती ठरवते

आणि एका रात्री अंगावरली सर्व दागिने उतरून ठेवून आणि सोनाचे झोपेतच अखेरचे दर्शन घेऊन ती माटुंग्याच्या लेबर कॅम्पमध्ये तान्हुबाईकडे येते, तिथे ज्याच्याबरोबर लहानपणी बाहुलाबाहुलीचे खेळ खेळलेला जया तिला भेटतो. लहानपणीचे प्रेम आता आकार घेऊ लागते. हळूहळू चित्रा तान्हू आजीबरोबर गिरणीतही कामाला जाऊ लागते. पुढे पुढे ती ह्या शहरातही रमू लागते.

काही दिवसांनी मुंबई बंदरात खलाशांचा संप सुरू होतो. त्या संपाला गिरणी कामगारही पाठिंबा देतात. संप मोडून काढण्यासाठी ब्रिटिश सरकार प्रयत्न करते. संपाच्या ठिकाणी गोळीबार होतो. जयाचा चुलता सुभान ब्रिटिश सैन्यात शिपाई असतो आणि जया हा कामगारांचा नेता असतो. सुभानरावची बंदूक जयावर चालत नाही. हे पाहून गोरा अधिकारी सुभानला गोळी घालतो. त्याला वाचवण्यासाठी जया गेला असता तोही जखमी होतो. आता सगळे संपले, असे चित्राला वाटते. जयाला ज्या दवाखान्यात दाखल केले असते, त्या दवाखान्यात चित्राला सोना जखमी अवस्थेत दिसते. लालीया आणि जनरल ह्यांच्या हाणामारीत सोना जखमी झालेली असते. लालीयाने चित्राला पळवली म्हणून लालीया आणि जनरल यांच्यात मारामारी होऊन दोघेही मृत्यू पावतात. चित्राच्या मनात मात्र वेगळे चित्र उभे राहते. आता जया बरा होईल, नव्याने जीवन जगता येईल. एकूणच चित्रा ह्या कादंबरीतून पुरुषी समाजव्यवस्थेत स्त्रीचे जगणे कसे भयानक आहे, हेच निदर्शनास येते. उपभोगाची वस्तू म्हणूनच समाज तिच्याकडे पाहतो. स्त्रीचे सौंदर्य हे तिच्यासाठी शाप ठरते. हे ह्याही कादंबरीत दिसते.

## ➢ सूड :

बाबुराव बागुलांची 'सूड' ही कादंबरी १९७२ साली प्रकाशित झाली.[४] 'सूड' ही कादंबरी स्त्रीच्या समस्या चित्रण करणारी आहे. 'सूड' कादंबरीची नायिका जानकी दलित समाजातील स्त्री आहे. दलित स्त्रियांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. त्या संकटांना त्या धीराने सामोऱ्या जातात आणि परिवर्तन स्वीकारतात. सूडची नायिका जानकी स्त्री म्हणून जगणे नाकारते, आणि पुरुष होऊन जगायचे ठरवते.

'सूड' ही जानकी नावाच्या एका तरुण मुलीची कहाणी आहे. विशेष म्हणजे ती तळागाळातल्या दलित समाजातील स्त्री आहे. तिच्याकडे सहजपणे कोणताही पुरुष आकर्षित होईल, अशी ती रूपवान आहे. वयात आल्यापासून तिच्यावर अनेक लैंगिक अत्याचार झाले. तिच्या स्त्री देहाची विटंबना झाली. त्यामुळे तिला आपल्या स्त्रीपणाची घृणा वाटते. आपण आपले अस्तित्वच नष्ट करावे आणि ह्या सगळ्यातून मुक्तता स्वीकारावी, असे तिला प्रकर्षाने वाटू लागते. जीवनातील सगळ्या गोष्टींवरची तिची इच्छाच मरून जाते. तिला वाटू लागते की, तपश्चर्या करून आपले अस्तित्व आणि स्त्रीत्वच नष्ट करावे, असा विचार मनात आल्याबरोबर ताबडतोब ती मोठ्या युक्तीने वेश्यागृहातून बाहेर पडते. हे कसे शक्य आहे, असा प्रश्न जानकारांना पडतो. जानकीला स्त्री म्हणून खूप वाईट अनुभव येतात. अबला समजून तिच्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन तयार होतो. तिच्या आईनेच तिच्यावर अन्याय अत्याचार केला आहे. ह्याही गोष्टीची सल तिच्या मनात आहे. वासनायुक्त भावनेनेच लोक तिच्याकडे बघतात, तिला त्रास देतात. अलखनिरंजन नावाच्या स्वामींची आणि तिची गाठ पडते. त्याला पाहताच तिचे चित्त शांत होते. तिला काहीतरी अभूतपूर्व गवसले असा भास होतो. साधूच्या समवेत ती राहते. त्याच्या स्वभावाचा परिचय झाल्यावर त्याच्याबरोबर ती तीर्थयात्रा करू लागते. हळूहळू जानकीच्या स्वभावात बदल होऊ लागतो. ती इतकी बदलते की, शेवटी

तिची स्त्रीत्वाबद्दलची मनात असलेली घृणा कामेच्छेविषयीचा क्रोध, तिरस्कार नष्ट होतात. स्वत:चे स्त्रीत्व आणि पुरुषाचे पुरुषत्व हे स्वाभाविकच आहे, अशी धारणा झाल्यावर ती आनंदाने प्रणय स्वीकारते. स्वामींना स्वत:मध्ये रममाण होण्याला उद्युक्त करते.

स्वामींकडे येण्यापूर्वी जानकीच्या जीवनात अनेक पुरुष येऊन जातात. पण सगळे वासनांनी बरबटलेले असतात. स्त्रीही उपभोग्य वस्तू आणि वासनापूर्तीसाठीच असते, अशीच त्यांची धारणा असते. अगदी साधू, बैरागी सुद्धा असेच असतात. ते सुद्धा आपल्या वासनेला आवर घालू शकत नाही. पण स्वामींच्या सहवासात जानकीला वेगळ्या प्रकारचे अनुभव येतात. पुरुषांच्या ठिकाणी असणारी महानता दिसून येते. स्त्री सौंदर्याचा आदर करणारी वृत्ती दिसून येते. स्वामींना परिचित होती, ती स्त्री फक्त काव्यातच. त्यांनी स्त्री अनुभवली नव्हती. स्वामींच्या सहवासाने जानकी जीवनाकडे सफलतेच्या दृष्टीने बघते. जीवन हे आनंददायी असते, हे जानकीच्या लक्षात येते. जानकीच्या विचारदृष्टीमध्ये बदल होतो, परिवर्तन होते.

जानकी स्वामींना सांगते, माझी आई वेश्या होती, मी तिच्या पोटी जन्म घेतला. मीही तशीच आहे. स्वामी सांगतात, तरीही तू महान आहेत. स्वामी फक्त तिच्यातली महानताच जाणत होते आणि तिलाही स्वामींमधील महानता जाणवली. माणसाची महानता ओळखणे हीच माणसाच्या पुनरुस्थापनाचा दिवा आहे, आणि अध:पतित झालेल्या माणसाला पुनरुस्थापाशिवाय पर्याय नाही.[५]

जानकी आणि स्वामींमधला हा संवाद खरोखर विचार करायला लावणारा आहे. बागुलांची जानकी दलित स्त्रीच्या वाटेचे सर्व दु:ख घेऊन येते. ती प्रखर वास्तवाच्या जवळ येते. जानकीच्या व्यक्तिरेखेतून मुरळीचे जीवनही समजते. त्याचबरोबर आजही स्त्रीचे शोषण कसे होते, ह्याचाही

प्रत्यय येतो. हिंदू धर्मात आजही स्त्रीला हीन वागणूक दिली जाते. हे 'सूड' वाचताना लक्षात येते. म्हणून 'सूड' ही कादंबरी नाही तर 'सूड' हा ग्रंथ म्हणजे हिंदू धर्माची समीक्षा आहे. जानकीत आंबेडकरी विद्रोह आहे तर स्वामी बुद्धांचे तत्त्वज्ञान आहे. 'सूड' धर्मव्यवस्था नाकारते. धर्माने स्त्रीच्या पदरी दिलेले विदारक जिणे नाकारते. बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा विजय होतो. बाबुरावांना सारा भारत बुद्धमय करायचा आहे. म्हणूनच 'सूड' ही कांदबरी लिहून बाबुराव बागूल समग्र व्यवस्थेला हादरा देण्याचा प्रयत्न करतात.

प्र.श्री. नेरूरकर बाबुराव बागुलांच्या सूडबद्दल गौरवपूर्ण भाषेत लिहितात. "दलित साहित्यवाद हा महान कलाकार कसा ठरतो,ह्याचे ललित सुंदर जीवन संपन्न प्रत्यंतर बाबुरावांच्या देदीप्यमान लेखनकृतीतून डोळस वाचकाला ओसंडून येत राहते. तथागत भगवान बुद्धांची मानवी दु:खाबद्दलची करुणा व मानव समाजाच्या शोषणाविरुद्ध मार्क्स आणि लेनिन ह्यांनी व्यक्त केलेली आत्यंतिक चीडह्या दोन्ही मानवी भावभावनांचे प्रखर रसायन ओतून बाबुरावांनी 'सूड' ही जानकी नावाच्या एका पतित व दुर्दैवी मुरळीची किंवा देवदासीची जीवन कहाणी मराठी वाङ्मयात साकार केली आहे. ती अजोड व अमर आहे."[६]

वरील अभिप्रायातून बाबुराव बागुलांच्या लेखणीचे सामर्थ्य तर कळतेच शिवाय स्त्रीच्या संदर्भात त्यांना असलेली तळमळ आणि शोषण मुक्त जीवन त्यांना अभिप्रेत आहे. परंतु ह्या हिंदु संस्कृतीत स्त्री देहाची विटंबना होते, ह्याचे शल्य त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

## ➢ चक्री :

भीमसेन देठे ह्यांची 'चक्री' ही कादंबरी १९९४ साली प्रकाशित झाली.[७] ह्या कादंबरीत नायिका दगडीचे दु:ख चित्रित केले आहे. दु:खाविरुद्ध

संघर्ष करताना दगडी ही थकून जाते. तिचे पवार मास्तरांवर प्रेम असते. दगडी सालस, निखळ, तिखटही आहे. ह्या दोघांचे प्रेम दगडीच्या आईला मान्य नसते. दगडीची आई दौलतच्या मध्यस्थीने तिचे लग्न लावून देते.पवार मास्तरांच्या मनातील ईच्छा दलित कार्यकर्त्यांना कळते. तेव्हा फार उशीर झालेला असतो. सासरी गेल्यानंतर एक महिन्याच्या आत रेल्वे अपघातात दगडीचा नवरा मरण पावतो. सासूबाई हाकलून देते. माहेरी आल्यावर दगडीची आई तिला पाहून मानसिक धक्क्याने मरण पावते. दगडीवरील प्रेमापोटी मास्तर दौलतच्या मध्यस्थीने दगडीला पुनर्विवाहासाठी मागणी घालतात. दगडी मास्तरांशी लग्न करण्यास नकार देते. मास्तरांचे दुसऱ्यांदा दगडीच्या आयुष्यातून ताटातूट होते. मोलमजुरीकरून दगडी आपले जीवन जगते. दगडी दु:खाच्या खाईत असताना देखील तिचे सगळे सोयरे तिला कुंटणखाण्यात पाठवतात. कुंटणखान्यात पोहचण्यापूर्वी तिच्या मृत नवऱ्यापासून तिला मुलगा होतो. मुलाचे आयुष्य वाया जाऊ नये, म्हणून दगडी मुलाला पवार गुरुजींच्या स्वाधीन करते. दगडी वेश्या बनते, तर दुसरीकडे दगडीचा मुलगा सुरक्षित ठिकाणी वाढत असतो. पवार गुरुजी त्या मुलाचे आईबाप होऊन पालनपोषण करतात. तर दगडी एका वेगळ्या टोकाला पोहोचते, ती वेश्या व्यवसाय करते. ह्याचा अर्थ तिने शरणागती पत्करली, असे म्हणता येणार नाही. तिच्या मनामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या जुलूमांचा एक धगधगता दाह आहे. त्या विरुद्ध बंड करून उठण्याचा विस्तव तिच्या मनात धुमसत आहे. कोठीची मालकीण चंपा देखील एक स्त्री आहे. इतर वेश्याही माणुसकीने भरलेल्या अन्यायाला बळी पडलेल्या स्त्रियाच आहेत. हेमा आणि जमना यासुद्धा चांगल्या घरातून आलेल्या मुली ह्या नरकात अडकल्या होत्या. ह्या स्त्रियांच्या शरीर विक्रीवर जगणारे मस्तवाल पाहून, गुंडदादा हप्ते वसूल करणारे पाहून दगडीच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. ह्या फुकट खाऊंना धडा शिकवलाच पाहिजे, असे तिला वाटते. दिसायला नाजूक सुंदर असणारी दगडी हाडाने मजबूत आहे. कुंटनखाण्यात एका जपानी बाई निलुताई कराटे शिकवण्यास येत असे.

त्यांच्याकडून ती कराटे शिकते. आत्मसंरक्षणापुरते तिला चांगले संस्कार व शिक्षण मिळते. एकेदिवशी कोठी मालकीण चंपाला मारणाऱ्या कुप्रसिद्ध गुंडाला धुऊन काढते. तेव्हापासून चक्रीला सगळा कामाठीपुरा घाबरतो. सगळेजण घाबरून जातात. पुढे दगडी कोठीची मालकीण बनते. तिचा दरारा वाढल्यामुळे भलेभले गुंड तिचे नाव काढताच भयकंपित होतात. पुढे हा व्यवसाय सोडून ती परित्यक्ता स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांना छोटा मोठा उद्योग स्वीकारणारा आश्रम दगडी उभा करते.

दुसऱ्या बाजूला मास्तरांकडे वाढलेला चक्रीचा मुलगा प्राध्यापक होतो. लग्न झाल्यावर तो एकदम पांढरपेशासारखे वागू लागतो. उच्च वर्गात प्रवेश केल्याचे स्वप्न बघू लागतो. दलित समाज दलित चळवळीशी फटकून वागतो. परंतु त्याचा मुलगा म्हणजे दगडीचा नातू मात्र आंबेडकरवादी बनतो. आपल्या मुलाला पहावे, असे दगडीला वाटते. पवार गुरुजी माधवला सगळी हकिकत सांगतात. आपली आई जिवंत आहे, हे माधवला माहीत नसते. दगडीला माधवसमोर मास्तर उभे करतात. तेव्हा दलित ब्राह्मण झालेला शिक्षित मुलगा माधव तिचा तिरस्कार करतो, तो तिला हाकलून देतो. राहूलची मात्र तिच्यावर माया जडते. सर्व अन्यायाने दगडी एवढी आवाक होते की, तिची वाचाच जाते. ती मुंबईला निघून येते. शेवटी मुंबईला तिचा नातू तिला शोधायला येतो. मुलाच्या प्रेमाने तो आजीला आई म्हणून हाक मारतो. तेव्हा तिला मातृत्वाचा स्पर्श झाल्याचे जाणवतो आणि तिची वाचा परत येते. चक्री सुद्धा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची बळी कशी ठरते, हेच चक्रीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

भीमसेन देठे ह्यांच्या 'चक्री' कादंबरीतील नायिका जीवन संघर्ष करते. जातिव्यवस्थेची बळी ठरते. परंतु असे असताना देखील ती व्यवस्थेला धडा शिकवण्याचा प्रयत्न करते. ते तिचे वेगळेपण नजरेत भरणारे आहे.

भीमसेन देठे ह्यांच्या चक्री कादंबरीबद्दल अरुण साधू म्हणतात की, "प्रस्तुत कादंबरीत देठे यांनी दलित जीवनातील टोकाचा, पण सर्व समाजस्पर्शी पैलू चित्रणासाठी घेतलेला आहे. त्यामुळे गाभा दलित पात्रांचा असला तरी कादंबरी दलित साहित्याच्या कुंपनाबाहेर पडते. दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे कादंबरीत दलितांचे दैन्य, दु:ख, पिळवणूक व त्यांच्यावरील अज्ञान याबद्दल करुण विलास अथवा आक्रस्थाळी राग नसून अन्यायी जातीनिरपेक्ष शक्तीविरुद्ध लढण्याचा संकेत आहे."[७] अरुण साधू ह्यांचे भाष्य 'चक्री' ह्या कादंबरी व लेखकाविषयी यथार्थ आहे.

## ➢ कसरत :

सुशीला संकपाळ ह्यांची 'कसरत'ही कादंबरी २००१ साली प्रसिद्ध झाली.[१] प्रस्तुत कादंबरी सुशील संकपाळ ह्यांनी एका दलित स्त्रीला दुर्दैवाचे दशावतार कसे भोगावे लागतात, याचे चित्रण केले आहे. कादंबरीतील नायिका सुलभा धडाडीने आणि झुंजारपणे जीवनाला सामोरी जाते. ती परिस्थितीला शरण जात नाही किंवा हतबल होत नाही. वाईट परिस्थितीमध्ये स्त्री एकटी सुद्धा यशस्वी होऊ शकते, असे स्वकर्तृत्वाने सिद्ध करून दाखवण्याऱ्या सुलभाची कहाणी 'कसरत' मध्ये येते. सुलभा कोणाच्या सहानुभूतीची आणि दयेची अपेक्षा करत नाही. खेड्यातून आलेली सुलभा लाजरी, बुजरी आणि नवखी असते. मुंबईत पाऊल टाकल्यानंतर इथली गर्दी बघून तिला मुंग्यांची रांग चांगली असे वाटू लागते. मुंबईत तिची स्वत:ची गती आणि मुंबईकरांची गती तिला सहन होत नाही. नव्या ठिकाणी आलेल्या सुलभाला हळूहळू सत्य घटना कळू लागतात. आपला नवरा चोर, खुनी आणि हल्लेखोर आहे, हे तिला समजते, त्यातच त्याचा मृत्यू होतो. सगळा संसार आणि मुलांचा भार तिच्यावर पडतो. तिला कसलाही पर्याय उरत नाही. परिस्थितीवर मात करून ती मुलांचा सांभाळ करून त्यांना मोठे करणे एवढेच ध्येय तिच्यापुढे उभे राहते. आपला नवरा गेला,ह्या दु:खात ती

बुडत नाही. कारण दु:ख उगाळण्यापेक्षा त्या दु:खावर मात करणे तिला महत्त्वाचे वाटते. ती आपल्या दु:खाचे भांडवल करत नाही. परिस्थितीशी दोन हात करते. कोणाचाही आधार नसतांना स्वत:च स्वत:चा आधार निर्माण करते. शेतात काढणी, मोडणी करते. विहिरीवर खाण मजुराप्रमाणे राबते. दिवसभर सडकेवर माती टाकून संध्याकाळी दिव्याच्या उजेडात अभ्यासाचे पुस्तक हाती घेते. नवऱ्यानंतर जिद्दीने प्रचंड कष्ट उपसते, आणि मुलांना जगवते, शिकवते. दहावी शिक्षण घेतलेली सुलभा ह्या सगळ्यात स्वत:ला विसरून जाते. एका मुलाला डॉक्टर तर दुसऱ्याला इंजिनिअर करते आणि मुलीला वकील बनवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र दिला होता. तो मूलमंत्र खऱ्या अर्थाने सुलभामध्ये उतरलेला दिसून येतो. शिक्षणाच्या जोरावर ती निर्भय बनते. हतबल बनत नाही आणि एक तेजस्विनी स्त्री म्हणून जीवन जगते.

'कसरत'ह्या कादंबरीतील नायिका सुलभाबाबत डॉ. सुभा चिटणीस म्हणतात, "स्त्रीच्या जीवनाची वेल बहरतानाच तिला अनेक मर्यादा असतात. ह्या मर्यादा सांभाळून जेव्हा ती परघरी जाते. तेंव्हा तर जणू तिला कुंडीतील बॉन्सायप्रमाणे बहरायचे असते. फळे द्यायची असतात. पण आपली स्वत:ची वाढ खुंटवून वाढीच्या मर्यादा सांभाळून नावापुरते अस्तित्व टिकवून सर्वांना प्रसन्न ठेवायचे असते. ह्या कडवट सत्याचा घोट तिला चौदा वर्षे वयातच गिळून टाकावा लागला."[१] हसण्या बागडण्याच्या वयातच सुलभावर कौटुंबिक जबाबदारी पडल्यामुळे तिचे व्यक्तिमत्त्व खुंटण्याची भीती असते पण येथे सुलभा आपल्या कर्तृत्त्वाच्या जोरावर एक नवा आदर्श निर्माण करते. हे विसरून चालणार नाही. सुलभा ही स्वत:ची गती खुंटवून कुटुंबाची, संसाराची आणि मुलांची प्रगती करण्यासाठी संघर्ष करते आणि त्यात ती यशस्वी होते. स्वत:साठी न जगता ती कुटुंबासाठी जगते. हे तिचे वेगळेपण नजरेआड करून चालणार नाही.

➢ **झुलवा :**

उत्तम बंडू तुपे ह्यांची 'झुलवा' ही कादंबरी १९८२ साली प्रकाशित झाली.[११] जोगतिणीचे जीवन चित्रण करणारी ही एक वास्तवादी कादंबरी आहे. जगन ही ह्या कादंबरीतील महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. जगन ही येलू जोगतिणीची मुलगी आहे. ती अभ्यासात हुशार असून तिला शाळा शिकून नर्स व्हायचे असते, म्हणून ती शाळेतील सर्व कार्यक्रमात सहभागी होत असते. आपले स्वप्न साकार करण्यासाठी ती धडपडत असते. परंतु मध्येच तिला प्रश्न पडतो. आपल्याला आपले स्वप्न साकार करता येईल काय? कारण आपण एका जोगतिणीची मुलगी आहोत. आपल्या आईचे ज्या पद्धतीने देवाबरोबर लग्न झाले तसेच एक दिवस आपलेही लग्न देवाबरोबर लावले जाईल. यल्लमा देवीचा मुखवटा असलेली देवीची टोपली डोक्यावर घेऊन जोगवा मागत दारोदार फिरावं लागणार. आपल्याला बाप नाही. उद्या आपल्यालाही मूल झाले, तर त्याचीही गत अशीच होईल. त्या मुलाचे आईबाप आपल्यालाच व्हावे लागेल, असे अनेक प्रश्न तिच्या मनात निर्माण होऊन ती उद्विग्न होते.

परंतु जगनचे दुसरे मन त्यावर मात करून उफाळून येत असते. जगनचे चाकोरी बाहेरील वागणे परसूला मान्य होत नाही. तिची शालेय प्रगती परसूला सारखी खटकत राहते. परसू जगनला धाकात ठेवू पाहत असे. जगनच्या ह्या वागण्यावरून परसू येलूला सारखे टोचत असे. सारखे जागृत करत असे. येलू मात्र परसुकडे दुर्लक्ष करते. कारण तिलाही अंतकरणापासून वाटत असते की, जगनने शिक्षण घेऊन स्वावलंबी व्हावे. ह्या अनीतीच्या जगापासून दूर जावे. परंतु तृतीयपंथी परसूला ते पटत नाही. त्याला वाटते जगनने जोगवा मागावा. आपल्या जवानीचे भांडवल करून कमाई करावी. जीवनातील ऐहिक सुखे उपभोगावी. ह्यासाठी तिने नाटक, तमाशामध्ये काम करावे.

परसूला जे वाटते, ते जगनला मान्य होत नाही. तिला वाटते, स्वावलंबी जीवन जगावे म्हणून ती स्वत:च्या हिंमतीने पैसे कमावून शाळेत जाण्याची इच्छा प्रकट करते. शिकून जोगतिणीचा आपल्यावर बसलेला शिक्का पुसून टाकण्याचा प्रयत्न करते. म्हणून मजुरी करण्यासाठी विहिरीच्या कामावर जाते. परंतु जोगतिणीची मुलगी म्हणून तिला चांगली वागणूक मिळत नाही. तेथून ती शेतावर मजुरी करण्यासाठी जाते. तेथे जोगतिणीची मुलगी म्हणून तिला मजुरी देत नाहीत. जगनला वासना विकाराच्या जगातून मुक्त व्हावेसे वाटते. माणूस म्हणून जगावेसे वाटते पण परसू आणि येलू तिला मार्ग बदलू देत नाही आणि शेवटी तिला जोगवा मागायला घराबाहेर पडायला लागते. तेव्हा तिला खऱ्या दुनियेची ओळख व्हायला लागते.

गावच्या जत्रेसाठी नाटक बसवायचे असते. सभापतीचा मुलगा जयंत येलूला सांगतो, त्या नाटकामध्ये जगनने काम करावे. मुलीच्या प्रेमाखातर येलू तयार होते. जगन नाटकात काम करते. तिच्या आयुष्याचेच नाटक होते. ती जयंतवर प्रेम करू लागते. खरेतरं जयंताचे प्रेम हे तिच्या आयुष्यातील पहिले प्रेम असते. जयंत जगनच्या प्रेमाचा विचार करत नाही. त्याला फक्त आपल्या देहाची भूक भागवायची असते. शेवटी आपल्या खानदानाच्या अब्रूचा प्रश्न निर्माण करून तो जगनला सोडून देतो. दुसऱ्या मुलीबरोबर लग्न करून सुखी जीवन जगतो. ह्यामुळे जगनची शाळा कायमची सुटते. हेडमास्तरांच्या म्हणण्याप्रमाणे जगन त्यांना प्रतिसाद देत नाही. म्हणून जगनचे नाव शाळेतून काढून टाकले जाते. जगनला आलेल्या ह्या वाईट अनुभवामुळे तिला तिचे मन मोडता येत नाही. भावी आयुष्यात आपल्याला काय व्हायचे आहे. तिच्या इच्छा आणि अपेक्षा येलू परसु यांना स्पष्ट सांगता येत नाहीत. तिच्या मनाचा विचार न करता जबरदस्तीने तिला देवाला वाहतात. अनेक अडचणींना तोंड देत देत तिचे कारण करतात. ह्या मागील हेतू असा की, जोगतिणीचे कारण झाल्याशिवाय तिला झुलवा लावता येत नाही. म्हणून अगोदर तिचे कारण करून घेतात. आता जोगवा मागत हिंडण्यापलीकडे तिचे काहीच काम उरत नाही.

ज्या जगनला शिकून सवरून मोठे व्हावे, नर्स व्हावे, असे मनोमन वाटत होते. त्या जगनच्या स्वप्नाचा चक्काचूर होतो. पुढे तिच्या आयुष्यात किष्णा येतो. संसार सुखाला आचावलेली जगन किष्णावर जीव टाकते. आयुष्यभर त्याची संगत मिळावी म्हणून प्रयत्न करते. आता मात्र ती कोणाच्या दबावाला बळी पडायचे नाही असे ठरवते. किष्णा तिला धर्मग्रंथ वाचायला देतो. बऱ्याच कालावधीनंतर तिची पुस्तकांशी पुन्हा भेट होते. ह्या पुस्तक वाचनातून जोगत्यांची आणि इतर दुनियेची तिला ओळख होते. तिचे मन अस्वस्थ होऊ लागते. जगनबरोबर किष्णाने झुलवा लावावा, असे येलूला वाटते. कारण जगनच्या पोटात किष्णापासून गर्भ आकारास येत असतो. जगन ते मूल वाढवणार असते. जगनच्या आईचा निर्णय वास्तवाला धरून आहे. किष्णाही जगनशी लग्न करण्यास तयार आहे. पण अचानक तो आजारी पडल्याने आणि घरावर अनेक संकट आल्यामुळे जगनच्या घरच्यांचा गैरसमज होतो. त्यांना वाटते हा सर्व प्रकार जगनमुळेच झाला आहे. म्हणून ऐकेदिवशी जगन आपल्याबद्दल गैरसमज दूर करण्यासाठी किष्णाची भेट घेते. तुझ्या घरावर मी किटाळ आणलं नाही. हे जोगत्याच जग फसवं आहे. यल्लमा देवी खोटी आहे. माणसाच्या मनातल प्रेम खरं आहे. माणसानेच माणसाला समजून घेतलं पाहिजे. माणसाने दु:ख अडचणी समजून घेऊन एकमेकांना आधार देऊन एकत्रितपणे जीवन जगले पाहिजे. ह्या सर्व बाबी ती किष्णाला पटवून देते.

शिक्षणाने शहाणपण आलेली जगन आणि किष्णा ह्यांचा अखेर विवाह होतो. कालांतराने ती बाळाला जन्म देते. किष्णा मात्र तिच्यापासून दूरच असतो. जगन आपल्या बाळाला घेऊन आईकडेच रहाते. एकेदिवशी बाळ आजारी पडते. डॉक्टरकडे घेऊन जाणे अत्यंत गरजेचे असते. मुसळधार पावसात जगन बाळाला घेऊन दवाखान्यात निघते. जगनची आई मात्र बाळ दवाखान्यात घेऊन जाण्यास विरोध करते. यल्लमाच्या कोपामुळेच बाळ आजारी पडले, असे तिला वाटते. तेव्हा ते देवाच्या चरणी वाहा, असे ती जगनला सुचवते. ह्या सर्व प्रकाराची जगनला अतिशय चीड येते.

ती यल्लमाचा मुखवटा उचलते आणि नदी पात्रात फेकून देते. तिला अडवण्यासाठी गेलेली येलू पुराच्या पाण्यात वाहत जाते. जगन घरात परत येते. बाळ सुरक्षित आहे हे पाहून तिला आनंद होतो. पारंपरिक रूढिग्रस्त जीवन झुगारून आपण आपल्या बाळाला एका चाकोरीतून मुक्त केल्याचे समाधान तिच्या चेहऱ्यावर असते. स्वत: ती जोगतिणीच्या बंधनातून मुक्त होते. अन्यायग्रस्त, रूढिग्रस्त परंपरेची झालर उतरवून ती नव्या युगाच्या जगाला सामोरी जाते. जोगतीण म्हणजे इथल्या हिंदू पुरुषसत्ताक व्यवस्थेने आपल्या लैंगिक गरजा भागवण्यासाठी निर्माण केलेल्या व्यवस्था आहे हेच 'झुलवा' कादंबरीतून स्पष्ट होते.

जगनच्या व्यक्तिरेखेतून लेखक जोगतीण ह्या परंपरेला छेद देतो. स्त्रीचे सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात अवमूल्यन होऊ नये, असे त्यांना वाटते. म्हणूनच जगनच्या रूपाने रूढी परंपरा नाकारणारी नायिका ते उभी करतात. स्त्रीलाही मन आहे, भावना आहेत. तिलाही सुंदर जीणे जगता यावे म्हणून परंपरेची जोखडे तिने फेकून दिली पाहिजे. हेच 'झुलवा' कादंबरीतील जगन सुचवते.

### ➢ ७२ मैल:

अशोक व्हटकर ह्यांची '७२ मैल' ही कादंबरी १९८९ साली प्रकाशित झाली.[१२] एका विशिष्ट कालावधीमध्ये घडलेल्या सत्य घटना मांडणारी ही कादंबरी आहे. एखाद्या स्त्रीच्या वाट्याला येणारे दु:ख कल्पनेपलीकडे असते. ह्या कादंबरीतील नायिका राधाक्काला कशाचाही आधार नाही. आभाळ हेच छप्पर, धरती हिच निवारा आणि तिची सहा मुले हिच तिची संपत्ती आहे. त्यातही ती अस्पृश्य समाजातील आहे. त्या स्त्रीच्या जीवनात येणारे दु:ख आणि तिच्या वाट्याला आलेला संघर्ष हा ह्या कादंबरीचा मूळ विषय आहे. लेखक शिक्षणात लक्ष नसल्यामुळे साताऱ्यातील रयत शिक्षण संस्थेतून पळून जातात. सातारा ते कोल्हापूर ह्या

साडेतीन दिवसाच्या ७२ मैल प्रवासात त्यांना राधाक्का अचानक भेटते, दोघांचीही दु:खे एकच आहेत. आर्थिकता आणि जातीयता ह्यामुळे ते समदु:खी होतात. ह्याप्रवासात राधाक्का आणि अशोकला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कधी भीक मागावे लागते. तर कधी हिरवी भाजी खाऊन दिवस काढावे लागतात. ह्या प्रवासात त्यांच्यावर अनेक कठीण प्रसंग येतात. एकदा एका विहिरीत असणारे पोळे काढण्यासाठी अशोक आणि रानू जातो. विहिरीतल्या शेवाळात रानू गुरफटून जातो. त्यातून अशोक रानूला वाचवतो. तर एकदा अजगरासारखा साप त्यांचा रस्त्यात पाठलाग करत असतो. असे एका पाठोपाठ एक प्रसंग येतात. पुढे असाच एक जीवघेणा प्रसंग ओढवतो. एका भल्यामोठ्या झाडाचे रसरशीत आवळे खाण्याचा मोह रानू आणि अशोकला होतो. अंगातल्या शर्टामध्ये भरपूर आवळे कोंबून भरधाव धावणाऱ्या रानूला नागीण डसते. त्यातच रानूचा अंत होतो. एक कर्तासवरता मुलगा गेल्यामुळे राधाक्काला दु:ख होते. बेवारश्यासारख्या त्या मुलाला टाकून पुढे जाते. असाहाय्य, अगतिक राधाक्का काहीच करू शकत नाही. त्यांचा हा प्रवास चालू असताना रस्त्याने चालत असताना एक मस्तवाल घोडा राधाक्काचा अशक्त मुलगा चंदर ह्याला चेंगरतो. त्याला ती ट्रकमध्ये बसवून डॉक्टरांकडे घेऊन जाते. चालकाची नजर राधाक्काच्या मुलीवर म्हणजे बायजीवर असते. बायजीने नकार देताच ट्रकचालक शिव्या देऊन ढकलून देतो. चालत चालत ते एका दवाखान्यात येतात. चंदरची देखभाल डॉक्टर नीट करत नाहीत. पुढे गेल्यावर दोन तीन मुले घागरी घेऊन जाताना दिसतात. त्यांच्याकडे पाणी मागितले असता ते पाणी जमिनीवर टाकतात. पण ह्या मुलांना देत नाही का तर अस्पृश्यांना पाणी द्याचे नाही. लेखकाला वाटते, पाणी कुणीच बनवीत नाही. ती निसर्गाची देणगी आहे. पाणी कुणाचीही हक्काची मालमत्ता नाही. तरी त्यांना पाणी मात्र दिले नाही. पुढे जाऊन ते एका डबक्यात साचलेले पाणी पिऊन तहान भागवतात.

राधाक्काच्या जीवनात एका पाठोपाठ एक अनेक प्रसंग येतात. राधाक्काचे एक मूल तर भूकेने तडफडून तिच्याच मांडीवर प्राण सोडते.

आपल्या पोटच्या गोळ्यांना मूठमाती न देता स्वतःच दूर फेकण्याची पाळी राधाक्कावर येते. रानूचा मृत्यू झाल्यानंतर ती लेखकाचा रागराग करत असते. परंतु ती बोलून दाखवत नाही. चालून चालून हे सर्वजण थकलेले असतात. म्हणून ते सर्वजण एका ओढ्यात लवंडतात, परंतु वळवाच्या पावसाचा लोंढा प्रचंड वेगाने येतो. काही कळायच्या आत सगळे वाहून जातात. तरीही राधाक्का तीनही मुलांना बाहेर काढते, पण तिला अशोक दिसत नाही. तोपर्यंत तो वाहत चालला होता. हे राधाक्काच्या लक्षात येताच तिच्या हडकुळ्या शरीरात इतके बळ येते की, एका झटक्यात ती अशोकला बाहेर काढते. प्रबळ शक्तीच्या जोरावर आणि अशोकबद्दलची माया तिच्यात बळ निर्माण करते. अस्पृश्य म्हणून राधाक्काला प्रवासात आलेल्या अडचणी तिच्या व तिच्या मुलांच्या जीवावर बेततात. तिला तीन मुलं गमवावी लागतात. पोटाची भूक भागवता येत नाही, आणि आर्थिक अडचणींमुळे सुखकर प्रवास करता येत नाही. तिच्या जीवनाची फरपट होते. एका बाजूने अस्पृश्य जातीत जन्म आणि दुसऱ्या बाजूने स्त्री अशा दुहेरी संकटात सापडलेली राधाक्का खंबीरपणे उभी राहण्याचा प्रयत्न करते पण परिस्थिती तिला हतबल करते. समाजातील अस्पृश्यता जातीयता ह्यांचे चटके सहन करूनही तिच्या वाट्याला चांगले दिवस येत नाही, हे सत्य ह्या कादंबरीतून स्पष्ट होते.

## ➢ खाई :

उत्तम बंडू तुपे ह्यांची 'खाई' ही कांदबरी १९९२ साली प्रकाशित झाली.[१३] "'खाई' कादंबरीची नायिका सावरी ही दिसायला सुंदर आणि अंगाने सडपातळ आहे. माहेरची गरिबी असूनदेखील चारपैसे खर्चून तिचे लग्न

आईवडील विष्णूशी लावून देतात. सावरी सासरी आल्यानंतर तिचा सासरा सोमा वखवखलेल्या नजरेने तिच्याकडे बघतो. त्याचा ओंगळवाणा स्पर्श सावरीला नकोसा वाटतो. सावरीला त्याच्याविषयी घृणा निर्माण होते. परंतु सासऱ्याची तक्रार कोणाकडे करायची हा तिच्यासमोर प्रश्न निर्माण होतो. कारण विष्णूसमोर सोमा सावरीवर मुलीसारखे प्रेम करतो. तिची काळजी घेतो. पण विष्णूच्या गैरहजेरीत मात्र सोमाची वाईट नजर सावरीवर फिरत असते. नोकरीनिमित्त विष्णू मुंबईला जातो. त्याच्या अनुपस्थितीत सावरीवर सासऱ्याकडून अतिप्रसंग ओढवतो. सावरी आरडाओरड करायला सुरुवात करते. ह्या गोष्टीची गावात कुजबुज सुरू होते. कालांतराने ही घटना विष्णूला समजते. परंतु विष्णू सावरीलाच मारहाण करतो. कालांतराने वडील सोमाचा मृत्यू होतो. त्याचाही राग सावरीवरच काढला जातो. असह्य झालेली सावरी मानसिक आणि शारीरिक छळांना कंटाळून जाते. कंटाळलेली सावरी शेतमालकाच्या आश्रयाला जाऊन राहते. पुढे विष्णू ह्या संधीचा फायदा घेऊन दुसरे लग्न करतो. गावातील लोक विष्णूची समजूत काढण्याचा प्रयत्न करतात. पण विष्णू कोणाचेही ऐकत नाही. शेवटी सर्व गावच त्याच्यावर तुटून पडतो. सावरीला ही घटना समजताच सावरी त्याला वाचवण्यासाठी मध्ये पडते. ह्या सगळ्या गदारोळात सावरीला कुणीतरी दूर ओढून नेऊन तिच्या अंगाच्या चिंध्या-चिंध्या करून टाकते. दुसऱ्या दिवशी तोंडात बोळा घालून पडलेली सावरी अक्कीला दिसते. सावरीला पाणी पाजून ती शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करते. शुद्धीवर आलेली सावरी खाली मान घालून निघून जाते. 'स्त्री' जीवनातील एक सामाजिक प्रश्न लेखकाने येथे हाताळला आहे. सुंदरता हा स्त्रीला शाप आहे. मग ती दलित असो अथवा सवर्ण समाज तिच्याकडे वखवखल्या नजरेनेच पाहत असतो. नवऱ्याच्या नेभळटपणामुळे ती सासऱ्याची शिकार बनते. नवऱ्याकडून आणि सासऱ्याकडून तिचा मानसिक आणि शारीरिक छळ होतो. तरी ती अबला बनून सहन करत राहते. आपण एक स्त्री आहोत. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विरोधात जायचे नाही, हा विचारच स्त्रीला अधोगतीकडे घेऊन जाणारा आहे. परिस्थिती शरण

जाणारी सावरी सासरा नवरा आणि शेवटी नवऱ्याला वाचवताना समाजाची शिकार होते. आधुनिकतेच्या युगातही काळ कितीही बदलला तंत्रज्ञान कितीही विकसित झाले तरी पुरुषी मनोवृत्ती बदलताना दिसत नाही. अशा कितीतरी सावरींना मुकाटपणे अन्याय अत्याचार सहन करावा लागतो, हे सावरीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

## ➢ गधाड :

शशिकांत तासगावकर ह्यांची 'गिधाड' ही कादंबरी १९९७ साली प्रसिद्ध झाली.[१४] प्रस्तुत कादंबरीत सखू ह्या दलित स्त्रीची अगतिकता स्पष्ट केली आहे. सातारा जिल्ह्यातील गोरेगाव गावातील मातंगाच्या वस्तीत भागाबाई नाकम स्त्री गरिबीतही संसाराचा गाडा नेकीने ओढत आहे. तिला तीन अपत्य आहेत. ती ज्या वस्तीत राहते आहे. त्या मांग वस्तीत खुडे, बोभाटे, अवघडे आणि वायदंडे आडनावाची घरे आहेत, त्यांच्यात पिढिजात वैर आहे.

एकेदिवशी सखू आणि वस्तीतील एक मुलगा साहेब्या खोटा-खोटा लग्नाचा खेळ खेळत असतात. ही गोष्ट सखूच्या मोठ्या भावाला समजते आणि तो साहेब्याला, सखूला मारतो आणि सखूला आईकडे सुपूर्द करतो. अचानक लहानग्या सखूचे अवघडे कुटुंबातल्या गणू ह्या आबाच्या सालस मल्हारीसोबत लग्न होते. सखूला लहान मुलांची हौस असते. पण लग्न होऊनही तिला लवकर मूलबाळ होत नाही. सखूचा नवरा आनंदा पाटलांकडे चाकरी करत असतो. सखूच्या रूपाच्या प्रभावाने आनंदा पाटील मल्हारीला चढती वाढती रोजगारी देतो. एका रात्री आनंदा पाटलाच्या राखणीला गेलेल्या मल्हारीला अंधारात सर्पदंश होतो. खूप प्रयत्न करूनही अखेर तो मरण पावतो. सखूवर आभाळ कोसळते. सखू दुसरा संसार न थाटता आपल्या सासऱ्याला सांभाळत दिवस काढते.

जत्रेत काढलेल्या आपल्या दोघांच्या घरातल्या एकुलत्या एक फोटोकडे पाहत सखू दिवस काढते. गावातील मन्या दुकानदार, आनंदा पाटील, मल्हारीचा चुलतभाऊ शिऱ्या सखूकडे वाकड्या नजरेने पाहत असतात. शिऱ्याच्या बायकोला ही नवऱ्याची खोड माहीत आहे पण गिरिजाला असे वाटते की सखूच आपल्या नवऱ्याला भुलवते आहे. शिऱ्या सखूसाठी वेडा झालेला आहे. अशातच महाविद्यालयीन शिक्षण घेणारा सत्या तरुणही सखूच्या प्रेमात पडला आहे. एकेदिवशी शिऱ्या सखूच्या सासऱ्याला गांजा पाजून तर्र करतो. सखूवर बळजबरी करण्याचा प्रयत्न करतो. पण ती ओरडल्यावर पळून जातो. ही गोष्ट आबाला कळल्यावर गणू आबा त्याला चपलीने मारतो. मन्या दुकानदार, आनंदा पाटील, शिऱ्या यांच्याकडून त्रस्त झालेल्या सुनेला तिचा सासरा माहेरी सोडतो. गणू आबाचे खाण्यापिण्याचे हाल होऊन शेवटी तो मरतो.

गोरेगावात सखूच्या लग्नाच्या हालचाली सुरू होतात. पण योग्य स्थळ येत नाही. त्यातच गावात काळेवाडीचा श्यामराव घाडगे मास्तर बदली होऊन गोरेगावच्या शाळेत दाखल होतो. तो विधूर आहे. त्याला दोन मुले आहेत. खोली शोधत-शोधत तो सखूच्या घरी येतो आणि तेथेच राहतो. सखूच्याही घरच्यांचा विरोध होत नाही. त्यांना पैसा प्रिय असतो. घाडगे मास्तरांच्या मुलांना सखूचा चांगला लळा लागतो. सखूला घाडगे मास्तर लग्न करायचे वचन देतो. तसा घाडगेमास्तर ही स्त्रीलंपटआहे. सखूकडे तो शरीरसुखाची मागणी करतो. लग्नानंतर ह्या गोष्टी ठीक आहेत अशी सखू म्हणते, तेव्हा तो निघून जाण्याची धमकी देतो.

सखूच्या जीवनात अनेक वादळी संकटे आलेली असतात. सर्पदंशाने लग्नानंतर नवरा मरतो. शिऱ्यानं गावभर बोभाटा केलेला असतो. आनंदा पाटलानं वाड्यात धरायचा प्रयत्न केलेला असतो. संत्या आशा लावून जातो. मन्या दुकानदारही त्रास देतो. घरातील ही सखूकडे कोणी

काळजीने पाहत नाही. सर्वच बाजूंनी सखूची कोंडी झालेली असते. सखू अगतिक होते, मास्तर तिचा उपभोग घेऊ लागतो.

कालांतराने मास्तरला सखू शिळी झाल्यासाखी वाटते. तो दुसऱ्या मुली शोधत राहतो. शाळेला सुट्टी पडते. आई वडिलांचा विचार घेऊन येऊन मग लग्न करू, असे तो सखूला खोटेच सांगतो. त्याची नजर त्याच्या मेव्हणीवर असते. पण तेथे डाळ शिजत नाही. सुट्टीवरून मास्तर परत येतो. सखूचा उपभोग घेतो आणि कायमचाच पसार होतो. शरीराचे लचके तोडले गेलेली सखू रडून रडून शोक करते. सर्वच जण तिच्या शरीराचे लचके तोडायला तयार होतात, पण तिची जबाबदारी कोणी स्वीकारत नाही. हाच तिला अनुभव येतो. अगतिक सखूचे सर्वजण सौंदर्य ओरबडण्याचा प्रयत्न करतात. परंतु तिला कोणी मदत करत नाही. सामाजिक, आर्थिक सर्वच पातळीवर तिच्यावर अन्याय-अत्याचार होतात. समाजव्यवस्थेची ती बळी ठरते. मास्तर गिधाडाप्रमाणे तिच्यावर तुटून पडतो. पण तिची देखभाल करत नाही. सर्वच बाजूने सखूवर दुःख ओढवते. गिधाडाने काय लचके तोडले असते, तेथे भावनेला जागा नसते. कामभावना शमविणे एवढेच त्यांना ठाऊक असते. अशी अगतिक सखू गिधाडे ह्या कादंबरीत दिसते.

सारांश, दलित कादंबरीतील स्त्री जीवनाचा वेध घेता असे निदर्शनास येते की, दलित स्त्रीच्या वाट्याला आलेल्या दुःखाचे, अन्याय, अत्याचाराचे चित्रण, तिच्यावर आलेली संकटे, आर्थिक परिस्थितीमुळे स्वीकारावी लागलेली लाचारी ह्या सर्वच बाबींमुळे ती पुरुषप्रधान समाजव्यवस्थेची बळी ठरते. वरील कादंबऱ्यातील सर्वच स्त्रिया ह्यापरिस्थितीच्या बळी ठरलेल्या आहेत, हे वरील विस्तृत विवेचनावरून लक्षात येते.

संदर्भटीपा :

१. साठे अण्णाभाऊ 'चंदन', शेट्ये प्रकाशन, कोल्हापूर, १९७२, पृ.१
२. साठे अण्णाभाऊ 'चित्रा', विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, पृ.१
३. साठे अण्णाभाऊ 'चित्रा', विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, पृ.८
४. बागूल बाबुराव, 'सूड', अभिनव प्रकाशन मुंबई, १९७०, पृ. १
५. कऱ्हाडे सदा, 'मराठा', रविवार पुरवणी, १४ फेब्रुवारी, १९७१
६. देठे भीमसेन, 'चक्री', प्रसार प्रकाशन, मुंबई, १९९४, पृ. ८
७. साधू अरुण, 'महाराष्ट्र टाईम्स', रविवार दि. ११ जून १९९५, पृ.क्र. ४
८. नेरूरकर प्र. श्री. 'माय मराठी', दलित साहित्य विशेषांक, पृ. २९
९. संकपाळ सुशीला, 'कसरत', पुष्पक प्रकाशन पुणे, २००१, पृ. क्र.१
१०. चिटणीस सुभा, 'नवशक्ती', रविवार दि. १४ एप्रिल २००१, पृ. ५
११. तुपे उत्तम, 'झुलवा', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ. १
१२. व्हटकर अशोक, '७२ मैल', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८९, पृ. १
१३. तुपे उत्तम, 'खाई', पी.आर.पी. प्रकाशन पुणे, १९९२, पृ. १
१४. तासगावकर शशिकांत', 'गिधाड', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९७, पृ. १

## ५. दलित नाटकातून अवतरलेली स्त्री

**प्रस्तावना :**

दलित साहित्यात कथा, कादंबरी, आत्मकथन, कविता ह्या वाड्मय प्रकारात दलित स्त्रीचे जे चित्रण झाले आहे, ते दुय्यम दर्जाचे असे आहे. तिच्या वाट्याला येणारी सततची उपेक्षा, तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार याचे दर्शन उपरोक्त वाड्मयप्रकारातून घडते. कुटुंबासाठी काबाडकष्ट करणारी, राबराब राबणारी, उदरनिर्वाहासाठी कामाच्या शोधार्थ बाहेर पडणारी अशी ही स्त्री आहे. हे सर्व करत असताना तिला समाजाबरोबरच सवर्णांच्या नजरेलाही बळी पडावे लागते. कधीकधी त्यांच्या कामांध नजरेची शिकार व्हावे लागते. परंतु दलित नाटकावर एक दृष्टिक्षेप टाकला असता, पारंपरिक दलित स्त्रियांच्या जीवनबरोबर दलित कुटुंबात आलेल्या व दलितांना आपले मानणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा दलित नाटकात प्रकर्षाने दिसून येतात. शिवाय आंतरजातीय विवाहाखेरीज जातीयता नष्ट होणार नाही. असेही बरेच नाटकांचे सूत्र आहे. सवर्ण स्त्रिया आणि दलित पुरुष ह्यांच्या संकरातून अंतरजातीय विवाहाखेरीज नवसमाज निर्मिती होणार नाही.

तृतीयरत्न:

म. फुले ह्यांचे 'तृतीय रत्न' हे नाटक इ.सन. १८५५ साली लिहिले. ह्या नाटकामध्ये म. फुलेंनी ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थासाठी देवाचे नाव पुढे करून शूद्रातिशूद्रांना फसविण्याचे जे कर्मकांड सुरू केले, अंधश्रद्धा जोपासल्या त्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. अज्ञानी व देवभोळ्या शूद्रांची भिक्षूकशाहीने केलेली पिळवणूक व त्यातून शूद्रातिशूद्र लुबाडले जाणे ह्याचे दर्शन म. फुलेंनी घडविले आहे.

एक ब्राह्मण भिक्षुक फिरत असताना एका शेतकऱ्याच्या गरोदर पत्नीला ज़ोगाईला पाहतो. तिचे भविष्य कथन करताना सांगतो, तुझ्या भावी मुलाचा जन्म तुझ्या नवऱ्याला घातक ठरणार आहे, हे ऐकून जोगाई घाबरते. ब्राह्मणाने संकट दूर करण्यासाठी करावयास सांगितलेले क्रियाक्रर्म करण्याचे ठरविते. जोशीबुवा बाळावरील येणारे अरिष्ट दूर करण्यासाठी त्या शेतकरी स्त्रीला कर्ज काढायला लावतो. आपल्या बाळासाठी जोगाई कर्ज काढते. धार्मिक विधी केल्यावर आणि ब्राह्मणाला जेवायला घातल्यावर आलेले अरिष्ट दूर होईल अशी जोगाईची भोळी, भ्रामक समजूत असते. जोगाईचा नवराही ह्या गोष्टीला संमती देतो.

जोशीबुवांनी सांगितलेला धार्मिक विधी जोगाई आणि तिचा नवरा करतो. त्यासाठी जोगाईचा नवरा कर्ज काढतो. तेवीस ब्राह्मण जेवायला घालतो. एवढे सर्व करूनही निश्चित फलप्राप्ती झाली नाही तर आपल्या नशिबाला दोष देतो. धार्मिक विधीच्या वेळी सर्व कष्ट उपसतो. ह्या धार्मिक विधीच्या वेळी शेतकरी कुटुंबाला उपाशी रहावे लागते. प्रसाद म्हणून राहिलेले अन्न मिळते.

एका पाद्रीच्या शिकवणुकीतून ह्या शेतकरी कुटुंबाला थोडेफार ज्ञान प्राप्त होते. ते रात्रीच्या शाळेत जातात. विद्या प्राप्तीमुळे त्यांना जोशीबुवांची लबाडी कळून चुकते. आपल्याला लिहिता-वाचता आले असते तर अशी फसगत झाली नसती. शिक्षण हा तिसरा डोळा आहे, हे त्यांना कळून चुकते.

भिक्षुकशाही, अंधश्रद्धा, मूर्तिपूजा, ह्या सर्वांना मूठमाती देण्यासाठी शिक्षण ही काळाची गरज आहे. हे म. फुलेंनी हेरले होते. स्त्री शहाणी झाली तर घर शहाणे होते. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणासाठी शाळा काढल्या. राबणाऱ्या, श्रमणाऱ्या बहुसंख्य जनतेला अंधश्रद्धेच्या जोरावर लुबाडणाऱ्या भिक्षुक, वर्गाविरुद्ध महात्मा फुलेंनी जन्मभर लढा दिला. जोगाईच्या व्यक्तिरेखेतून म. फुलेंनी अज्ञान, अंधश्रद्धा ह्यात असलेली स्त्री अधोरेखित

केली आहे. स्त्री जर शिकली तर कुटुंब सुशिक्षित होते. रूढी, परंपरा, अंधश्रद्धेला बळी पडणार नाही. ह्याचा ठाम विश्वास फुलेंना होता. म्हणून त्यांनी तृतीय रत्न ह्या नाटकातून स्त्री शिक्षण कसे महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट केले आहे. शिक्षण नसल्याने जागाई जोशीबुवाच्या कटकारस्थानांना बळी पडते. त्यातून तिच्या कुटुंबावर आर्थिक संकट कोसळते. तिच्या अडाणीपणामुळे अंधश्रद्धेमुळे तिला नाडले जाते. तत्कालीन ब्राह्मण लोकांनी दलित समाज अडाणी राहणे, कसे हितावह आहे, हे हेरले होते. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना दारिद्र्यात लोटले होते. शिक्षण घेतल्याशिवाय अज्ञान नष्ट होणार नाही, हेच म. फुलेंनी जोगाईच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट केले आहे.

## प्रेमप्रताप :

मोरेश्वर तांबे ह्यांचे प्रेमप्रताप हे नाटक १९४७ साली रंगभूमीवर आले.[३] अस्पृश्यता निवारण्यासाठी रोटीबेटी व्यवहारास प्रोत्साहन देणारे हे नाटक आहे. सवर्ण-दलित समाजातील मुलामुलींचे प्रेमविवाह झाले तर त्यांच्यातील भेदभाव कमी होऊन अस्पृश्यता निवारण होण्यास मदत होईल. ह्या हेतूने हे नाटक लिहिले गेले आहे. पूर्वी या नाटकाला 'प्रेमप्रताप उर्फ महाराची सून' असे नाव होते. परंतु आता महाराची सून हे जातीवाचक शब्द वगळले आहेत. मोरेश्वर तांबे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतील एक तळमळीचे व जानते कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो मुक्तिसंग्राम उभारला त्याचे अंतिम उद्दिष्ट समाजातील उच्चनीच भेद नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करणे हे होते. ह्या उद्दिष्टाला स्पृश्य अस्पृश्यांमधील रोटीबेटी व्यवहाराला अनन्यसाधारण महत्त्व होते. ह्या पार्श्वभूमीवर मोरेश्वर तांबे यांचे प्रेमप्रताप हे नाटक अत्यंत महत्त्वाचे आहे.[४]

प्रेमप्रताप ह्या नाटकाची नायिका श्रीमंत ब्राह्मणाची तरुण मुलगी प्रेमा ही आहे. तिचे दलित कुटुंबातील प्रताप ह्या युवकावर प्रेम असते. प्रतापशी विवाह करून समाजातील दुष्ट रूढीला पायाखाली तुडविण्याचा प्रेमाचा निश्चय आहे. त्यांच्या आड कुणीही आले तरी त्याची पर्वा ती मुळीच करत नाही. प्रेमाचे आईवडील या विवाहाला विरोध करतात परंतु ती त्यांची समजूत घालते. प्रेमाचे वडील ज्या कार्यालयात अधिकारी असतात, त्याच कार्यालयात प्रतापचे वडील सदाशिव शिपाई म्हणून काम करतात. त्यांनाही हा विवाह अडचणीचा वाटतो. प्रताप आपल्या वडिलांची समजूत काढतो. समाजसुधारणा आणि अस्पृश्यता निवारणासाठीच तरुणांनी पुढे आले पाहिजे, असे त्याला वाटते. वडील त्याला प्रतिकूल परिस्थितीची व निर्माण होणाऱ्या विरोधाची जाणीव करून देतात. परंतु प्रताप लोकनिंदा, विरोध याबाबी नाकारतो.

प्रेमावर एकतर्फी प्रेम करणारा वसंत हा एक ब्राह्मण तरुण आहे. गुणाने आणि व्यक्तिमत्त्वाने वसंतपेक्षा प्रेमाला प्रतापच आवडतो. प्रतापविषयी तिच्या मनात सहानुभूती आहे. ती केवळ प्रतापवर प्रेमच करत नाही तर त्याच्याबरोबर राहून दीनदलितांची सेवाही करण्याचा तिचा निराधार आहे. प्रेमाचे वडील कृष्णराव प्रतापची अवहेलना करतात. हे प्रतापला आवडत नाही. तो प्रेमाला सोडून जाण्याचा विचार करतो. प्रेमावर एकतर्फी प्रेम करणारा वसंतही प्रतापचा अपघात झाला असेच खोटे प्रेमाला सांगून तिची फसवणूक करतो. पण तरीही ती प्रतापपासून दूर जात नाही अथवा वसंतच्या प्रेमाच्या जाळ्यात अडकत नाही. शेवटपर्यंत ती आईवडिलांच्या विरोधाला झुगारून प्रतापबरोबर राहते आणि त्याच्याबरोबर विवाह करते. प्रेमप्रताप ह्या नाटकातून स्पृश्य अस्पृश्य भेदभाव आंतरजातीय विवाहातून नष्ट होऊन समाज एकसंध बनेल, सामाजिक समता नांदेल, हेच प्रेमाच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

### वाट चुकली :

नामदेव व्हटकर ह्यांचे 'वाट चुकली' हे नाटक १९५४ साली प्रकाशित झाले.[५] दलित समाज जीवनावरील हे नाटक मातंग जातीच्या माणसाच्या वेदनेचे चित्र स्पष्ट करते. माणसाचे मोठेपण व श्रेष्ठत्व हे त्यांच्या जातीवर आधारित नसून त्याने प्राप्त केलेल्या ज्ञानावर व त्याच्या मानवतावादी धोरणावर अवलंबून असते. आंतरजातीय विवाहातून, सामाजिक अभिसरणातून जातीयता व अस्पृश्यता नष्ट होईल असा विश्वास नामदेव व्हटकर स्पष्ट करतात. जातीयता, अस्पृश्यता मिटवण्यासाठी आंतरजातीय विवाह करणे योग्य आहे. सामाजिक बदलांसाठी, सामाजिक अभिसरण होणे गरजेचे आहे, असा प्रस्तुत नाटकाचा विषय आहे. वाट चुकली या नाटकात जानकीबाई ही स्त्री व्यक्तिरेखा सवर्ण स्त्रीचे प्रतिनिधीत्व करते. ती नारायणशी प्रेमविवाह करण्याच्या विचारात असते. नारायण दलित आणि जानकी ब्राह्मण आहे. जानकीने स्वधर्म सोडून दलित समाजात प्रवेश करून महत्त्वाचे कार्य केलेल आहे. त्याचबरोबर जातीयता नष्ट करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आंतरजातीय विवाहातूनच भारतातील जातीयता नष्ट होईल असे व्हटकरांना वाटते.

### सूर्यास्त :

हेमंत खोब्रागडे ह्यांचे 'सूर्यास्त' हे नाटक १९८१ साली प्रकाशित झाले.[६] प्रस्तुत नाटकात सामंतशाहीचा सूर्यास्त करण्यासाठी दलितांची अस्मिता जागी करून त्यांच्या वेदना, विद्रोह आणि नकाराला उजागर करण्याचा प्रयत्न नाटककार करतात. पारतंत्र्यात आणि स्वातंत्र्यातही सामंतशाहीच्या अत्याचाराला दलित बळी पडलेला आहे. दासप्रथा संपुष्टात यावी ह्या दृष्टीने हे नाटक दास्यत्वाच्या प्रश्नावर प्रकाश टाकते. संतू नावाच्या दलिताची नववधू रूपा हिला लग्न झाल्याबरोबर राजाच्या हवाली केले जाते. रूपाही रूपवान आहे. राजा हा ईश्वराचा अवतार, धर्मरक्षक,

प्रजेचा पालनपोषण कर्ता असे मानले गेले आहे. तर दुसऱ्या बाजूला तो दलितांचा कर्दनकाळ ठरलेला आहे. दलित स्त्रीचे लग्न झाल्यानंतर पहिली रात्र तिला राजाला दान केले जाते. परंतु संतू आपली पत्नी राजाकडेपाठवण्यास स्पष्ट नकार देतो. राजाच्या राणीसही ही गोष्ट पसंत नसते. राजाच्या मुक्त जीवनावर ती टीका करते. रूपा देखील राजाच्या या अन्यायी जुलमी वृत्तीबद्दल सडेतोड शब्दात धिक्कार करते. राजाच्या ह्या पापी कृत्याबद्दल त्याला जाब विचारते. राजा आणि रूपा ह्यांच्यात संघर्षाची तीव्र ठिणगी उडते. राजा तिचा विनयभंग करतो. हे संतूला आवडत नाही. तो राजाशी दोन हात करण्याचा यशस्वी प्रयत्न करतो. त्याला बंदिस्त केले जात असताना त्या झटापटीत संतू स्वतःच्या ताकदीने रूपाला घेऊन जातो. राजाच्या पत्नीला राजाचे वर्तन आवडत नाही. ती म्हणते, धर्मकल्पना आणि परंपरा मानवाच्या कल्याणासाठी आहे. राज्याच्या स्वार्थासाठी नाही. कालबाह्य रूढी, परंपरा यांचा डांगोरा राजाने पिटू नये व धर्माच्या नावाने माणसाला गुलामासारखे वागवू नये. दासाच्या सावलीचा स्पर्श राजे लोकांना मानवत नाही. परंतु त्यांच्या बायकांचा स्पर्श कसा मानवतो,असा ती रोखठोक सवाल करते. रूपाला आणि संतूला राजा छळतो पण ते दोघेही परिस्थितीला शरण जात नाही. रूपाची अवस्था अतिशय वाईट होते. तिला जगावेसे वाटत नव्हते पण ती नशिबाला दोष देऊ शकत नव्हती. देवाधर्मावर, परमेश्वरावर तिचा विश्वास नसतो. "आता...विद्रोह पेटला पाहिजे... मनामनात... घराघरात... प्राणाच्या मोलाशिवाय आपण मरणार नाही! प्राणाच्या मोलाशिवाय स्वातंत्र्य नाही. न्याय नाही. प्रलय नाही. प्रलयाशिवाय आपण तरणार नाही!" असे तिचे विचार असतात.[७] रूपाविषयी राणीला अपार आदर आहे. रूपासारखाच राणीवरही प्रसंग गुदरलेला असतो. राणी दासांना मदत करते म्हणून राज्याबाहेर बहिष्कृत केले जाते. नाटकात पुरुषप्रधान व्यवस्थेची स्त्री कशी बळी ठरते हे रूपाच्या आणि राणीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते. माणूस बाह्यवेषात बदलला पण त्याची अंतर्गत विचारसरणी मात्र बदलली नाही. हेच आपल्याला सूर्यास्त या

नाटकात दिसून येते. दलित जातीत जन्मलेल्या रूपाला परंपराग्रस्त समाज कसा छळतो. तिच्या मदतीला राणी आल्यानंतर तिलाही राजा बहिष्कृत करतो. एकूणच स्त्री दलित असो अथवा सवर्ण असो ती पुरुषप्रधान व्यवस्थेची बळी ठरते. हे वरील दोन्ही व्यक्तिरेखेतून दिसून येते.

## देवनवरी :

प्रेमानंद गज्वी ह्यांचे 'देवनवरी' हे नाटक १९८१ साली प्रकाशित झाले. 'दलित स्त्रियांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी अंधश्रद्धेपोटी दलितांनी जोपासलेली आणि प्रस्थापितांची सवर्ण माणसाच्या वासनापूर्तीसाठी सातत्याने टिकून राहिलेली दुष्ट प्रथा म्हणजे देवदासी प्रथा, पुत्रप्राप्ती, सुखप्राप्ती, धनप्राप्ती वा पुण्यप्राप्ती अथवा दैवाचा खेळ म्हणून अस्पृश्याच्या पोरी स्वखुशीने तर कधी बळजबरीने देवदासी म्हणून सोडण्यात येतात. पुढे त्या वेश्याचा धंदा करतात. ही वेश्याप्रवृत्तीची देवदासी प्रथा बंद व्हावी, अंधश्रद्धा नष्ट व्हावी. प्रसंगी देवीची मूर्ती तोडून फोडून टाकावी असा सल्ला नाटककार नाटकातून देतात. पुजारी, सत्ताधीश, गावपाटील यांच्या षड्यंत्राचे आणि दलित स्त्री जीवनाच्या वेदनेचे आणि दलितांच्या होणाऱ्या धार्मिक व सांस्कृतिक शोषणाचे हे चित्रण आहे.'[१]

प्रस्तुत नाटकात द्रौपदी ह्या देवदासीला देवाला सोडलेले असते. देवाशीच तिचे लग्न झालेले असते. तिला स्वतःचे व्यक्तिमत्त्व नसते. प्रस्थापित समाजव्यवस्थेने स्वतःच्या स्वार्थासाठी देवाधर्माच्या नावाखाली देवदासी प्रथा सुरू करून भारतीय स्त्रीवर अन्याय केला आहे, हेच यातून दिसून येते. द्रौपदीला देवाला सोडलेले असते. त्याठिकाणचा पुजारी द्रौपदीला विकण्याचा प्रयत्न करतो. पण द्रौपदी त्याचे प्रयत्न हाणून पाडते. द्रौपदीचे पंढरी नावाच्या एका व्यक्तीवर प्रेम असते. ते दोघे एकमेकांना पसंत करून लग्नबंधन स्वीकारण्याचा निर्णय घेतात. तर पूजारी द्रौपदीला अनवर नावाच्या व्यक्तीस विकण्याचा घाट बांधतो. तो सफल होत नाही. म्हणून

अनवर द्रौपदीचा हात धरतो, पंढरी त्याला विरोध करतो. त्यावेळेस झालेल्या झटापटीत अनवरचा चाकू द्रौपदीस लागून ती मरण पावते. तिच्यावर झालेला हा अन्याय पंढरीला सहन होत नाही. तो यल्लामा देवीच्या मूर्तीलाच मोडून तोडून टाकतो.

'देवनवरी'ह्या नाटकातून माणूसकीला काळीमा फासणारी दुष्टप्रथा बंद झाली पाहिजे असे नाटकाराला वाटते. समाजामध्ये रूढी, परंपरा नष्ट होऊन समाजप्रबोधन होणे आवश्यक आहे. तरच दलित स्त्रीला मुक्त श्वास घेता येईल.

**बामनवाडा :**

रामनाथ चव्हाण ह्यांचे "बामनवाडा" हे नाटक १९८१ साली प्रकाशित झाले.[१०] प्रस्तुत नाटकातून समतेच्या विचाराची पेरणी केली असून माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे हे विचारसूत्र मांडले आहे. शशीच्या व्यक्तिरेखेतून राष्ट्रीय एकात्मतेसाठी फुले-आंबेडकरांच्या स्वप्नातील एकंदर समाजाचे चित्र स्पष्ट होण्यासाठी सामाजिक अभिसरणासाठी आंतरजातीय विवाहाची आश्यकता रामनाथ चव्हाण प्रतिपादन करतात. जातिव्यवस्थेची बंधन तोडणारी शशी ह्या नाटकातील एक महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे.

शशी ही तात्यासाहेब गोडबोले ह्यांची कन्या आहे. तात्यासाहेब गोडबोले हे दलित चळवळीत अनेक वर्षापासून सक्रीय आहे. वडील पुरोगामी विचाराचे असल्या कारणाने शशीवरही पुरोगामी विचारांचा प्रभाव दिसून येतो. शशी भालचंद्र साठे ह्या दलित तरुणावर प्रेम करते आणि त्याच्या बरोबर विवाहही करते. शशीने आंतरजातीय दलित सवर्ण विवाह केल्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होते. समर्थन होते. फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत ती सक्रीय होते. चळवळीला ह्या निमित्ताने ती बळ देते. आणि बामनवाड्याची चौकट मोडते. शशी जातीपातीच्या पलीकडे जाऊन जाती

निर्मूलन करण्याचा प्रयत्न करते. समतेच्या लढाईसाठी लढण्याचे बळ शशीमध्ये आहे. शशी आपल्या सुशिक्षित दलित पतीसह बामनवाड्यात राहते पण एका नाजूक प्रसंगी तात्यासाहेब गोडबोले शशीला व तिच्या पतीला घराबाहेर काढतात. त्यामुळे खुद्द शशीच तात्यांना खडसावते. जाबही विचारते. चळवळीसाठी अहोरात्र सहभागी होणाऱ्या तात्यासाहेबांविषयी तिच्या मनात शंका निर्माण होतात. शशीचा पती दलित तरुण भालचंद्र साठे हाही ऑफिसर आहे. स्वत:च्या मेरीटवर नोकरी मिळवलेली आहे. शशीची सासू म्हणजे साठे साहेबांची आई वाड्यावर राहायला येते. तेव्हा अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यास तोंड देताना शशी आणि भालचंद्र साठे ह्या दोघांनाही जड जाते. आईचे दलित बामनवाड्यात बरेचसे खूपते शशीच्या आईकडूनच हेटाळणी-विटंबना-नाराजी ह्यांना शशी व साठे तोंड देतात. त्यांची बरीचशी शक्तीही खर्च होते. एवढेच नव्हे तर आपली आई सौ. माईकडून ह्या बामनवाड्याचा महारवाडा करायचा नाही. ह्या शब्दात शशीला सुनावते शिवाय तात्यांच्याकडून ह्या दाम्पत्याला बामनवाडा सोडून महारवाड्यात खोली बघायला सांगितली जाते.

भालचंद्रच्या आईचे दु:खद निधन बामनवाड्यातच होते. तेव्हा काय करावे, हे भालचंद्र साठेला सूचत नाही. तेव्हा शशी आपल्या नवऱ्याला धीर देताना म्हणते, कुणाची वाट पाहता तुम्ही? त्यांच्यापैकी कुणीही येणार नाहीत. हे प्रेत तुम्हाला आणि मलाच उचलावे लागेल? जाती जमातीच्या कोंडवाड्यात स्वत:ला कोंडून घेतलेली, माणसांच्या रूपातली जनावरे आहेत सारी... त्यांच्याकडून कसली अपेक्षा करता? कदाचित तुमच्याच काय पण माझ्या प्रेताला सुद्धा खांदा द्यायला वाड्यातील माणसे येतीलच असे नाही. ती तुम्हाला, मला निर्माण करायचीत. ह्या संवादातून नवसमाज निर्मितीची आवश्यकता आहे हे सूचित होते. शशीला जाती जमातीचे कोंडवाडे तोडून फोडून उद्ध्वस्त करायचेत. जाती जमातीच्या ह्या वाड्यात मी ही एक दलित आहे. माझी तुम्हाला विनंती आहे. कृपया माझ्याकडे ब्राह्मणकन्या म्हणून पाहू नका. एक माणूस नावाची स्त्री तुमची पत्नी म्हणून

पहा... किमान आपण दोघं तरी एकमेकांना माणूस म्हणून स्वीकारू आणि आपणच आपला नवा समाज निर्माण करू जिथे जाती पोटजातींची भिंती नसलेले वाडे असतील आणि त्यात राहतील फक्त माणूस नावाच्या स्त्रिया आणि पुरुष नावाची माणसं. उपरोक्त विधानातून नवसमाज निर्मितीतून फक्त माणसाचीच निर्मिती व्हावी. तिथे जातीच्या भींति नसतील असेच विचार शशी अधोरेखित करते. शशी आपल्या पतीलाही समजवणीच्या सुरात सांगते की तुम्ही स्वत:ला दलित म्हणून घेऊ नका. तुम्ही एक पदवीधर वरिष्ठ अधिकारी आहात. आर्थिक बाबतीतही संपन्न आहात. तुमच्या राहणीत, बोलण्यात ब्राह्मणालाही लाजवील इतका सुसंस्कृतपणा आहे. शशी भालचंद्र साठेबरोबर लग्न करताना देखील दलित सवर्ण हा विचार करीत नाही. केवळ चांगला जोडीदार म्हणून त्याच्याशी लग्न करते. परंतु जातीपातीच्या कोंडवाड्यात शशीची घुसमट होते. जातीयता नष्ट होण्यासाठी केवळ दलितांची मानसिकता बदलून चालणार नाही तर मध्यम वर्गीयांची देखील मानसिकता बदलणे जरूरीचे आहे. गेल्या हजारो वर्षातील मध्यमवर्गीय स्त्रीची कुचंबणा, व्यथा, वेदना शशीच्या व्यक्तिरेखेतून रामनाथ चव्हाण मुखकर करतात.

### वांझ माती:

प्रेमानंद गज्वी ह्यांचे वांझ माती हे नाटक १९८४ साली प्रकाशित झाले.[११] वांझमाती ह्या नाटकात वंदिता ही तरुण मुलगी आपला शाळकरी मित्र नागनाथ बरोबर समाजकार्य करते. नागनाथने पुढे शिकायला हवे होते असे तिला वाटते. वंदिता जातिभेद, अस्पृश्यता काहीही मानत नाही. तिने शाळा, कॉलेजात असतानाच समाजसेवेचे, अस्पृश्यता निवारण्याचे प्रत्यक्ष काम केलेले आहे. दीनदलितांचे दु:ख प्रत्यक्ष पाहिले आहे. तिचे वडीलही अस्पृश्यता निवारणाचे कार्य करतात. परंतु तिला आपल्या वडीलांचे कार्य तकलादू व ढोंगी स्वरूपाचे वाटते. वंदिताचे प्रज्ञानंदाच्या सामाजिक कार्याबद्दल म्हणजे अस्पृश्यता निवारण कार्याविषयी प्रशंसा केली आहे.

आपण फार मोठे काम करत आहाता![१२] असे तिने प्रज्ञानंद यांना म्हटले आहे. वंदिताने प्रज्ञानंदा बरोबर सामाजिक कार्यास सुरुवात केली आहे. अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना हरीजन बांधवांना आपल्या घरी प्रवेश देण्यासही सुरुवात केली आहे. वंदिताचे हे समाजसेवेचे काम तिच्या वडिलांना सहन होत नाही.त्यात ती दलित नागनाथबरोबर काम करते. वंदिता बुवाबाजी विरोधातही आघाडी उभारते. वडिलांनी नागनाथला टाकून बोललेले तिला आवडत नाही, कारण नागनाथविषयी प्रेम, जिव्हाळा आपुलकी तिला वाटते. नागनाथ बरोबर समाजसेवा, श्रमशिबिरासाठी खेडोपाडी दौरे करते. वंदिता आपल्या वडिलांसह सर्वच सवर्ण मंडळीवर कडक शब्दात ताशेरे ओढते. ती म्हणते,"दुष्ट माणसालाही लाज वाटेल अशी कृत्ये केलीत. गरीब लोकांचे अन्न तोडलेत. साध्या साध्या गोष्टीपासून वंचित केलं. बुवाबाजी विरुद्ध लढणाऱ्या नागनाथबरोबर भेकड हल्ला केलात. ज्या माणसांच्या जीवावर स्वत:च्या मोठेपणाची टिमकी वाजवित बसलेला मोठेपणा मिळवलात, ज्या प्रज्ञानंदांना अपमानित करून घालून दिलत. काय करायच शिल्लक ठेवलंत?"[१३] तिच्या बोलण्यातून तिला आलेली चीड व्यक्त होते. समाजातील ढोंगी सवर्ण मंडळींच्या वर्तणुकीवरही ती प्रहार करते.

वंदिता स्वत:चे निर्णय स्वत: घेते. नागनाथबरोबर समाजकार्य करताना ती वडिलांचा विचार घेत नाही. लग्नाच्या बाबतीतही ती वडिलांचा विचार न घेता ती आपल्या विचाराशी ठाम राहते. वडिलांनी मारहाण केली असताही ती निर्णय बदलत नाही. ह्यातूनच तिची दलित समाजाबद्दल असलेली आस्था, एकनिष्टता दिसून येते. सवर्ण कुटुंबात जन्माला येऊनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार शिरोधार्य मानून रूढी, परंपरा, अंधश्रद्धा ह्यावर ती प्रहार करते. डॉ. बाबासाहेबांचे शिक्षणाचे विचार आणि समतेचे विचार समाजात रूजवण्यासाठी ती प्रयत्न करते.

**मन्वंतर :**

टेक्सास गायकवाड ह्यांचे मन्वंतर हे नाटक १९८५ साली प्रकाशित झाले.[१४] वास्तविक मन्वंतर हे नाटक म्हणजे नाटककाराचे आत्मचरित्रच आहे. आंतरजातीय विवाहातून सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया तीव्र गतीने वाढीस लागू शकते. जाती जातीतील कटूता नष्ट होऊन अस्पृश्यतेचे मूळ नाहीसे करता येईल, असा संदेश प्रस्तुत नाटकातून दिलेला आहे. तारा ही ब्राह्मण स्त्री गिरीश ह्या दलित तरुणाशी आंतरजातीय विवाह करण्यासाठी विद्रोहाची भूमिका घेताना दिसते. गिरीशवरील प्रेमाखातर ती बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीत जाते. गिरीशच्या आग्रहास्तव मांसाहारही करते. आई वडील, मामा या लग्नाला विरोध करतात. परंतु तारा आंतरजातीय विवाहाविषयी ठाम असते. ताराचे हिंदू धर्मीय रूढी, परंपरा, रीतिरिवाज, अंधश्रद्धा न मानता गिरीशबरोबर राहावे, असे त्याला वाटते. तारा आणि गिरीष ह्यांचा बौद्ध पद्धतीने विवाह होतो. जात धर्म विसरून सर्वजण एकत्र येतात. ताराची आई व गिरीशची सासू ह्यांच्या अंगात येते. अंगात आलेल्या देवीच्या पाया पडले पाहिजे असे बाळमामांना वाटते, पण गिरीष ह्या अंधश्रद्धेला विरोध करतो. यातून वादावादी निर्माण होते. पण तारा मध्यस्थी करते. ताराही गिरीशच्या आईवडिलांचा मान राखण्यासाठी त्यांच्या पाया पडते. त्याचप्रमाणे ताराची आई आणि गिरीशची सासू म्हणून त्याने आईच्या पाया पडावे यास तो होकार देतो पण बाबासाहेबांचा पुतळा फोडला म्हणून वातावरण तंग होते. आया बहिणींची अब्रू लुटली जाते. तेव्हा गिरीश अस्वस्थ होतो. गिरीश आणि त्याचा मित्र फिडेल दोघे मिळून तिकडे जाण्याचे ठरवितात. ह्यावेळेस तो ताराचाही विचार घेतो. तारा ह्या गोष्टीस अनुकूल असते. तारा आणि गिरीशला झालेल्या मुलीचे नाव तेजस्विनी ठेवतात. ही मुलगी देखील हिंदू पद्धतीने नमस्कार न करता जयभीम म्हणते. तारा गिरीश ह्यांचा हा आंतरजातीय दलित सवर्ण प्रेमविवाह आहे. त्यांचा हा विवाह ताराच्या काही नातेवाईकांना आवडत नाही. तारा आणि गिरीश ह्यांच्यात कौटुंबिक संघर्षही निर्माण होतात. परंतु ताराच्या म्हणण्याप्रमाणे

गिरीश वर्तन करताना दिसतो. तारा आणि गिरीश दोघेही बुद्धांच्या शिकवणीनुसार वर्तन करतात. एक खंबीर बाणेदार आणि बदल स्वीकारू पाहणारी तारा या नाटकात भेटते.

### इथे माणसाला स्थान नाही:

बाजीराव रामटेके ह्यांचे 'इथे माणसाला स्थान नाही' हे नाटक १९८७ साली प्रकाशित झाले.[१५] हिंदू धर्मात राहून इथला शंभू पांडुरंग भक्त जेव्हा महार म्हणून महारवाड्यात राहून जगतो तेव्हा धर्मांध आणि जातियवादी शक्ती त्याचे व त्याच्या कुटुंबाचे अस्पृश्यतेच्या नावाखाली जगणेच मुश्किल करतात. अन्याय अत्याचाराचे चटके भोगल्यावर तो धर्मांतराचा निर्णय घेतो. महार, वेठबिगारीचे, मेलेली गुरंढोरं ओढण्याचे नाकारतात आणि अत्याचाराची तीव्रता वाढते. तरीही माणसाला माणूस म्हणून जगायचं असेल तर बुद्ध धर्मच स्वीकारला पाहिजे. कारण हिंदू धर्म संस्कृतीत माणसाला माणूस म्हणून स्थान नाही हे ह्या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र आहे.

ह्या नाटकातील शंभू पवार हा पांडुरंग भक्त ब्राह्मण असून त्याच्या भावाने बलात्कार केलेल्या अस्पृश्य मुलीबरोबर लग्न करतो. गाव बदलतो. महार म्हणून जगतो. बलात्कारीत तरुणी मुकुंदाची प्रेयशी असते. शंभूला सखू व विनायक ही दोन अपत्य असतात. सखू ह्या नाटकातील महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. सखूचे पाटलाच्या विठ्ठलवर प्रेम असते.पण पाटील लग्नापूर्वी मुलीला आमच्याकडे ठेवा म्हणतात. पण ही गोष्ट शंभूला मान्य होत नाही. म्हणून सवर्ण मंडळी सखूची बेअब्रू करतात. सखू आणि विठ्ठलचे एकमेकांवर प्रेम असते. शंभूबुवाची विवाहाला तयारी असते. परंतु पाटलांकडून नकार असतो. विठ्ठलचे आपल्या वडिलांसमोर काही चालत नाही. पाटील आपल्या मुलाचे लग्न दुसरीकडे ठरवितात. सखूची फसगत होते. यादव हा तरुण सखूवर एकतर्फी प्रेम करत असतो. पण सखू

त्याच्याबरोबर लग्न करण्यास तयार नसते. सखूचा भाऊ विनायक ह्याने विहीर बाटवली म्हणून सवर्ण लोक त्याला मारहाण करतात. ह्या गोष्टीचा सखूलाही मनस्ताप होतो. सखू आणि विठ्ठल प्रकरणामुळे सवर्ण पाटील आणि दलित शंभू ह्यांच्यात दुरावा निर्माण होतो. आंबेडकरी चळवळीच्या प्रभावाने दलित मंडळी गावकीची कामे सोडून देतात. त्यामुळे दलितांना बहिष्काराला तोंड द्यावे लागते. त्यामुळे उपासमार सहन करावी लागते. तरीही बाबासाहेबांच्या मार्गाने जाण्याचा त्यांचा पक्का विचार असतो. सखूही हिंदू धर्माविरुद्ध विद्रोह व नकाराची भाषा बोलते. दलितांच्या विहिरीचे पाणी खराब केले जाते. दलित स्त्रियांची विटंबना केली जाते. एवढेच नव्हे तर गावचा पाटील व त्याचा मुलगा विठ्ठल सखूचा विनयभंग करतात. त्यामुळे सखूच्या वडिलांच्या हिंदू धर्मावरील व देवदेवतांवरील विश्वास नाहीसा होतो आणि ज्या धर्मात समतेची वागणूक आहे, अशा बुद्ध धर्माच्या आश्रयाला सखूचे वडील येतात.

प्रस्तुत नाटकात सवर्ण मंडळींकडून दलित स्त्रीवर कसे अन्याय, अत्याचार घडतात. हेच स्पष्ट केलेले आहे.

**वाटापळवाटा :**

दत्ता भगत ह्यांचे 'वाटा पळवाटा' हे नाटक १९८७ साली प्रसिद्ध झाले.[१६] प्रस्तुत नाटकात आंबेडकरी विचारांच्या तीन पिढ्यांमधील वैचारिक द्वंद्वाचे चित्रण केले आहे. प्रत्येक माणूस जीवन जगताना तडजोड करतो. अडथळे आलेच तर वाटा पळवाटा शोधतो. हे मानवी मनाचे रहस्य ह्या नाटकात उलगडत जाते. त्याचबरोबर आंतरजातीय विवाहातून निर्माण झालेले सामाजिक प्रश्नांचे चित्रणही येते.

'वाटा पळवाटा'ह्या नाटकात शेवंता, सोनल आणि हेमा ह्या स्त्रियांचे जीवनचित्रण येते. शेवंता ही दलित विधवा स्त्री आहे. ती शिकलेली आहे. ती काबाडकष्ट करणारी आहे. स्वत:च्या पायावर उभी राहते. परंतु

प्रस्थापित व्यवस्थेला ते मान्य नसते. शेवंताने घरपट्टी भरली नाही म्हणून तिला घरातून हकलून दिले जाते. एवढेच नव्हे तर तिचा खूनही होतो. प्रस्थापित व्यवस्थेची ती बळी ठरते.

सोनल ही दासराव जोशीची मुलगी असून कॉलेजमध्ये एस.वाय.बी.ए.ला आहे. दासराव तिला एन.एस.एस.च्या कॅम्पला पाठवीत नाही म्हणून ती नाराज होते. सोनलचे अर्जुनवर प्रेम असते. घरच्यांना सांगण्याची तिची हिम्मत होत नाही. ती खोटे प्रेमपत्र लिहून तिचे प्रेम वडिलांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करते. वडिलांना ते मान्य होत नाही म्हणून वडील अर्जुनचा अपमान करतात. सोनल मार्गदर्शनासाठी हेमाकडे जाते. हेमा तिला वेळीच आवर घालते. परंतु हेमाच्या घरी अर्जुन तिचा पाणउतारा करतो. अरविंद देशमुखशी तिचे लग्न ठरते. ती परिस्थितीशी संघर्ष करीत नाही. परिस्थितीशी जमवून घेते.

हेमा ही ह्या नाटकातील एक महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा आहे. तिने सतीश गांडघाटे ह्या प्राध्यापक तरुणाशी विवाह केलेला आहे. विक्रांद चळवळीच्या निमित्ताने तिची सतीशशी ओळख होते. ओळखीचे रूपांतर प्रेमात होते आणि पुढे प्रेमाचे रूपांतर विवाहात होते. तिचे वडील विष्णुपंत रानडे न्यायधीश असून सुधारकी विचाराचे आहेत. तिच्या आईचा आंतरजातीय विवाहाला विरोध असतो. परंतु कालांतराने हा विरोध मावळतो. जाणीवपूर्वक आंतरजातीय लग्न करणारी हेमा स्वत:मध्ये बदल करते. काकांनी हाक मारल्यावर जी म्हणाव. ह्या काकांच्या सांगण्याप्रमाणे ती जी म्हणू लागते. नेहमी तिच्या जातीचा उल्लेख करणाऱ्या काकांना ती खडसावते. ती म्हणजे जात मोडून लग्न केलयं आम्ही कुणाकुणाचा विरोध नाही पत्करला? आई वडिलांचा, नातलगांचा, सगळ्या सगळ्यांच्या अगदी तुमचा देखील. तिची सतत घुसमट होत असते. हेमा सर्वांची काळजी घेणारी आहे. अर्जुनवर प्रेम करणारी सोनल जेव्हा तिच्या आंतरजातीय विवाहाविषयी चौकशी करते तेव्हा अर्जुन वाईट नाही ते तुझ वय स्वप्नांच हे

वय ओसरल की शिल्लक राहतात ते ओसाड वाळवंट स्वत:चे निर्णय स्वत:च पण जबाबदारीने घ्यावे लागतात. हे ती सोनलला समजावून सांगते. सतीश जेव्हा जेव्हा उदास होतो. तेव्हा तेव्हा हेमा त्याला भावनिक आधार देऊन त्याच्यात उभारी आणते. सर्वांना धीर देणारी वेळप्रसंगी समजावून सांगणारी, काकांच्या मृत्यूनंतर बौद्ध मूर्तीची मनोभावे पूजा करणारी अशी एक धाडसी स्त्री म्हणून वाटा पळवाटामध्ये ती पुढे येते. एकूणच ह्या तीनही व्यक्तिरेखांवर एक नजर टाकली असता असे निदर्शनास येते की, प्रस्तापित समाजव्यवस्थेत त्यांचा कोंडमाराच होतो. जातीयता नष्ट करण्यासाठी हेमा प्रयत्न करते. ब्राह्मण स्त्रियांनी दलित तरुणांशी विवाह करून जातसंस्था उद्ध्वस्त करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचचले आहे, हे हेमाच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

**अकिंचन :**

दादाकांत धनविजय ह्यांचे 'अकिंचन' हे नाटक १९८९ साली प्रकाशित झाले.[१७] माती गोट्याचे काम करून दारिद्रयाचे जीवन जगणाऱ्या दलितांच्या व्यथा, वेदनांचे, अन्याय, अत्याचाराचे चित्र येथे रेखाटलेले आहे. दलितांचे दिवसेंदिवस शोषण होत चाललेले आहे. निवडणुकीच्या राजकारणातून दलितांची वस्ती जाळली जाते. दलित वस्तीच्या झोपडीत एकटीच लक्ष्मी आहे हे पाहून निवडणुकीत पराभूत झालेला महाजन तिच्यावर बलात्कार करणार तोच विळ्याने लक्ष्मी त्याचा मुडदा पाडते. न्याय व स्वसंरक्षण आणि इज्जतीसाठी दलित-स्त्री खून करते. ह्याचे चित्रण अकिंचन मध्ये आलेले आहे. लक्ष्मी ही दिलत स्त्री आपला नवरा विठ्ठल ह्याच्या मदतीने कोणताही काम धंदा मिळत नाही म्हणून नाईलाजास्तव दारू गाळण्याचा व्यवसाय करतात. अठराविश्वे दारिद्रय असतानाही स्वाभिमानाने आणि जिद्दीने लक्ष्मी जगते. लाचारी पत्करत नाही. लक्ष्मीला जीवन्या नावाचा मुलगा असतो. तो अभ्यासात हुशार असतो. लक्ष्मी मुलगा मोठा होण्याचे स्वप्न पाहत असते. दलित वस्तीत राहत असताना लक्ष्मीला

अस्पृश्यतेसंबंधी वाईट अनुभव येतात. तरीही ते अन्याय सहन करण्या इतपत ती समजूतदार असते. सततची ओढाताण ही तिच्या नशिबात आणि कर्मातच असते. त्यातच गावचा महाजन त्यांना उसणे दिलेल्या पैशासाठी नेहमीच तगादालावत असतो. तिला नेहमी वाईटसाईट बोलत असतो. दलित सवर्ण वादातून दलित वस्ती पेटवली जाते. त्या वस्तीत एकटीच लक्ष्मी आहे. हे संधी साधून महाजन तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. झटापटीत लक्ष्मी हातातील विळ्याने महाजनला जखमी करून ठार मारते. माणसाच्या अन्याय, अत्याचाराला, जुलूमाला सहन करण्यालाही काही मर्यादा असतात. दलित स्त्री ही अधिक सोशिक आणि सहनशील असते. पण सतत होणारी छळवणूक, अत्याचार आणि जुलमाविषयी तिची सहनशक्ती संपते. हेच लक्ष्मीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

## वादळातील नौका :

चंद्रकांत देवकर ह्यांचे 'वादळातील नौका' हे नाटक १९९२ साली प्रकाशित झाले.[१८] प्रस्तुत नाटकातून दारूचे दुष्परिणाम अधोरेखित करून नाटककार दारू बौद्धांच्या घरात असणे निषिद्ध मानतो. आपल्या बांधवांना व्यसनमुक्तीचा संदेश देतो. प्रस्तुत नाटकाची नायिका मीरा आहे. मीरा ही एक सुशिक्षित पदवीधर असून माध्यमिक शाळेत शिक्षिका आहे. तिचे लग्न सुनिल रोकडे ह्या गृहस्थाशी झालेले आहे. त्यांना दोन अपत्यआहेत. तेही चांगले शिक्षण घेत आहेत. मीराचा सुखी संसार आहे. सुख वस्तूपणामुळे मीराच्या पतीला दारूचे व्यसन लागते. तो आपल्या वडिलांबरोबरच दारू पिण्यास बसतो. मीराला हे आवडत नाही. स्वतःच्या मुलांनाही हे आवडत नाही. मीरा ह्याविषयी त्यांची समजूत घालून वडीलांविषयी प्रेमाचे संबंध ठेवण्यास बजावते. सुनिलचे दारूचे व्यसन वाढत जाते. त्याला बाबासाहेबांच्या शिकवणुकीचा विसर पडतो. दलितांनी सुरू केलेल्या सामाजिक कार्याला वर्गणी देण्याविषयी तो टाळाटाळ करतो. तेव्हा मीरा यशस्वी मध्यस्थी करते व कटुता टाळते. समाजसेवेची व सामाजिक

कार्याची चळवळीची तिला नेहमीचआवड असते. ती मुलांवरही चांगले संस्कार करते. मीराच्या माहेरचे वातावरण देखील चांगले असते. परंतु सुनिलचे वडील दारू पिऊन वातावरण बिघडवत असल्यामुळे मीराला आपल्या मुलांच्या शिक्षणाची काळजी वाटते. सुनिलच्या अतीव्यसनामुळे मीराचीही बदनामी होते. ती सुनिलची दारू सोडण्यासाठी आटोकाट प्रयत्न करते.

मीराकडे सहनशक्ती आहे. सुनिल सुधारण्याविषयी ती आशावादी आहे. तिची त्याच्यावर निष्ठा आहे. विश्वास आहे आणि त्यागाची भावना देखील आहे. घरी नेहमी उत्साही वातावरण ठेवण्याचा ती प्रयत्न करते. तिच्या मुलाच्या वाढदिवसाच्या दिवशी तिच्या घरात चोरी होऊन बरेचसे नुकसान होते. त्यामुळे तिच्यात अस्वस्थता निर्माण होते. वादळात सापडलेल्या नौकेप्रमाणे तिची दशा होते. मीराच्या पतीचे व्यसन मात्र काही सुटत नाही. मीरा एकदा गावाहून अचानक आली तेव्हाही सुनिल मनोहर ह्या मित्राबरोबर दारू पिऊन तरर झालेला असतो. मनोहर हा सुनिलचा मित्र मीरेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करतो. सुनिलच्या दारूच्या व्यसनापायी मीरेवर अनेक शर्मनाक प्रसंग ओढवतात. दारुड्याची बायको म्हणून मीरची समाजात अवहेलना होते. मीराला हा प्रकार सहन होत नाही. परिस्थिती बिघडत जाऊन कुटुंबाची घडी विस्कटते पण जमेची बाजू एक असते. मीरेचा मुलगा डॉक्टर तर मुलगी प्रोफेसर होते.

मीरा अत्यंत संयमनाने आणि धीराने आलेल्या प्रसंगाला तोंड देते. दारुड्या नवऱ्याशी जीवनभर संसार करते. मुलांबरोबर नवऱ्याला सोडून अमेरिकेत जाण्याची कल्पना मीरेला सहन होत नाही. आपल्या पतीच्या पायाशी आपले सुख आहे असे तिला वाटते पण एकेदिवशी दारूच्या व्यसनापायी मीरेचा पती मोटार अपघातात मरतो.

मीरा अमेरिकेला मुलीकडे न जाता बौद्ध भिक्षुणी बनते. बुद्धांचा संदेश घराघरात पोहचवते. समाजसेवा करून अन्याय ग्रस्त स्त्रियांना धीर देते. अशी ही मीरा कुटुंबाचा डोलारा सांभाळण्यासाठी आटोकाट प्रयत्न करते. सतत पतीच्या मागे उभी राहते. मीरेचा पती व्यसनी असतानाही ती त्याच्यामागे फरपटत का जाते, हेच कळत नाही. ती तर स्वयंपूर्ण आहे. परंतु पती हा परमेश्वर ह्या विचाराचा पगडा तिच्यावर दिसतो. ती पारंपरिक हिंदू स्त्री वाटते. ती या व्यवस्थेचा म्हणून बळी ठरते. वेळ गेल्यानंतर ती बुद्ध विचारांकडे वळते. एवढे मात्र निश्चित बुद्ध तत्त्वज्ञानामुळे विचारांमुळे जीवनात स्थैर्य येईल हे उशिरा का होईना तिला समजले आहे.

**प्रकाशपुत्र :**

लक्ष्मण माने ह्यांचे 'प्रकाशपुत्र' हे नाटक १९९२ साली प्रकाशित झाले.[१९] प्रस्तुत नाटकाला मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची पार्श्वभूमी असून पिढ्यांपिढ्या चालत आलेल्या दलित संवर्णांची ब्राह्मण्य प्रवृत्ती ह्यातील संघर्षाचे चित्रण येथे केलेले आहे. सुमा ही मागासवर्गीय समाजातील असून सासूबरोबर शेतावर मोजमजुरी करण्यास जात असते. तिचा पती बापूराज खोत हा एक सुशिक्षित तरुण असून लाकडे फोडण्याचे काम करतो. सुमा सासुसासऱ्यांबरोबर राहते. बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे ती रूढी परंपरा नाकारते. आपल्या नवऱ्याने बापूने कामधंदा करावे, असे तिला वाटते. तिची परिस्थिती गरिबीची आहे. पुढे बापूला नोकरी मिळते, म्हणून ते परगावी राहायला जातात. त्यातच सुमाला दिवस गेलेले असतात. परंतु परिस्थिती सुधारल्याशिवाय बापूला पहिले मूल नको असते. सुमा कॉलेजला प्रवेश घेते. सर्व काही व्यवस्थित चाललेले असते. ह्याच दरम्यान नामांतर चळवळ जोरात चाललेली असते. बापूचा भाऊ सदा प्राध्यापक असतो. त्याला नामांतर चळवळ मंजूर नसते. परंतु बापू नामांतर चळवळीमध्ये सहभागी होतो. सुमावर बापुसाहेब खरात नको ते आरोप करतात. सुमाला हे आरोप चारित्र्य हनन आणि मारहाण सहन होत नाही. सत्ताधारी जात बना

ह्या विचारापायी आपल्या संसाराची राखरांगोळी होते की काय, अशी तिला भीति वाटते. तीशोक प्रकट करते. परंतु म्हातारा असणारा सासरा तिला कमालीचा धीर देतो. नामांतराची लढाई यशस्वी करण्यासाठी आपल्या होणाऱ्या नातवासह संघर्ष करून ही लढाई जिंकूच असा सुमाला आणि म्हाताऱ्याला आत्मविश्वास वाटतो.

सूमाचा दीर सदा ह्या नामांतर विरोधी असतो. त्याने ब्राह्मणाची मुलगी बायको म्हणून केलेली असते. ह्या संपूर्ण नाटकात सुमाचेच व्यक्तिदर्शन अधिक प्रभावी आणि उजवे वाटते. कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीला ती जिद्दीने आणि धाडसाने सामोरे जाते. सुमाचा नवरा आणि दीर हे शिकले सवरलेले आहेत. परंतु आपल्या स्वबांधवांशीच चांगले वागत नाहीत. त्या तुलनेत सुमा अधिक उजवी ठरते. सुमा सुशिक्षित असून देखीलही तिच्या मनाचा विचार होत नाही. यावरून असे निदर्शनास येते की दलित स्त्री देखील शिकलेल्या दलित कुटुंबात कशी अन्याय, अत्याचार, मारहाण सहन करते. ह्याविषयी सुमाचे उदाहरण अधिक प्रातिनिधीक म्हणावे लागेल. स्त्रीला कौटुंबिक दृष्ट्या आचार, विचार स्वातंत्र्य नाही. सदैव मारहाण अब्रूवरती घाला. कोंडमारा, नवऱ्याचे वर्चस्व या प्रसंगाला सामोरे जावे लागते. सुमाला नवऱ्याकडून मिळणारी ही वागणूक चांगली नाही. आपल्या नवऱ्याला कुणी बोलले तरी ते ही सुमाला खटकते. परंतु जेव्हा सुमावर बापू वाईट आरोप करतो. तेव्हा मात्र सुमाला ते सहन होत नाही. बापूला तेव्हा दम देऊन घरातून हकलून देते हे तिचे वेगळेपण नजरेत भरणारे आहे. खऱ्या अर्थाने परिवर्तनशील आणि गुलामी नाकारणारे बाबासाहेबांची चळवळ पुढे नेणारे वेगळेपण सुमाच्या व्यक्तिरेखेतून साकार झाले आहे, असेच म्हणावे लागते.

**सारांश :**

काही निवडक दलित नाटकाच्या अभ्यासातून असे निदर्शनास येते की, दलित स्त्रीची आजही विटंबना होते. तिला अन्याय, अत्याचार सह करावा लागतो. ती अंधश्रद्धेची बळी ठरते. भारत देशाची पंतप्रधान एक महिला होते असे असतानाही महिलेवर अन्याय अत्याचार होतात ही गोष्टच शरमेची आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून आणि दलित समाजव्यवस्थेतून दलित स्त्रीवर संघर्ष करण्याची वेळ आलेली आहे. घर आणि घराच्या बाहेर ह्या दोन्हीही ठिकाणी ती पोरकी वाटते. तिला समाजव्यवस्थेत स्थान नाही, तिच्या मनभावनांचा कुठेच आदर होत नाही. माता, देवी अशी वेगवेगळी विशेषणे लावून आजही तिला बंदिस्त केलेले आहे. विनयशीलतेच्या नावाखाली तिला घरात डांबून ठेवले जाते. निर्णय प्रक्रियेत कुठेही सहभागी करून घेतले जात नाही. एकूणच दलित वाङ्मयातील सर्वच साहित्य प्रकारात दलित स्त्रीच्या वाट्याला दु:खच आलेले आहे. परंतु दलित नाटकामध्ये मात्र नाटककाराने स्वाभिमानी बाणेदार आणि आत्मविश्वास प्रकट करणारी स्त्री चितारली आहे. आंतरजातीय विवाहातून जातियतेचे प्रश्न सुटतील आणि समाज एकसंध बनेल हे सूत्र अनेक नाटककारांनी वापरलेले आहे. सवर्ण नायिका आणि दलित नायक असे सूत्र नाटकात योजवून जातियतेला छेद देण्याचे काम नाटककार करताना दिसतात. सवर्ण स्त्रिया देखील दलित पुरुषांबरोबर अगदी प्रमाणिकपणे राहून दलित चळवळीला हातभार लावतात. बाबासाहेबांचे आणि म. फुलेंचे विचार समाजात रूजवण्याचे प्रयत्न करतात, तर दुसऱ्या बाजूने दलित स्त्रियांच्या वाट्याला आलेले भयानक जीणेही अधोरेखित होताना दिसते. स्त्रियांवर होणारे बलात्कार, खून प्रस्थापित व्यवस्थेने स्त्रीला गुलाम तर मानले आहेच, पण दलित पुरुषानेही स्त्रीला गुलाम केले आहे. हुंड्यापायी तिचा छळ केलेला आहे. स्वत:ची आणि समाजाची सोय व्हावी म्हणून तिला देवदासी बनवून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले आहे.

देवधर्माच्या नावावर स्वत:ची वासना शमण्याचे काम पांढरपेशा माणूस करतो, हेच अनेक दलित नाटकातून दिसून येते.

## संदर्भटीपा :


१. फुले जोतिबा, 'तृतीयरत्न', (म.फुले समग्र वाङ्मय ग्रंथातून) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, पाचवी आवृत्ती, १९९१
२. मोकाशी मधुकर, 'दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, २०००, पृष्ठ ११९
३. तांबे मोरेश्वर, 'प्रेमप्रताप', मोरेश्वर प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ. ४७
४. व्हटकर नामदेव, 'वाटचुकली', सारजा प्रकाशन, सांगली, १९५५ पृ. १
५. मोकाशी मधुकर, दलित्त रंगभूमी आणि नाट्य चळवळ', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, २०००, पृ.१३०
६. खोब्रागडे हेमंत, 'सूर्यास्त', स्वस्तिक एज्यू. सोसायटी नागपूर, १९८१, पृ. १
७. खोब्रागडे हेमंत, 'सूर्यास्त', स्वस्तिक एज्यू. सोसायटी नागपूर, १९८१, पृ. ४३
८. गजवी प्रेमानंद, 'देवनवरी', अभिनव प्रकाशन, मुंबई, १९८१, पृ. १
९. नंदपुरे ईश्वर, 'दलित नाटक आणि रंगभूमी', पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स, नागपूर, १९९७, पृ. १०३
१०. चव्हाण रामनाथ, 'बामनवाडा', श्रीविद्या प्रकाशन पुणे, १९८१, पृ. १
११. गजवी प्रेमानंद, 'वांझमाती', त्रिदल प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ. १
१२. गजवी प्रेमानंद, 'वांझमाती', त्रिदल प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ. २३
१३. गजवी प्रेमानंद, 'वांझमाती', त्रिदल प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ. ६३-६४

१४. गायकवाड टेक्सास, 'मन्वतंर', दलित रंगभूमी प्रकाशन पुणे, १९८५, पृ. १

१५. रामटेके बाजीराव, 'येथे माणसाला स्थान नाही', समुचित प्रकाशन नागपूर, १९८७

१६. भगत दत्ता, 'वाटापळवाटा', कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, १९८७, पृ. १

१७. धनविजय दादाकांत, 'अकिंचन', अभिनव कलानिकेतन प्रकाशन नागपूर, १९८९, पृ. १

१८. देवकर चंद्रकांत, 'वादळातील नौका', राहुल बुक सेंटर नाशिक, १९९२, पृ. १

१९. माने लक्ष्मण, 'प्रकाशपूत्र', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ. १

# ६. दलित आत्मकथनातील स्त्रीचे स्थान

## प्रास्ताविक :

दलित साहित्यामध्ये आत्मकथन ह्या वाङ्मयप्रकाराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठी साहित्यविश्वात दलित आत्मकथनाची विशेष दखल घेतली गेली आहे. जे भावलं, अनुभवलं त्याचा उत्कट आविष्कार म्हणजे दलित आत्मकथने आहेत. विशेष म्हणजे सर्वच दलित आत्मकथने ऐन तारुण्यात लिहिली आहेत. जीवन जगताना जे दु:ख वाट्याला आलं त्यातून मार्ग काढत काढत आत्मकथाकारांनी गावकुसाबाहेरचं समाज जीवन नेमकं काय आहे. हे पहिल्यांदा मराठी साहित्यविश्वाला दाखवून दिलं. प्रस्तुत प्रकरणात 'बलुतं', 'उपरा', 'आठवणीचे पक्षी', 'अक्करमाशी' आणि 'आयदान'ह्या आत्मकथनांचा प्रातिनिधिक अभ्यास केला आहे. ह्या आत्मकथनाद्वारे दलित आत्मकथनातील स्त्रीचे नेमके काय स्थान आहे, ते अधोरेखित केले आहे.

## ➢ बलुतं :

दया पवार ह्यांचे 'बलुतं' हे आत्मकथन १९७८ साली प्रकाशित झाले.[१] ह्याआत्मकथनाचे अनेक भारतीय भाषांत आणि पाश्चात्त्य भाषांमध्येही अनुवाद झाल्यामुळे 'बलुतं' हे आत्मकथन सातासमुद्रापलीकडे गेलं आहे. बलुतंमधून लेखकांच्या मनामधील द्वंद्व आणि अंतर्मनाचा शोध तसेच मानवी मूलभूत जाणिवाही अभिव्यक्त झालेल्या आहेत. 'बलुतं'ह्या आत्मकथनातून लेखकाने स्वत:च्या अनुभवाबरोबरच पिढ्यान्‌पिढ्या उपेक्षित असलेल्या अज्ञान, दारिद्र्य व दास्य यांनी वेढलेल्या आणि कष्टप्रद जीवन जगणाऱ्या, प्रस्थापित समाजव्यवस्थेने नाकारणाऱ्या समाजाचे जीवन चित्रण केले आहे. लेखकाने स्वत: बरोबर आपल्या समाजाचे जीवनचित्रण अधोरेखित केले आहे. दया पवार ह्यांचा आणि त्यांच्या समाजाचा काटेरी

प्रवास ह्या आत्मकथनात ध्वनित होतो. बलुतंमधील दगडू मारुती पवार दया पवार कसा होतो, हे ही आत्मकथन वाचत असताना आपल्या लक्षात येते.

'बलुतं'ह्या कलाकृतीचे आत्मनिवेदन आणि आत्मप्रकटीकरण करणाऱ्या मी चे चरित्र आहे.'बलुतं' मध्ये लेखकाने प्रारंभीच्या वीस वर्षाच्या जीवन प्रवासातील कहाणी सांगितलेली आहे. त्याचं बालपण, किशोरपण प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून मिळणारी वागणूक, त्यांची शिक्षणविषयक आवड, जीवन जगताना आलेले अनुभव, निसर्ग शरीर बदलांचे अर्थ शोधणारे मन, त्यांचे सामाजिक भान आणि सुसंस्कृत व समूह मनाला आलेले व्यक्तिगत अनुभव ह्या सर्वच पातळ्यावरून दया पवार आपले अनुभव प्रकट करतात.

बलुतंमध्ये स्त्री व्यक्तिरेखामध्ये दया पवारांची आई, जमना मावशी, विठाबाई, दया पवारांची पत्नी सई, दया पवारांची प्रेयसी बानू, सलमा, गऊ याशिवाय इतर अनेक व्यक्तिरेखा आहेत. परंतु नजरेत भरणारी व्यक्तिरेखा म्हणजे दया पवाराची जमना मावशी ही आहे. आपली मावशी ही वेश्या व्यवसाय करते, हे दया पवार न कचरता सांगतात. दया पवारांच्या पडत्या काळात जमना मावशीने आपल्या देहाचा बाजार मांडून त्यांना वाढवल, त्यांच्या शिक्षणाचा खर्च केला. परंतु आयुष्याच्या उतरत्या काळात जमना मावशीची शोकांतिका होते. ती अक्षरश: रस्त्यावर भीक मागत फिरते, पण दया पवार तिला ओळख देत नाही. ह्या प्रसंगाविषयी लेखक म्हणतात, जमना मावशीची तीक्ष्ण बाणासारखी नजर अंधारातही काळीज चिरीत जाते.[२] लेखक स्वत:च आपल्या मावशीला ओळख देत नाही. पण अस्वस्थ मात्र होताना दिसतात. ज्या मावशीनं आपली देखभाल केली त्या मावशीकडे लेखकाचे दुर्लक्ष होणे हे असभ्यपणाचे कृत्य वाटते. केवळ सुशिक्षित मित्रांना जमना ही आपली मावशी आहे, हे सांगाव लागेल,ह्या भीतीपोटी ते तिच्याकडे दुर्लक्ष करतात. यावरून एक बाब लक्षात येते की,

यांनी आपल्याला सुखी जीवन जगण्याचा मार्ग दाखवला, त्या व्यक्तीकडेही दुर्लक्ष करतात. स्वतःच पांढरपेशेपण जपतात.

'बलुतं' वाचताना जमना मावशीची जशी फरपट अनुभवाला येते. तशीच फरपट दया पवारांच्या आईचीही झाली आहे. दया पवार जशी जमना मावशीला ओळख देत नाही, तशीच स्वतःच्या आईलाही ओळख देत नाही. दया पवारांची आई घरसंसार चालविण्यासाठी स्वतः मोळी विकते आणि कुटुंबाला हातभार लावते. पण त्या आईला देखील दया पवार तुच्छ लेखतात, आपल्या शाळकरी मित्रांसमोर ते आईशी बोलत नाहीत. ज्या मातेने आपल्याला जन्म दिला आहे, त्याच मातेला ओळख न देणे हा कोणता प्रकार असा प्रश्न पडतो. यावरून एक निदर्शनास येते की, प्रस्थापित समाजव्यवस्थेने दलित स्त्रीला तर नाकारले आहेच, परंतु स्व समाजातून आणि नातेवाईकांकडून देखील तिची अवहेलनाच झाली आहे.

सई ही दया पवारांची पत्नी अतिशय सुंदर, देखणी, बोलक्या डोळ्यांची, गोरापान रंग असलेली, भुरळ घालणारी असे लेखकाने तिचे वर्णन केलेले आहे. एकदा दया पवारांचा घरी येणारा मित्रही सईकडून पाणी घेताना तिला चिमटा घेतो. सई ह्याविषयी दया पवारांकडे तक्रार करते. त्यावेळेस दया पवार म्हणतात, "अग, आहेसच तशी देखणी. कुणाचंही मन तुला पाहून ढळेल. तुझ्या मनात काही पाप नाही ना? मग झाले तर."[३] सईच सुंदर देखण रूप पाहून तिच्यावर अनेकांच्या नजरा खिळतात, परंतु दया पवार ह्या बाबींकडे दुर्लक्ष करतात. एवढेच नव्हे तर जुगार खेळायला आलेल्या माणसाने सईला नोटा दाखवलेल्या असतात. ह्याबाबतची तक्रार ती दया पवारांकडे करते, परंतु ह्या तक्रारीकडे दया पवार दुर्लक्ष करतात. सई देखणी असल्यामुळे जुगार खेळायला येणारी माणसं तिला नोटा दाखवत असावी, असा दयाचा भ्रम होतो. आपली बायको सुंदर देखणी असतानाही, दया पवार स्वतःच्या मित्रांना घरी नेतच आणि त्यातून सई आणि मेहबूब हे प्रकरण उद्भवत. स्वतः दया पवारांची आई, सई आणि मेहबूब

प्रकरणाविषयी दयाला सांगते. परंतु मुलगा आपलं ऐकत नाही हे समजल्यानंतर स्वत: दयाची आई घरदार सोडून निघून जाते.आपल्या आईविषयी, मावशीविषयी आणि पत्नीविषयी लेखक कुठेच गंभीरता दाखवत नाही. एके दिवशी स्वत: लेखक सईला अणि मेहबूबला चोरून बोलताना पाहतात. पहिली वेळ असल्याकारणाने लेखक सईला माफ करतात. परंतु सई आणि मेहबूब ह्यांच्या वर्तनात बदल होत नाही, म्हणून लेखक सईपासून दूर जातात.

दया पवार सहावीच्या वर्गात शिकत असताना सहावीच्या वर्गातील बानूच्या प्रेमात पडतात. बानूही जातीनं मराठा होती. रंगानं खूपच गोरी केतकरीच्या पानासारखी. उन्हात चालली म्हणजेच तिचे गाल लाल व्हायचे.[४] दुसरे असे महत्त्वाचे की ती उच्च जातीची असल्यामुळे तिच्याविषयी लेखकाला आकर्षण वाटते, बानू केवळ सुंदर आहे,असे नाहीतर बानू म्हणजे आकाशाला लागलेले फळ आले, आपण तिथे केव्हाच पोहचू शकणार नाही,ह्याची कल्पना लेखकाला येते. दया पवारांना महारवाड्यातल्या पोरीचं आकर्षण वाटत नाही, परंतु सवर्ण पोरींचे आकर्षणवाटते.

बानू प्रमाणेच लेखकाला गऊही वडाऱ्याची पोरगीही आवडताना दिसते. गऊचे वर्णन करताना लेखक म्हणतात, गऊ तशी देखणी होती. चांगली मक्याच्या कणसासारखी, उजळ, तांबूस रंगाची, वडारणी नेसतात तशी लुगडं नेसायची, गच्च आवळून नाचणारी नेसते तशी नऊवारी पद्धतीने. पदर छातीला घट्ट गुंडाळलेला दंड मात्र उघडे अशा ह्या सुंदर गऊवर लेखकाचे प्रेम जडते. गऊवर केवळ लेखकाचीच नजर बसत नाहीत तर तिच्या बहिणीच्या नवऱ्याचीही नजर बसते. ह्यातून एक लक्षात येते केवळ बाहेरील व्यक्तीकडूनच स्त्रीचं दमण होत नाही तर घरातील नातेवाईक पुरुषांकडूनही स्त्रीचं दमण केल जातं. लेखक गऊवर प्रेम करतो, परंतु गऊला

तिच्या मेव्हण्याच्या तावडीतून सोडवू शकत नाही, हेही येथे प्रकर्षाने जाणवते.

बानू, गऊ प्रमाणेच सल्मा ही मुस्लीम युवती लेखकाच्या प्रेमात पडते. दया पवार महार जातीतील आहेत. शिवाय त्यांनी आपली बायको सोडलेली आहे, असे असताना देखील सलमा दया पवारांवर प्रेम करते. नुसतच प्रेम करत नाहीतर सल्मा सईची जागा घेताना दिसते. सलमाच्या सहवासामुळे लेखक सईचं दु:ख विसरून जातात. परंतु सलमाला लेखकाबरोबर पळून जावे असे वाटते, तेव्हा मात्र लेखक सलमाचा सहवास टाळतात. स्त्री केवळ सुंदरतेची किंवा उपभोगाचीच वस्तूआहे की काय असेच लेखकाला वाटते परंतु बानू, गऊ सलमा ह्यांची जबाबदारी स्वीकारायची वेळ जेव्हा लेखकावर येते, तेव्हा लेखक चार हात दूर जातात.

एकूणच बलुतंमध्ये रेखाटलेल्या सर्वच स्त्रिया ह्या पुरुषामागे फरपटत जाणाऱ्या हतबल अशाच दाखवलेल्या आहेत. अनेक अडलेल्या, नडलेल्या स्त्रिया पुरुषी कामवासनेच्या बळी कशा ठरत,ह्याचे चित्रण दया पवारांनी बलुतंमध्ये केले आहे. ह्यामध्ये दया पवारांचे वडील असतील किंवा शाळेतील मास्तर असतील ह्यांनी गरीब स्त्रियांचा उपभोग घेतलेला आहे. दारिद्र्यापोटी ह्या स्त्रियांना लैंगिक अत्याचार सहन करावा लागतो, ह्याची अनेक उदाहरणे 'बलुतं'ह्या आत्मकथनात आलेली आहेत.

## ➢ उपरा :

लक्ष्मण माने ह्यांनी 'उपरा' हे आत्मकथन १९८० साली लिहिले. ह्या आत्मकथनातून कैकाडी ह्या भटक्या जमातीचे अनुभवविश्व साकारताना दिसतात. ह्या आत्मकथनात त्यांचे बालपण, दारिद्र्य आणि संघर्षांना परिस्थितीशी दिलेली झुंज दिसून येते. त्याचबरोबर महाविद्यालयीन शिक्षण त्यांचा प्रेमविवाह त्याचबरोबर जातपंचायत याबाबींवर प्रकाश

पडलेला दिसून येतो. लक्ष्मण माने जे जगले ते भोगले त्याचे जिवंत अनुभव त्यांनी 'उपरा' मध्ये मांडलेले आहेत. प्रस्तुत आत्मकथनाचा विचार करत असताना 'उपरा' मधील स्त्री जीवन नेमके कसे आहे ह्याचा विचार येथे अभिप्रेत आहे. लेखकाची आई, लेखकाची पत्नी शशी, पारूमामी ह्या महत्त्वाच्या स्त्री व्यक्तिरेखांचे दर्शन ह्या आत्मकथनात घडते. पारूमामी दिसायला सुंदर असल्याकारणाने तिला तिचा नवरा अंघोळ करू देत नाही. डोक्याला तेल लावू देत नाही. वेणी फणी करू देत नाही. कैकाडी समाजात देखील स्त्रीच्या मनाचा विचार होताना दिसत नाही. तिच्यावरही गुंडाकडून बलात्कार होतो. सवर्ण स्त्रीही निर्भयपणे जीवन जगू शकत नाही आणि दलित स्त्रीही निर्भयपणे जीवन जगू शकत नाही हेच पारू मामीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होत जाते. कैकाडी समाज प्रस्थापित समाजव्यवस्थेचा बळी ठरला आहे. तर कैकाडी स्त्री ही कैकाडी समाजव्यवस्थेची बळी ठरलेली आहे.लक्ष्मण मानेंच्या उपरामध्ये देखील स्त्रीच्या मनाचा विचार होताना दिसत नाही. तिला अक्षरश: जनावरांप्रमाणेच समजले जाते. तिची खरेदी विक्री होते. पैसे घेऊन तिला गहाण ठेवली जाते. सुंदर दिसणे स्त्रीला शाप कसा आहे,ह्याचेही प्रत्यंतर उपरातील पारूमामीच्या व्यक्तिरेखेतून दिसून येते. स्त्रीची विटंबनाच येथे पहायला मिळते.[६]

लक्ष्मणच्या आईला सदोदत वाटत राहते. आपला मुलगा शिकावा, मोठा व्हावा. परंतु कधी-कधी लक्ष्मण शाळेकडे दुर्लक्ष करतो, तेव्हा बाप लक्ष्मणला मारहाण करतो. तेव्हा आईमध्ये पडते तर आईला मार खावा लागतो. आपल्या कुटुंब परिवाराची काळजी घेताना आई दिसते. स्वत:ची लक्तरे निघाली तरी चालतील पण कुटुंबाचे सुख महत्त्वाचे मानणारी अशी लक्ष्मणची आई आहे. भारतीय समाजव्यवस्थेत नेहमी स्त्रीनेच कुटुंबाची फरपट थांबवलेली आहे, हे लक्ष्मणच्या आईच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

उपरामधील सर्वात महत्त्वाची स्त्री व्यक्तिरेखा म्हणून लक्ष्मणची पत्नी शशीकडे पाहता येईल. मराठा कुटुंबात वाढलेली ही तरुण मुलगी

लक्ष्मणच्या प्रेमाखातर जात, धर्म, रूढी परंपरा बाजूला सारून लक्ष्मणबरोबर पळून जाते. कोणाचीही परवा करत नाही. एकनिष्ठ प्रेम म्हणजे काय? ह्याचा वस्तुपाठच शशी घालून देते. प्रेमासाठी हवी ती किंमत मोजायला ती तयार होते. लक्ष्मण कैकाडी आहे. गरीब आहे. त्याला एक वेळचे जेवण नाही. हा कुठलाही विचार तिच्या मनाला स्पर्श करत नाही. अगदी लग्नाच्या पहिल्या रात्री लक्ष्मणच्या घरात तिला फक्त तांब्याभर पाणी पिऊन झोपावं लागतं. ही प्रेमातली उत्कटताशशी दाखवते. परंतु असे असतानाही शशीला जातपंचायत अभय देत नाही. तिला जातपंचायतीला सामोरे जावे लागते. पुन्हा कैकाडी समाजातील रूढी-परंपरेनुसार तिला लक्ष्मणबरोबर विवाह करावा लागतो. तेव्हा लक्ष्मणचे आई-वडील, नातेवाईक आणि जातपंचायत तिचा स्वीकार करतात.

शशी लक्ष्मणबरोबर पळून जाण्याची तयारी करते. ह्या प्रकरणाचा सुगावा तिच्या भावाला लागतो तेव्हाही तिला घरातून अडथळा किंवा विरोध होत नाही, तसेच तिचा छळही केला जात नाही. ती घरातून पळून गेल्यानंतरही तिच्या घरचे कोणीच तिचा शोध घेत नाही. हे लक्ष्मणचे विचार पटत नाहीत, कारण मराठा कुटुंबाची परंपरा विचारात घेता हे अशक्य वाटते. मात्र आपल्या मुलाने आंतरजातीय विवाह केला म्हणून लक्ष्मणचे वडील त्याला म्हणतात, आता जातीत चिट्ठी फिरल त्याला काय करायचं? आपला गु आपल्या तोंडात दुनिया घालल त्याला काय सांगू कनंच्या तोंडानं पंचायत बसू आणा सारी पंचायत बोलल आण लक्षा मी खाली ध्यान घालून माती टोकरीन माग चार पोरी हाई त्या त्यांला कुणाला देऊ?[७] अशी समस्या लक्ष्मणच्या वडिलांसमोर उभी राहते.

उपरोक्त विवेचनावरून असे लक्षात येते की, कैकाडी जमातीमध्ये आंतरजातीय विवाहाला मान्यता नाही. जी जातव्यवस्था लक्ष्मण मोडायला निघाला ती व्यवस्था पारंपरिक व्यवस्थेतील लोक मोडू द्यायला तयार नाहीत.

शशी जात, रूढी, परंपरा असे प्रतिगामी विचार मोडून काढते पण लक्ष्मणला ते शक्य होत नाही. लक्ष्मणला जातपंचायतीला शरण जावे लागते. लक्ष्मण म्हणतो, जातीचा जो ठिपका पुसीन म्हणत होतो, तो गडद झाला होता. लक्ष्मण कैकाडी जातपंचायतीसमोर हतबल होतो. हेच येथे निदर्शनास येते. त्या तुलनेत शशी उजवी ठरते. ती पारंपरिक व्यवस्थेला हादरा तर देतेच शिवाय वटसावित्रीच्या दिवशी वडाला फेऱ्या मारण्यासाठी नकार देते. ती अधिक बंडखोर वाटते. जात, धर्म, रूढी, परंपरा ह्यांच्या पाशात लेखक अडकलेला दिसतो. परंतु शशी जातीची, धर्माची सर्वच बंधने तोडून टाकते. स्त्री जर बदलली तरच समाजव्यवस्था बदलेल, हा संदेशच शशी ह्या व्यक्तिरेखेतून मिळतो. म्हणून खऱ्या अर्थाने शशी ह्या आत्मकथनातील बंडखोर नायिका ठरते.

## ➢ आठवणीचे पक्षी:

प्र. ई. सोनकांबळे ह्यांचे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन १९७९ साली प्रकाशित झाले.[८] आपल्या जीवनाचे सत्यदर्शन लेखकाने प्रामाणिकपणे चित्रित केले आहे. 'आठवणीचे पक्षी'मधील प्रत्येक प्रसंग हा अत्यंत वास्तव आहेत. 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन वाचत असताना लेखकाच्या खडतर जीवनाचे चित्रण डोळ्यासमोर उभे राहते. जगण्याची जीवघेणी धडपडह्यासाठी लेखकाला कमालीच्या यातना सहन कराव्या लागतात. 'आठवणीचे पक्षी' लिहिताना लेखकाला बालवयापासून आलेले अनुभव त्यात कसलाही भिडस्तपणा व लाज, संकोच न वाटता जसेच्या तसे मांडलेले आहेत. आपल्या ओबडधोबड मायबोलीतून आलेली भाषा जिवंतपणे व्यक्त होताना दिसते. लेखकाने कुठेही गडदपणा भरलेला नाही. अगदी सहज सुंदर भाषा वापरून आपले अनुभव त्यांनी अभिव्यक्त केले आहेत.

आईवडिलांचे छत्र लहानपणीच हरपल्यामुळे लेखकाचा सांभाळ त्यांची चेऱ्याची आक्का करते. स्त्री व्यक्तिरेखेमध्ये हिच व्यक्तिरेखा अत्यंत महत्त्वाची आहे. सोनकांबळेंच्या बहिणीच्या घरातील दारिद्रय अपरंपार दैन्य कितीही कष्ट करून पोटभर अन्न मिळू नये, अशी अवस्था लेखकाने ह्या आत्मकथनात चित्रित केली आहे. चेऱ्याची आक्काच्या व्यक्तिरेखेतून मराठवाड्यातील दलित स्त्रीचे जीवनदर्शन घडते. दलित स्त्री कशी आहे, तेच ह्या आत्मकथनातून स्पष्ट होत जाते.

प्र. ई. सोनकांबळे ह्यांचा सांभाळ करण्यारी चेऱ्याची आक्का हिचे सासर गरीब असते. भूमिहीन मोलमजुरी करून दिवसाचा डोंगर कसातरी पार पाडणे, अशा गरिबीत म्हणजे महारपणात प्र. ई.चे बालपण, किशोरपण गेलेले. एका निराधार भूमिहीनाच्या मुलाने, एका मोलमजुरी करणाऱ्या बहिणीच्या पोरक्या भावाने सामंतशाहीच्या विषमतापूर्ण समाजात जे जे पाहायचे, जे सहन करायचे ते सर्व सहन केले. आपल्या भावाच्या पाठीशी ती खंबीरपणे उभी राहते आहे. आपला भाऊ शिकून सवरून मोठा व्हावा म्हणून हमेशा काबाड कष्ट करायची, आपल्या मुलांबरोबरच भावाच्याही पोटापाण्याचा प्रश्न सोडवायची आणि म्हणून आठवणीचे पक्षी ह्या आत्मचरित्रात आक्का ही केंद्रस्थानी दिसते. कष्ट उपसून परलूला शिकवणारी आक्का वाचकांच्या मनाचा वेध घेते पण लहान बहीण बाई मात्र शेवटपर्यंत मुकीच राहते. ती केवळ एक सहनशील दु:खाची भव्य प्रतिमा आहे. आक्का बाळंतपणासाठी लहान बहिणीला घरी आणते. अशावेळी रात्री दिवा पेटून तिचे घर जळते. तिचा संसार उघड्यावर पडतो. आक्का न डगमगता ह्या प्रसंगाला सामोरी जाते. आक्काच्या दु:खाची सावली म्हणून प्र.ई.च्या जीवनाकडे पाहता येईल. आक्काला कष्ट पडूनये म्हणून परलू सतत राबत असतो. आक्का म्हणजे आठवणीच्या अनेक पक्ष्यांमधील आकाशात हिंडणारी एक घार आहे. निस्पुरी माझ्या मायबाप गिळला आता मला गिळाय बसलाय, असा संताप व्यक्त करणारी आक्का प्र.ई.वर मनापासून प्रेम करणारी दिसते. आरं खारं जरा घे. पोट भरून अशी ममताही व्यक्त करणारी दिसते.[१]

प्र.ईच्या आईवडिलांच्या निर्वाणानंतर प्र.ई.च्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी चेऱ्याची आक्का म्हणजेच प्र.ई.ची थोरली बहीण ही एक धीरोदात्त व्यक्तिरेखा आहे, असेच म्हणावे लागते. तिच्याच मुळे प्र.ई.चे शिक्षण पूर्ण झाले. प्र.ई. लेखक झाला. दलित चळवळीला, दलित साहित्याला एक नवा चेहरा मिळाला. दलित साहित्यप्रवाह एका वेगळ्या उंचीला पोहचला. हे चेऱ्याच्या आक्काचे योगदान न विसरण्यासारखे आहे. म्हणूनच असे म्हणावे लागते स्त्री ही केवळ पुरुषाच्या मागे जाणारी नाही तर पुरुषाला वेळप्रसंगात हात देणारी आणि त्याला उभी करणारी एक महत्त्वाची घटक आहे. हे प्र.ई.सोनकांबळे ह्यांच्या बहिणीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

## ➢ अक्करमाशी :

शरणकुमार लिंबाळे ह्यांचे 'अक्करमाशी' हे आत्मकथन १९८४ साली प्रकाशित झाले.[१०]

'अक्करमाशी'ह्या आत्मकथनातून वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेने महार समाजाला बहिष्कृत ठरवून अस्पृश्य जीवन जगायला भाग पाडले. आईची महार जात स्वीकारून नायक तिच्याजवळ राहतो. म्हणजे तो बहिष्कृत समजल्या गेलेल्या जातीत राहतो. बहिष्कृत केलेली महार जात नायकाला पुन्हा अकरामासे म्हणून बहिष्कृत करते. अकरामासे असणे हे हीनत्वाचे कमीपणाचे समजले जाते. समाज आणि समाजाची संस्कृती अशा अनैतिक संबंधातून जन्मलेल्या संततीला मान्यता देत नाही. वर्णसंकर हा समाजमान्य होत नाही, म्हणून अशा संस्कारातून जन्मलेली संतती समाजाकडून अनौरस संतती म्हणून ओळखली जाते. तसे अनौरस संततीला अकरामासे म्हणून हीन ठरविले जाते.[११]

नायकाचा जन्म हा अनैतिक संबंधातून झालेला असल्याने त्याला अक्करमाशी म्हणून संबोधले जाते. अक्करमाशीमधील लेखकाची आई

मसामाय, संतामाय, शेवंता ह्या महत्त्वाच्या स्त्री व्यक्तिरेखा आहेत. मसामाय ही शरणची आई आहे. मसामायचे लग्न विठ्ठल कांबळे ह्या स्वजातीतील व्यक्तीशी झाले आहे. विठ्ठल कांबळे हा हनुमंता लिंबाळे पाटलांकडे काम करीत असतो. मसामाय देखणी असल्यामुळे हनुमंता लिंबाळे पाटलास तिच्याविषयी आकर्षण वाटते. ती पाटल्याच्या वासनेची शिकार बनते परिणामी विठ्ठल कांबळेबरोबर चाललेला तिचा संसार मोडतो. विठ्ठल कांबळे आपल्या दोन मुलांसह तिच्याशी फारकत घेतो. मसामाय एकाकी होते. नाईलाजास्तव हनुमंता लिंबाळे पाटलाची रखेल म्हणून राहू लागते. त्यांच्या संबंधापासून नायकाचा जन्म होतो. शरणचा जन्म हा पाटलाला रूचत नाही. आपली बदनामी होईल, हा मुलगा आपल्या संपत्तीत वाटेकरी होईल, म्हणून शरणला नाकारले जाते. लिंबाळे पाटीलही मसामायला आपल्यापासून दूर करतो. पुन्हा तिचे जीवन दिशाहीन होते. पुन्हा हन्नरच्या यशवंतराव सिद्रमप्पा ह्या पोलीस पाटलाची रखेल बनते. ह्या तिसऱ्या नवऱ्यापासूनही तिला आठ मुले होतात. त्यामुळे शरणचा आधार तुटतो. शरणची जबाबदारी मसामायची आई संतामाय ही घेते. तिने शरणला लहानाचे मोठे केले. तिला एकच मूल झाल्याने नवऱ्याने तिला नांदवले नाही. नंतरही बस स्टॅण्डवर हमाली करणाऱ्या महमूद दस्तगीर, जमादार मुस्लीम समाजातील व्यक्तींबरोबर ती राहू लागली. संतामाय शरणची पोटच्या मुलाप्रमाणे काळजी घेऊ लागली. शरणला तिने तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले. दारिद्र्यामध्ये भीक मागून प्रसंगी शेणातील पिवळी ज्वारी खाऊन तिने दिवस काढले. परंतु शरणला काही कमी पडू दिले नाही. संतामाय शरणचे पोट भरण्यासाठी कपाळाला कुंकू लावून गळ्यात कवड्याची माळ घालून अंबाबाईचा जोगवा मागायची, शरण हा संतामायच्या रूक्ष आयुष्यातील मोठा आधार होता. तसेच शरणच्याही आयुष्याला घडवण्यात संतामायचा मोठावाटा होता. शरणला आईची माया देणारी, स्वत: उपाशी राहून शरणच्या पोटाचा विचार करणारी, शरणला लहानाच मोठ करणारी संतामाय ही व्यक्तिरेखा म्हणून महत्त्वाची ठरते.

मसामाय, संतामाय ह्याव्यक्तिरेखेबरोबरच शेवंता ही एक अक्करमाशीमधील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. शेवंता ही नायकाची प्रेयसी आहे. शरणच्या जीवनात प्रेमाचे झरे निर्माण करणारी शेवंता. तिच्या घरात अठराविश्व दारिद्रय, आई वडील मोल मजुरी करणारे अशा दारिद्र्यात पिचून गेलेली शेवंता शरणवर प्रेम करते. शरणविषयी तिच्या मनात आकर्षण निर्माण होते. शरणही तिच्यावर प्रेम करू लागतो. दोघांमध्ये प्रेम फुलत जाते. दोघे एकमेकांमध्ये गुंतत जातात. परंतु कालांतराने ह्या प्रेमाला दृष्ट लागते.ह्या दोघांचे प्रेमप्रकरण महारवाड्यात उघडकीस येते. शरणचे आणि शेवंताचे लग्न होत नाही कारण शरणचा जन्म अक्करमाशी म्हणून ह्या प्रेमप्रकरणाचा शेवट दु:खद होतो. पण तरीही शेवंता नायकाशी आपुलकीने वागताना दिसते.

मसामाय, संतामाय आणि शेवंता ह्या तीनही स्त्री व्यक्तिरेखा दलित कुटुंबाशी दलित समाजजीवनाशी निगडित आहेत. ह्यातिघींचीही पुरुषप्रधान संस्कृतीत फरपट झालेली आहे. मसामाय हिचं सुंदर देखणं रूप तिच्या शोकांतिकेला कारणीभूत ठरते. ज्या लिंबाळे पाटलावरून ती जीव ओवाळून टाकते. तोच पाटील तिला ठोकरतो. एका दलित स्त्रीपासून एका अस्पृश्य स्त्रीपासून झालेले अपत्य नाकारतो. यातून समाजात असलेली अस्पृश्य-सवर्ण ही दरी दिसून येते. सवर्ण पुरुषाला संभोगासाठी दलित स्त्री चालते, परंतु तिची संतती चालत नाही हा एक अजब न्याय हिंदू धर्मशास्त्रात आहे. हे विशेष वाटते. समाज किती शिकला सवरला तरीही जातीची दरी मिटणार नाही, हेच ह्यातून निदर्शनास येते. सवर्ण पुरुष दलित स्त्रीची जबाबदारी नाकारतो, हे ही येथे लक्षात येते. दलित स्त्री सवर्ण पुरुषाच्या कामवासनेची बळी कशी ठरते, हे मसामायच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते. तर अस्पृश्यांमध्ये देखील जातीयता आजही ओतप्रोत भरली आहे. हे शेवंता आणि शरणच्या प्रेम प्रकरणामुळे उघड होते. प्रत्येक जात ही एकमेकांच्या बोकांडी बसली आहे. जोपर्यंत भारत देशातील जात नष्ट होणार नाही, तोपर्यंत भारतीय स्त्री

स्वतंत्र, स्वच्छ आणि निर्भय जीवन जगू शकत नाही, हेच वरील तीनही व्यक्तिरेखेतून अधोरेखित होते.

## ➢ आयदान :

उर्मिला पवार ह्यांचे 'आयदान' हे आत्मकथन २००३ साली प्रकाशित झाले.[१२] मलिका अमर शेख ह्यांच्यानंतर एक चांगली दलित आत्मकथा उर्मिला पवारांनी लिहिलेली आहे. आयदान ह्या आत्मकथनामधून सामाजिक विषमता, पती पत्नीचं भांडण स्त्री देहाची आजवर व्यक्त न झालेली भावना आणि प्रतिकूल परिस्थिती विरुद्धही जिद्दीनं उभी राहणारी उर्मिला पवार ह्या आत्मकथेतून वाचकांच्या नजरेस भरते.

'बलुतं', 'उपरा', 'आठवणींचे पक्षी', 'अक्करमाशी' ही आत्मकथने लिहिणाऱ्या पुरुष लेखकांबरोबरच 'आयदान' लिहिणारी उर्मिला पवार ही स्त्री लेखिका वाचकांच्या मनाचा ठाव घेते.

'आयदान' म्हणजे टोपली. उर्मिला पवार ह्यांची आई आयदान विणते तर वडील स्वत: शिक्षक असतात. परंतु ते पंचांग पाहतात, असे उर्मिला स्पष्ट करते. शिवाय उर्मिलाचा खापर पंजोबा यांच्यावर सत्यशोधकीय चळवळीचा प्रभाव आहे. उर्मिला पवार ही परिवर्तनवादी जीवन जगताना दिसते तर तिची दुसरी बहीण ब्राह्मण मैत्रिणींचे ब्राह्मणी रीतिरिवाज अवलंबताना दिसते. लेखिकेच्या आयुष्यात प्रेम येते, नंतर समाज सेवा येते. उर्मिलाचे हरिश्चंद्र पवारांशी प्रेम होते,ह्या प्रेमातूनच त्यांचे लग्न होते. त्याचबरोबर उर्मिलाचे शिक्षणही होते. परंतु शिक्षण घेतल्यानंतर मात्र उर्मिला पतीच्या निर्देशाप्रमाणे वागताना दिसत नाही. उर्मिला संसारापेक्षा समाजकार्याला अधिक महत्त्व देते. त्यामुळे पती पत्नीमध्ये संघर्ष निर्माण होतो. उर्मिला ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नजरेतून जग बघणारी आहे तर तिचे पती हे पारंपरिक विचारसरणीचे आहेत. ते म्हणतात,

आमच्या खेड्यापाड्यातील बायका बघ पती उठ म्हणेल तर उठायच, बस म्हणेल तेव्हा बसायच. परंतु उर्मिला ही पूर्णतया पतीच्या विरोधी वागणारी आहे. उर्मिला पवारांना स्त्री मुक्तीचा ध्यास लागलेला होता. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेले सामाजिक परिवर्तन उर्मिलाला महत्त्वाचे वाटत होते. उर्मिलाला समाजकार्य महत्त्वाचे वाटत होते. तर उर्मिलाच्या पतीला संसार महत्त्वाचा वाटत होता. ह्या दोघांचेही सूर न जुळल्यामुळे उर्मिलाचे पती व्यसनाधीन होतात. खर तर उर्मिलाचे पती हे तिच्या शिक्षणाच्या विरोधी नव्हतेच ते जर विरोधी असते, तर त्यांनी तिला शिकवले नसते. आपल्यापेक्षा तिला समाजसेवा महत्त्वाची वाटते म्हणून दोघांमध्ये तेढ निर्माण झाली. ह्या कटूतेचे पर्यावसन एकमेकांना वाईट बोलण्यात होते. जो हरिश्चंद्र उर्मिलासाठी रत्नागिरी ते मुंबई अशा चकरा मारत होता, तोच पुढे तिला तुलाही तिकडे (फोरास रोड) जाव लागणार आहे, असे म्हणतो. ह्या निर्माण झालेल्या प्रचंड कडवटपणामुळे शेवटी उर्मिलाचे पती दारूच्या आहारी जातात, आणि त्यांना कॅन्सर होतो. डॉक्टर त्यांना सहा महिनेच जगेल, असे सांगितल्यावर उर्मिला मात्र आपले पती सहा महिन्याने मरणार असतील तर त्यांची किडनी सुंगधाला देता येईल, असे धाडसी विचार करताना दिसते. एकूणच आई वडिलांच्या विचारांचा परिणाम उर्मिला पवारांच्या मुलींवरही होताना दिसतो. उर्मिला पवारांबरोबरच त्यांची शांती आक्का ही एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. लेखिका पृ. २० वर म्हणते, शांती आक्का जेव्हा बाळंत होते त्याच दरम्यान तिची आई देखील बाळंत होते. त्यामुळे आम्ही दोघे तिघे भावंडे बहिणीच्या दुधावर पोसलो आहोत. आई मुलगी जशा एकाच वेळेस बाळंत होतात तसे उर्मिलाच्या ताईच्या लग्नाच्या वेळेस तिची सासू बाळंत होताना दिसते. स्त्रिया म्हणजे मूल जन्माला घालणारे यंत्रच आहे ह्याची प्रचिती येते, हे शरणकुमार लिंबाळेंचे विधान येथे महत्त्वाचे वाटते.

उर्मिला पवार ही प्रेमात कोणाला भीक घालताना दिसत नाही. मग उर्मिलाचे पती हरिश्चंद्र पवार असतील किंवा उर्मिलावर एकतर्फी प्रेम

करणारे बर्वे असतील ह्यांना ती स्वत:ची जागा दाखवून देते. उर्मिला पवारांच्या वागण्या बोलण्यात खूप प्रांजळपणा आहे, हे त्यांनी आपल्या पहिल्या रात्री विषयी लिहिले आहे. त्यातून स्पष्ट होते. पण ह्यात किती खर किती खोट हे दोघेच जाणू शकतात.

उर्मिलाला प्राथमिक शिक्षण घेत असतानाही शाळेत अत्यंत भयानक अस्पृश्यतेचे अनुभव आलेले आहेत. उदा. उर्मिलाला गिऱ्हाईकाच्या मागणीवरून आयदान खाली ठेवायला लावून त्यावर पाणी शिंपडायला लावत आणि वरूनच पैसे देत, शिवाय उर्मिला पवार ज्या भाड्याच्या घरात राहत ते घर त्यांना खाली करायला सांगतात. खालचे जातीचे म्हणून त्यांना हिणवले जाते. एवढेच नव्हे तर उर्मिलाच्या घरी भाड्याने राहणारे मुस्लीम कुटुंबही वाईट अनुभव देताना दिसते. उर्मिला पवारांना जातीवरून अपमान छळ सहन करावा लागतो. सामाजिक परितर्वनासाठी स्वत:ला झोकून देणाऱ्या स्त्रीला घर आणि घराबाहेर कसा संघर्ष करावा लागतो ह्याचे चित्रण आयदानमध्ये येते.

'आयदान'ह्या आत्मकथनामध्ये स्त्री म्हणून उर्मिलाच्या वाट्याला आलेले दु:ख भोग जातीयतेचे चटके त्याचबरोबर कुटुंबातच होणारी घुसमट यातून उर्मिलाचे जीवन पुढे जाते. उर्मिला पवार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाज परिवर्तनाचे विचार समाजात रूजवताना दिसते. परंतु स्वत:चा नवरा, जन्म दिलेल्या मुली ह्यांना मात्र ती बदलू शकत नाही. त्यामुळे आदर्श निर्माण करण्यास ही स्त्री व्यक्तिरेखा थिटी वाटते.

एवढे मात्र निश्चित लेखिका भारतात जन्माला आलेली असल्याने तिचं दु:ख स्त्री असण्यापुरतं मर्यादित नाही तर तिला जातीय पदर आहे. स्त्री म्हणून जन्माला आल्याने भोगाव लागणारं दु:ख आणि जातीय पर्यावरणातून वाट्याला आलेले दु:ख असे दुहेरी दु:ख उर्मिलाच्या वाट्याला येते. मनुस्मृतीने शूद्रातिशूद्रांना धनसंचयनाची परवानगी नाकारली.आर्थिक

दारिद्रय त्यांच्या वाट्याला आले. त्याचबरोबर मनुस्मृतीने स्त्रीवर लादलेल्या दुय्यमत्वातून उद्‌भवणाऱ्या दु:खातून आयदान उर्मिला विणते. आयदान विणण्याची परंपरा तिला आईने बहाल केलेली असली तरी दु:खाचे हे आयदान विणण्याचे काम ती आंबेडकरी प्रेरणेतून शिकली, हे नाकारता येत नाही. शिक्षण ही ब्राह्मणांची मक्तेदारी आहे, ही मक्तेदारी स्त्री 'आयदान' मधून नाकारताना दिसते.

पुरुषप्रधानव्यवस्थेची अनेक रूपेही ह्या आत्मकथनातून अनुभवायला मिळतात. ही पुरुषप्रधानता स्त्रियांनीही सहजासहजी स्वीकारलेली असते. म्हणून नवऱ्याने मारले किंवा कोणत्याही प्रकारची छळवणूक केली तरी ती घर सोडत नव्हती. साऱ्याच प्रकारची छळवणूक तिला मुकाटपणे सहन करावी लागते. नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या उर्मिलालाही पुरुषी मानसिकतेचे चटके सोसावे लागतात. पण उर्मिला हे ही दाखवून देते की आंबेडकरी प्रेरणा स्वीकारणारे पुरुषही मनुवादी मानसिकतेतून बाहेर आलेले दिसत नाहीत.

स्त्रियांच मंगळसूत्र हे त्यांच्या पुरुषी गुलामीच लक्षण आहे. म्हणूनच स्त्री मुक्ती विचार मोडणाऱ्या स्त्रियांनी ते नाकारलं. समता स्वातंत्र्याचा विचार देणाऱ्या भगवान बुद्धाच्या धम्मात अशा गुलामीच्या प्रतीकांना थारा असेल, असा प्रश्न उर्मिलाला पडण साहजिकच शक्य आहे, तरीही बौद्ध पुरुषांच्या मनातून स्त्री आपली गुलाम असते, हा विचार हद्दपार झालेला दिसतो का?

सारांश, 'बलुतं', 'उपरा', 'आठवणींचे पक्षी', 'अक्करमाशी' आणि 'आयदान'ह्या आत्मकथनातील 'स्त्री' व्यक्तिरेखा ह्या परिस्थितीशी झगडताना दिसतात. मग ती बलुतंमधील जमना मावशी असो किंवा अक्करमाशी मधील मसामाय असो. ह्यांना दलित समाजव्यवस्थेतही स्त्री म्हणून मानाचे स्थान लाभले नाही. अक्करमाशीमध्ये स्वत: शरणकुमार

लिंबाळे ह्यांनी जातीयतेचे चटके अनुभवले. पुरुषप्रधान व्यवस्था नाकारण्याचे ठरवले पण वास्तवात मात्र ते पुरुषप्रधान संस्कृतीचे ओझे आजही वागवताना दिसतात. ते जर उच्च नीच्च भेदभाव मानीत नसते. पुरुषप्रधान व्यवस्था नाकारीत असते तर लिंबाळे हे बापाचं आडनाव न लावता मसामायच आडनाव लावून इथल्या समग्र स्त्रीला न्याय देऊन गेले असते. परंतु सर्वच दलित आत्मकथनाच्या संदर्भात एक प्रकर्षाने जाणवते की, दलित लेखक लिहितो, एक आणि वागतो एक, समग्र दलित आत्मकथनातील स्त्री जीवनावर एक नजर टाकल्यास असे निदर्शनास येते की दलित स्त्री दारिद्र्यात पिचली आहे. तिचा घरात समाजजीवनात मानसिक, शारीरिक कोंडमारा झालेला आहे. ती अगतिकपणे जीवन जगताना दिसते. ती काबाडकष्टकरते आणि पुरुष मात्र तिच्या जीवावर जगतात. सर्वच स्तरावर दलित स्त्रीचे शोषण होताना दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जो विधायक आणि सम्यक परिवर्तनाचा बदल हवा होता, तो येथे जाणवत नाही. स्त्री शोषणच येथे पहायला मिळते. कमी अधिक प्रमाणात सर्वच दलित आत्मकथनातील स्त्रियांच्या वाट्याला असेच दु:ख आलेले आहे, हे नाकारता येत नाही.

## संदर्भटीपा :


१. पवार दया, 'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९७८, पृ.क्र. १.

२. पवार दया, 'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९७८, पृ.क्र. ९४.

३. पवार दया, 'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९७८, पृ.क्र. १४९.

४. पवार दया, 'बलुतं', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९७८, पृ.क्र. ५५.

५. माने लक्ष्मण, 'उपरा', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. १.

६. साळवे शशिकांत, 'साहित्यधारा', यशोदीप प्रकाशन, २०१४, पृ. ५२.

७. माने लक्ष्मण, 'उपरा', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. १३४.

८. सोनकांबळे प्र.ई., 'आठवणींचे पक्षी', चेतना प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ. १.

९. लिंबाळे शरणकुमार, 'सहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००५, पृ. १३०.

१०. लिंबाळे शरणकुमार, 'अक्करमाशी', स्त्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. १.

११. थोरात विलास, 'शरसंधान', सुविद्या प्रकाशन, पुणे, २००८, पृ. २०.

१२. पवार उर्मिला, 'आयदान', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००३, पृ.१.

## संदर्भग्रंथसूची :

१. अडसूळ भाऊसाहेब, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य', सुगावा प्रकाशन, पुणे, १९७७

२. इंगळे वामन, 'दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य', कालचक्र प्रकाशन, औरंगाबाद, १९७५

३. कऱ्हाडे सदा, 'दलित साहित्याच्या निमित्ताने', अभिनव प्रकाशन, मुंबई, १९८२

४. कऱ्हाडे सदा, 'दलित साहित्य चिकित्सा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००१

५. कऱ्हाडे सदा, 'साहित्य विश्लेषण', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९

६. कटारे मोतीराम,'फुले आंबेडकरी साहित्य : आकलन आणि आस्वाद', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २००६

७. कसबे रावसाहेब, 'मानव आणि धर्मचिंतन', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९६

८. कवठेकर बाळकृष्ण, 'दलित साहित्य-एक आकलन', मेहता पब्लिशिंग, कोल्हापूर, १९८१

९. किरवले कृष्णा, 'दलित चळवळ आणि साहित्य', मॅजिक प्रकाशन, पुणे १९९६

१०. किरवे कृष्णा, 'आंबेडकरी शाहिरी : एक शोध', नालंदा प्रकाशन, पुणे, १९९२

११. कुलकर्णी गो.म., 'दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९७

१२. कुलकर्णी गो.म., 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सहावा, उत्तरार्ध, पुणे १९९६

१३. कोरडे बजरंग, 'अण्णाभाऊ साठे', साहित्य अकादमी प्रकाशन, दिल्ली, २००१

१४. खरात प्रकाश, 'दलित कथा उगम व विकास', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९२

१५. खरात शंकरराव, 'दलित साहित्य-प्रेरणा व प्रवृत्ती', इनामदार बंधु प्रकाशन, पुणे, १९७८

१६. खंडेराव हरिश, 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग', प्रज्ञा प्रकाशन, उल्हासनगर, २००१

१७. जाधव मनोहर, 'दलित स्त्रियांची आत्मकथने', सुविद्या प्रकाशन, पुणे, २००१

१८. जांभुळे बी.जी., (संपा.), 'डॉ. आंबेडकरांची निवडक भाषणे', डोळस प्रकाशन, बीड

१९. जांभुळे सरिता हरिदास, 'चोखोबाची कविता', सुगावा प्रकाशन, पुणे, २००१

२०. डांगळे अर्जुन, 'दलित साहित्य : एक अभ्यास', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई,१९९१

२१. ढगे सुशीला, 'मराठी दिलत कादंबरीची अभिनव वाटचाल', सुगावा प्रकाशन, पुणे २००४

२२. ढाकणे सुखदेव, 'बाबुराव बागूल : व्यक्ती आणि वाङ्मय', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद

२३. देशपांडे अ.ना., 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७९

२४. देशपांडे अ.ना., 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७९

२५. निंबाळकर वामन, 'गावकुसाबाहेरील कविता', अस्मिता प्रकाशन, औरंगाबाद, १९७३

२६. परदेशी प्रतिमा, 'डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती', सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे

२७. पानतावणे गंगाधर, 'दलितांचे प्रबोधन विचार', विचार ग्रंथमाला प्रकाशन, नागपूर, १९५६

२८. नलगे चंद्रकुमार (संपा.) 'दलित आत्मकथन', सुरेश एजन्सी, पुणे, १९८६

२९. फडके भालचंद्र, 'डॉ. बाबासाहेब आणि दलित साहित्य', प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८९

३०. फडके भालचंद्र, 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८९

३१. बागूल बाबुराव, 'दलित साहित्य : आजचे क्रांतीविज्ञान', बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर, १९७६

३२. भवरे महिंद्र, 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००१

३३. मनोहर यशवंत, 'दलित साहित्य:आजचे क्रांतीविज्ञान', बुद्धिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर, १९७६

३४. मनोहर यशवंत, 'आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा', प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर, १९९१

३५. मुलाटे वासुदेव, 'सहा दलित आत्मकथने : एक चिंतन', कैलास पब्लिकेशन्स्, औरंगाबाद, १९८५

३६. मेश्राम योगेंद्र, 'दलित साहित्य: उद्गम आणि विकास', श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८

३७. मेश्राम केशव, 'विद्रोही कविता', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, १९९४

३८. मोकाशी मधुकर, 'दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०००

३९. लांजेवार ज्योती, 'दलित साहित्य समिक्षा', सुगावा प्रकाशन, १९९२

४०. लिंबाळे शरणकुमार, 'साहित्याचे निकष बदलावे लागतील', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००५

४१. सूर्या अनिल, 'आंबेडकरी स्वकथने : एक समाजशास्त्रीय अध्ययन', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९६

दलित साहित्यातील स्त्री-जीवन - १२४

मानवाच्या जीवनातील अंधार ज्ञानरूपी प्रकाशाने दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परिश्रम घेतले. समाजविकासाबरोबरच नैतिक मूल्ये जोपासण्याचे कार्य त्यांनी पार पाडले. ह्या सर्व सामाजिक बदलांचा परिपाक म्हणजे दलित साहित्य होय. दलित साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि आत्मचरित्र ह्या वाङ्मयप्रकारात विपूल लेखन झालेले दिसते. ह्या साहित्यप्रकारात सामान्य माणसाचे जीवनचित्रण आले. पण स्त्री मात्र उपेक्षित राहिली. ही स्त्री कोणाची तरी माता आहे. कोणारी तरी बहीण आहे. कोणाची तरी बायको आहे. परंतु तिला स्वत:चे अस्तित्व दिसत नाही. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही. एक उपभोग्य वस्तू म्हणून समाज तिचा स्वीकार करतो. स्त्री तर विश्वाची जननी समजली जाते, हे विधान राजकीयदृष्ट्या तिचे शोषण करणारे आहे. कारण टी.एस. इंलिएटच्या म्हणण्यानुसार कोणत्याही निर्मितीनंतर निर्मिकाचे अस्तित्व नष्ट होते. येथे सुद्धा स्त्रीला नावापुरतेच संबोधले जाते. थोडक्यात पुरुषप्रधान संस्कृतीची ती बळी ठरली जाते. दलित साहित्यात देखील कमी अधिक प्रमाणात तिच्या वाट्याला हेच दु:ख आलेले आहे. तिच्याकडे बाई माणूस म्हणून नाही तर माणूस म्हणून पाहिले पाहिजे. दलित साहित्यामध्ये दलित स्त्री रंगवली पण ती अनेकदा पराभूत झालेलीच दाखवलेली आहे. रूढी, परंपरा यात ती पिचली आहे. तिच्या मूक वेदनांना वाट करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांत अगोदर आपली लेखणी चालविली. तद्नंतर अनेक दलित साहित्यिक आपले विचार ध्वनित करू लागले.

